सोलापूर तरुण भारत
आसमंत

# 'नारीशक्ती'ला काँग्रेसची नाट!



**एकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'नारीशक्ती वंदन अधिनियम' दुरुस्ती विधेयक संसदेच्या विशेष सत्रात पारित करण्यासाठी सर्वपक्षीयांना समर्थनाचे आवाहन केले होते, मात्र, काँग्रेसने या निर्णयाला नाट लावत विरोधाचाच सूर आळवत, हे विधेयक नामंजूर करण्याचे पाप केले. त्यामुळे महिला आरक्षणासंबंधी काँग्रेसच्या आजवरच्या बोटचेप्या आणि दुटप्पी धोरणाचाच पर्दाफाश झाला आहे.**

वेधक प्रतिनिधी

भारतीय लोकशाहीच्या प्रवासात काही निर्णय हे केवळ कायदे नसतात, तर ते व्यवस्थेच्या गाभ्यात बदल घडवणारे टप्पे ठरतात. 'नारीशक्ती वंदन अधिनियम' हा त्यांपैकीच एक होता. स्वातंत्र्यानंतर सात दशकांहून अधिक काळ महिलांच्या राजकीय प्रतिनिधित्वाचा प्रश्न चर्चेत राहिला; अनेकदा आश्वासने दिली गेली, विधेयके मांडली गेली, पण अंमलबजावणीचा क्षण कायम पुढे ढकलला गेला. आता पुन्हा इतिहाची पुर्नरावर्तती झाली.

कायदा मंजूर झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी वेगाने करण्यासाठी केंद्र सरकारने पावले उचलली आणि तेव्हाच विरोधकांच्या भूमिकांतील विसंगती ठळकपणे समोर आली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभा व राज्यसभेतील नेत्यांना पत्र लिहून आगामी निवडणुका महिला आरक्षणासह घेण्याचा स्पष्ट संकेत दिला होता. या पत्रातून केवळ राजकीय भूमिका नव्हे, तर दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या सुधारणेला प्रत्यक्षात आणण्याची तयारी व्यक्त झाली. परंतु याच क्षणी विरोधकांकडून घाई, राजकीय हेतू आणि संविधानावर घाला अशा आरोपांचा नेहमीप्रमाणे राजकीय वर्षाव सुरू झाला! काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी तर या प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित केले, सोनिया गांधी यांनी एका इंग्रजीत लेख लिहून परिसीमन आणि त्याच्या अंमलबजावणीच्या प्रक्रियेवरच शंका उपस्थित करण्याची तत्परता दाखवली. तृणमूल काँग्रेसचे डेरेक ओ'ब्रायन यांनी तर संसदेला थट्टेचा विषय बनवल्याचा आरोप केला. या सर्व प्रतिक्रिया पाहिल्यानंतर एक मूलभूत प्रश्न उपस्थित झाला होता. तो म्हणजे, हा विरोध महिला आरक्षणाच्या प्रक्रियेवर आहे की राजकीय बदलाच्या भीतीवर?

महिला आरक्षणाचा इतिहास पाहिला, तर त्यात सातत्याने राजकीय अडथळे आले. १९९६ मध्ये यासाठी पहिल्यांदा विधेयक सादर झाले, त्यानंतर अनेक वेळा त्यासाठीचे प्रयत्न झाले. मात्र, प्रत्येक वेळी राजकीय मतभेद, जातीय समीकरणे आणि तथाकथित 'सब-कोटा'च्या मुद्द्यांमुळे ते मंजूर होऊ शकले नाही. काँग्रेसने प्रदीर्घकाळ सत्ता भोगली. त्यामुळे संपुआ सरकारच्या काळातही काँग्रेसला महिला आरक्षण मंजूर घेण्याची संधी होती; २०१० मध्ये हे विधेयक सादर झाले खरे, पण ते पुढे सरकू शकले नाही.

हा इतिहास लक्षात घेतला, तर आताचा विरोधकांचा आक्रोश अधिकच विसंगत वाटतो. कारण, ज्यांनी तीन दशकांमध्ये याबाबत निर्णय घेतला नाही, ते आता यासाठीच्या तथाकथित घाईवर प्रश्न उपस्थित करताना दिसत होते. २०२३ मध्ये महिला आरक्षणाचे विधेयक मंजूर झाल्यानंतर काँग्रेसनेच त्याची तत्काळ अंमलबजावणी करण्याची मागणी केली होती, हे वास्तव सोनिया गांधींसह समग्र काँग्रेसी नेते विसरलेले दिसतात. मग प्रश्न थेट आहे आणि तो म्हणजे, तेव्हा मागणी योग्य होती आणि आज तीच मागणी चुकीची कशी ठरू शकते? विरोधकांचा मुख्य आरोप असा आहे की, सरकार महिला आरक्षण लागू करण्यासाठी घाई करत आहे. मात्र, तीन दशकांचा विलंब झालेल्या निर्णयाला 'घाई' असे संबोधणे हीच मोठी विसंगती! उलट, हा निर्णय उशिराचाच आहे. प्रत्यक्षात हा आक्रोश बदलत्या राजकीय वास्तवामुळे आहे.

महिला मतदारांचा प्रक्रियेतील वाढता सहभाग, स्वतंत्र मतदानाची प्रवृत्ती आणि सामाजिक बदल यांमुळे पारंपरिक मतदारसंघांची समीकरणे बदलत आहेत. महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळाल्यास हे बदल अधिक वेगाने होतील, याची जाणीव अनेक पक्षांना आहे म्हणूनच, त्यांनी विधेयकाला केलेला विरोध हा विरोध घाईचा नसून होणाऱ्या परिणामांचा आहे. सोनिया गांधी यांनी परिसीमन प्रक्रियेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. दक्षिणेकडील राज्यांवर अन्याय होईल, जनगणना न करता निर्णय घेतला जात आहे, असे निराधार आरोप त्यांनी लेखातून केले. परंतु, या दाव्यांचे विलेषण केले, तर वेगळेच चित्र दिसून येते.

सरकारने स्पष्टपणे सांगितले होते की, कोणत्याही राज्याच्या लोकसभेतील जागा कमी केल्या जाणार नाहीत. लोकसंख्या नियंत्रणात यश मिळवलेल्या राज्यांना शिक्षा होणार नाही, याचीही खुद्द पंतप्रधानांकडून हमी देण्यात आली होती. परिसीमन ही घटनात्मक प्रक्रिया असून, १९७० च्या दशकानंतर ती प्रत्यक्षात राबवली गेलेली नाही. त्यामुळे तिची अंमलबजावणी करणे, हे संविधानाचे केलेले पालन आहे, त्याविरोधात उभे राहणे नव्हे. जनगणनेच्या मुद्द्यावरही काँग्रेसची भूमिका बदलती राहिली. एकीकडे जनगणनेची वाट पाहू नका, अशी मागणी केली जाते, तर दुसरीकडे तिच्याशिवाय प्रक्रिया अवैध असल्याचे सांगितले जाते. हीच विसंगती विरोधकांच्या भूमिकेतील दुटप्पीपणा उघड करणारी ठरते.

महिला आरक्षणाचा मुद्दा राष्ट्रीय असताना, त्याला 'उत्तर विरुद्ध दक्षिण' असा दिलेला रंग राजकीय लाभाच्या भावनेनेच प्रेरित असून, हा निव्वळ योगायोग नाही. निवडणुकीच्या तोंडावर प्रादेशिक भावना पेटवणे, ध्रुवीकरण करणे आणि त्यातून राजकीय फायदा मिळवणे, हा जुनाच डाव. परिसीमनाचा मुद्दा हा त्यासाठीचे प्रभावी साधन ठरू शकतो. परंतु, अशा प्रकारचे राजकारण दीर्घकालीन दृष्टीने देशासाठी घातक ठरते. काँग्रेस स्वतःला महिला सक्षमीकरणाची पुरस्कर्ता म्हणून मांडते. परंतु, इतिहासात काही प्रसंग असे आहेत, जे या दाव्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण करतात. आता नारी शक्ती वंदन विधेयकाला विरोध त्याचाच एक पुरावा आहे.

शाहबानो प्रकरणात तत्कालीन सरकारने सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय उलथावून महिलांच्या अधिकारांवरच मर्यादा आणल्या. याशिवाय, महिला आरक्षणासारख्या महत्त्वाच्या विषयावर दीर्घ काळ निर्णय न घेणे, हीही एक प्रकारची निष्क्रियताच. त्यामुळे काँग्रेसने नैतिकतेच्या आधारावर या निर्णयांना विरोध करणे, हे वास्तवापासून दूर होते. तरीही त्यांनी आपल्या घटक पक्षांच्या साथीने हे विधेक संमत होवू दिले नाही.

'नारीशक्ती वंदन अधिनियम' हा फक्त आरक्षणासाठीचा कायदा नव्हता, तर ती भारतीय राजकारणातील सत्तासंतुलन बदलण्याची ऐतिहासिक प्रक्रिया होती. लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व मोठ्या प्रमाणात वाढले असते. यामुळे धोरणनिर्मितीच्या प्रक्रियेत महिलांचा आवाज अधिक ठळकपणे ऐकू आला असता. 'पंचायत राज' व्यवस्थेत महिलांनी दिलेले नेतृत्व आणि यश लक्षात घेतल्यास, राष्ट्रीय स्तरावरही त्याचा सकारात्मक परिणाम अपेक्षित आहे. पण, आता या निर्णयाला काँग्रेसने केलेला विरोध हा महिला आरक्षणाच्या तत्त्वाला नाही, तर तो आहे बदलाच्या भीतीवर. महिला मतदारांचा वाढता प्रभाव, नव्या नेतृत्वाचा उदय आणि पारंपरिक राजकारणाला मिळणारे आव्हान या सगळ्यांचा परिणाम म्हणून हा विरोध अधिक तीव्र झाल्याचे दिसून आले. महिला आरक्षणाचा प्रश्न हा राजकीय स्पर्धेचा विषय कधीच नव्हता, तर तो सामाजिक न्यायाचा होता. तीन दशकांपासून प्रलंबित असलेल्या या मागणीला अखेर मूर्त रूप देण्याची वेळ आली होती. पण पुन्हा दुदैव आड आले अन् नारी शक्तीला काँग्रेसच्या दुटप्पी धोरणाचा फटका बसला. आज देश एका निर्णायक वळणावर उभा असताना बदल स्वीकारण्याचा मार्ग सोडून जुन्या वादांमध्ये अडकून राहण्याचा पायंडा काँग्रसने या विधेयकाला विरोध करून कायम ठेवला. इतिहास साक्षी आहे की, जो समाज बदल स्वीकारतो, तोच पुढे जातो मात्र, महिला आरक्षण कायद्यात सुधारणा आणि परिसीमन आयोग स्थापन करण्यासाठी तीन महत्त्वाची विधेयके लोकसभेत सादर करण्यात आली होती, मात्र ही तिन्ही विधेयके नामंजूर झाल्याने नव्या बदलाचा मार्ग खुंटला आहे.

देशातील महिलांच्या राजकीय सक्षमीकरणासाठी महत्त्वपूर्ण मानले जाणारे 'नारी शक्ती वंदन' विधेयक पुन्हा एकदा संसदेत नामंजूर झाल्याने महिला आरक्षणाचा प्रश्न आणखी काही काळ अधांतरीच राहिला आहे. या विधेयकाच्या बाजूने २९८ मते तर विरोधात २३० मते पडली. एकूण ५२८ सदस्यांनी मतदान केले असून, ५४ मतांनी विधेयक नामंजूर ठरले. या निकालानंतर संसदेत जोरदार गदारोळ पाहायला मिळाला. या घटनादुरुस्ती विधेयकावर सभागृहात मोठ्या प्रमाणावर चर्चा झाली असून, सुमारे १३३ खासदारांनी आपली मते मांडली. यामध्ये ५६ महिला खासदारांचा सहभाग होता, जो स्वतःमध्ये एक विक्रम मानला जात आहे. दरम्यान, सत्ताधारी पक्षाने या विरोधाला महिला सक्षमीकरणाच्या आड येणारी भूमिका असे संबोधले. संसदेत या मुद्द्यावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये तीव्र वाद झाला. महिला आरक्षणाचा विषय भारतात अनेक वर्षांपासून चर्चेत आहे. यापूर्वीही अशा स्वरूपाचे विधेयक अनेकदा संसदेत मांडण्यात आले, मात्र विविध कारणांमुळे ते पारित होऊ शकले नाही. या पार्श्वभूमीवर, 'नारी शक्ती वंदन' विधेयकाकडून मोठ्या अपेक्षा व्यक्त केल्या जात होत्या. राजकीय विश्लेषकांच्या मते, या विधेयकाच्या अपयशामुळे महिलांच्या राजकीय सहभागाबाबतची प्रगती पुन्हा विलंबित झाली आहे. एकंदरीत, 'नारी शक्ती वंदन' विधेयक नामंजूर झाल्याने महिला सक्षमीकरणाच्या दिशेने मोठा धक्का बसल्याचे चित्र आहे. आता या विधेयकाचे भवितव्य काय असेल आणि सरकार पुन्हा ते केव्हा मांडेल, याकडे देशाचे लक्ष लागले आहे.

# अक्षय फळ देणारी अक्षय तृतीया



निमित्त विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

**वैशाखाच रणरणतं ऊन अंगाची काहिली करीत आहे. माणसे, पशुपक्षी झाडांचा आश्रय घेत आहेत. झाडांच्या सावल्या आखूड होतात. रस्त्यावर डांबर अगदी वितळायला लागते. पण याच वैशाखात असा एक दिवस येतो जो या उन्हाळ्यालाही शीतल करून टाकतो. तो दिवस म्हणजे वैशाख शुद्ध तृतीया - अक्षय तृतीया !**

अक्षय म्हणजे कधीही न संपणारे, कधीही न झिजणारे. या दिवसाच्या नावातच त्याचे सार आहे. भगवान श्रीकृष्णाने युधिष्ठिराला या दिवसाचे महत्त्व सांगताना म्हटले होते, या तिथीस केलेले दान आणि हवन क्षयाला जात नाही. देव आणि पितर यांना उद्देशून या तिथीस जे कर्म केले जाते, ते सर्व अक्षय होते. म्हणजेच या दिवशी केलेल्या प्रत्येक सत्कर्माचे फळ अनंतकाळ टिकते. असा हा दिवस साडेतीन मुहूर्तांपैकी एक शुभमुहूर्त मानला जातो.

या दिवशी कोणत्याही नवीन कार्याची सुरुवात केली तर ती फलदायी होते. अनेक अर्थांनी हा दिवस अत्यंत महत्त्वाचा आहे. या दिवसाची महती केवढी आहे पाहा! याच दिवशी कृत युग संपून त्रेतायुग सुरू झाले. याच दिवशी भगवान विष्णूंनी परशुरामांचा अवतार धारण केला म्हणून या दिवशी परशुराम जयंती सुद्धा आहे. नर-नारायणाची जयंती सुद्धा याच दिवशी. भगवान व्यासांनी महाभारत ग्रंथाची रचना सुरू केली ती याच तिथीला, आणि त्यांचे लेखनिक म्हणून गणपतीने काम केले. गंगा नदी स्वर्गातून पृथ्वीवर अवतरली ती याच दिवशी. हिमालयातील बद्रीनाथ यांचे दर्शन घेण्यासाठी भाविक दीर्घकाळ तिष्ठत असतात. या भाविकांसाठी बद्रीनारायणाच्या मंदिराचे दरवाजे याच दिवशी उघडतात. वृंदावनाच्या बांकेबिहारीचे चरणदर्शन वर्षातून केवळ याच एका दिवशी होते. इतकी एकवटलेली पुण्याई या एका तिथीत आहे! म्हणूनच हा अत्यंत पुण्यप्रद असा मुहूर्त आहे.

जैन धर्मातही या दिवसाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. भगवान वृषभदेवांनी मोक्षप्राप्तीसाठी वर्षभर तपस्या केली. अन्नपाण्याचा त्याग केला. ते हस्तिनापूर येथे आले असता राजा श्रेयांशाने त्यांना उसाच्या रसाचा आहार दिला. तो दिवस अक्षय तृतीयेचाच होता. त्यामुळे जैन बांधवांसाठीही हा दिवस अत्यंत पवित्र आहे. महाराष्ट्रात या दिवसाला तर एक वेगळेच महत्त्व आहे. चैत्रगौरीच्या उत्सवाची सांगता याच दिवशी होते. स्त्रिया एकमेकींना हळदीकुंकवासाठी बोलावतात, मोगऱ्याचा गजरा, आंब्याची डाळ आणि थंडगार पन्हे देतात. कैरीच्या पन्ह्याचा तो मंद सुगंध, मोगऱ्याचा दरवळ आणि स्त्रियांच्या गप्पांचा आनंद- हे सगळे मिळून एक अविस्मरणीय चित्र तयार होते. खान्देशात तर या सणाला आखाजी म्हणतात आणि दिवाळीइतकेच महत्त्व देतात. या दिवशी लग्न झालेल्या मुली आपल्या माहेरी येतात. झाडांवर झोके बांधलेले असतात. माहेरी आलेल्या मुली या झुल्यावर बसून खूप आनंद घेतात. जेवढा झुला उंच जाईल तेवढ्याच त्यांच्या इच्छा, आकांक्षा देखील उंच जातात. पण आता काळाच्या ओघात या सुंदर आणि आनंद देणाऱ्या प्रथा कमी होत चालल्या आहेत. या दिवशी पितरांचे स्मरण करण्याची परंपरा आहे. मातीचे मडके आणून त्यात वाळ्याचे पाणी भरतात. पळसाच्या पानांच्या पत्रावळीवर खीर, पन्हे, पापड यांचे नैवेद्य मांडतात. सुगंधित पाण्याने भरलेला घट ब्राह्मणाला दान करतात. या कृतीत एक खोल भाव आहे.

या उन्हाळ्यात जाणाऱ्या- येणाऱ्याला थंड पाणी मिळावे, ही माणुसकीची भावना त्यामागे आहे. अक्षय तृतीयेचे महत्त्व वेगवेगळ्या प्रांतात वेगवेगळ्या आहे. बंगालमध्ये व्यापारी लोक या दिवशी नव्या हिशोबाच्या वह्या वापरात आणतात तर ओरिसात शेतकरी लक्ष्मीपूजन करून नव्या पेरणीला सुरुवात करतात. राजस्थानात विवाह सोहळ्यांना सुरुवात होते. दक्षिण भारतात महाविष्णू आणि लक्ष्मीचे पूजन करतात. अशा रीतीने संपूर्ण भारतभर, वेगवेगळ्या रूपात हा सण साजरा होतो. आपल्या देशाच्या सांस्कृतिक एकतेचेच सुंदर दर्शन या सणाच्या निमित्ताने घडते. अक्षय तृतीयेला लोक नवीन घर, वाहने, सोने यांची खरेदी करतात. परंतु या दिवसाचे महत्व केवळ खरेदीपुरते मर्यादित नाही. या दिवशी केलेले दान, केलेली सेवा, केलेले नामस्मरण हे सगळे अक्षय फळ देणारे आहे. खरी अक्षय संपत्ती ही सोन्याच्या दागिन्यांमध्ये नाही तर सत्कर्माच्या संचितात आहे. म्हणून अक्षय तृतीयेच्या सणाकडे थोड्या वेगळ्या दृष्टीने पाहूया. अक्षय म्हणजे कधीही न संपणारे, न झिजणारे. परंतु एक प्रश्न इथे सहज मनात येतो...

आजच्या काळात आपण नेमके काय अक्षय करण्याचा प्रयत्न करतो आहोत? सोनं, संपत्ती, मालमत्ता की काही अधिक खोल आणि शाश्वत? खरं पाहिलं तर, या दिवशी सोनं खरेदी करण्यापेक्षा स्वतःमध्ये गुंतवणूक करणे अधिक महत्त्वाचे ठरते. ज्ञान, आरोग्य, नाती आणि अंतर्मनाची शांतता- हीच खरी अक्षय संपत्ती आहे. कारण ही वाढत जाते, टिकत राहते आणि आयुष्य समृद्ध करते. ग्रामीण भागात आणि इतरही अनेक ठिकाणी या दिवसात पिण्याच्या पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणावर भेडसावते. म्हणून पाण्याचा देखील जपून वापर करणे आणि शक्य असल्यास इतरांना पाणी उपलब्ध करून देणे हे देखील मोठे पुण्याचे काम ठरू शकते. यातूनच अक्षय तृतीयेचा एक अत्यंत सुंदर आणि आधुनिक अर्थ आपल्याला घेता येतो. निसर्गाची जपणूक आणि संसाधनांचा संयमी वापर ही देखील एक प्रकारची अक्षय साधना आहे. या दिवसात तहानेने जीव व्याकुळ होतो. पण बऱ्याच वेळा शहरातील लोक आपली तहान भागवण्यासाठी कृत्रिम शीतपेयांचा वापर करतात. ही शीतपेये आरोग्यासाठी अपायकारक असतात. म्हणून उन्हाळ्याच्या दिवसात कैरीचे पन्हे, लिंबू सरबत, विविध प्रकारची घरगुती सरबते, ताक, उसाचा रस इ. आरोग्यदायी पेयांचा वापर करून आपल्याला हा उन्हाळा सुसह्य करता येईल.

या वैशाखाच्या उन्हात उगवत्या सूर्याचे किरण जेव्हा अक्षय तृतीयेच्या दिवशी आपल्या अंगणात येतात, तेव्हा ते केवळ प्रकाश आणत नाहीत तर एक अक्षय आशीर्वादही घेऊन येतात. या दिवशी एखादे तरी सत्कर्म करावे. एखाद्याला थंड पाणी द्यावे, एखाद्या गरजूला मदत करावी. ती कृती अक्षय होते. कारण या दिवसाचे नावच आहे अक्षय तृतीया!

अक्षय तृतीयेच्या दिवशी अनेक पौराणिक घटनांचा संदर्भ दिला जातो. भगवान विष्णूंचा परशुराम अवतार याच दिवशी झाला, अशी मान्यता आहे. तसेच महर्षी व्यासांनी महाभारत लेखनास याच दिवशी प्रारंभ केला, असेही सांगितले जाते. गंगामातेचे पृथ्वीवर आगमनही याच दिवशी झाले, अशी श्रद्धा आहे. त्यामुळे हा दिवस धार्मिक दृष्टिकोनातून अत्यंत पवित्र मानला जातो.



विश्वसंचार मल्हार कृष्ण गोखले




# अफवा, अपप्रचार यांचे सामर्थ्य!

**चुकीची माहिती आणि मुद्दाम पेरलेली चुकीची बातमी, यात काय फरक आहे? चुकीची माहिती म्हणजे 'मिसइन्फर्मेशन' ही बरेचदा उत्साहाच्या भरात खात्री करून न घेता गाफिलपणे, ढिसाळपणे दिलेली माहिती असते. आपण सगळेच समाजमाध्यमांवर आपल्याकडे येणारे संदेश, कसलीही शहानिशा न करता पुढे ढकलत असतो. तो 'मिसइन्फर्मेशन'चा उत्तम नमुना. यात कोणाचे तरी नुकसान व्हावे, कोणाबद्दल गैरसमज व्हावेत असा वाईट, दुष्ट हेतू नसतो. पण, मुद्दाम पेरलेली चुकीची बातमी ही काहीतरी मतलब साधण्यासाठीच पसरवली जाते. तिला म्हणतात 'डिसइन्फर्मेशन'.**

सइन्फर्मेशन'ला अलीकडे 'फेक न्यूज' किंवा 'फेक नॅरेटिव्ह' असेही म्हणतात. मार्च १९७१ मध्ये भारतात लोकसभा निवडणुका झाल्या. 'गरिबी हटाव' अशी घोषणा देऊन आणि नानाप्रकारचे गैरव्यवहार करून काँग्रेस पक्षाने आणि इंदिरा गांधींनी ही निवडणूक जिंकली. त्यावषच्याडिसेंबरमध्ये भारत-पाक युद्ध, ज्याला 'बांगलादेश युद्ध' म्हटले जाते, ते झाले आणि भारतीय सैन्याच्या अतुल पराक्रमाने भारत विजयी झाला. नंतरच्या काळात विविध खोट्या बातम्या पेरून इंदिरा गांधी आणि त्यांच्या चमच्यांनी असे वातावरण निर्माण केले की, युद्धातील इंदिरा गांधींच्या खंबीर नेतृत्वामुळे भारत जिंकला आणि मग त्याचा परिणाम म्हणून भारतीय लोकांनी काँग्रेसला भरभरून मतदान केले. हा गैरसमज ५० वर्षांनंतरही टिकून आहे.

अनेक धूर्त लोकांनी तर भारतीय जनमानस कसे परिपक्व आहे, याबद्दल वर्णन करताना म्हटले की, दुसऱ्या महायुद्धात ज्या चर्चिलने ब्रिटनला एवढा भव्यदिव्य विजय मिळवून दिला, त्याला ब्रिटिश जनतेने बहुमताचा कौल दिला नाही. उलट, भारतीय जनतेने मात्र लोकशाही मूल्यांबाबत परिपक्वता दाखवत युद्ध जिंकलेल्या इंदिराजींना निवडणुकीतही विजयी केले. हा चक्क खोटारडेपणा होता. पण, इंदिरा गांधींची सत्ता भक्कम रहावी म्हणून तो मुद्दाम करण्यात आला. मराठी साहित्यात एक अत्यंत लोकप्रिय कथालेखक होते. उत्तरायुष्यात त्यांनी एका प्रख्यात इंग्रजी मासिकातल्या वन्यप्राण्यांबद्दलच्या प्रदीर्घ संशोधन लेखावर डल्ला मारून, तो लेख कादंबरीत रूपांतर करून मराठीत आणला. मूळ लेखातली सुंदर छायाचित्रे त्यांनी स्वतःची पेन्सिल रेखाटने आहेत, असे दाखवले. कादंबरी भरपूर गाजली आणि अर्थातच, भरपूर खपलीसुद्धा. पण, काही काळाने वाययचौर्य उघडकीला आले. परंतु, संबंधित प्रकाशक अजिबात डगमगला नाही. त्याने वेगवेगळ्या मान्यवर समीक्षकांचे अतिशय उत्कृष्टपणे बचावात्मक भूमिका मांडणारे लेख वेगवेगळ्या तालेवार वृत्तपत्रांत छापून आणले. त्यांनी मांडलेली भूमिका काय; तर एकच कल्पना वेगवेगळ्या देशांतल्या विद्वानांना, कलावंतांना एकाच वेळी सुचू शकते. त्याला तुम्ही वाययचौर्य' म्हणू शकत नाही, इत्यादी. सर्वसामान्य वाचक संभ्रमात पडले. बस्. संबंधिकांचे काम झाले. सर विल्यम जोन्स हा अत्यंत बुद्धिमान इंग्रज 'ईस्ट इंडिया कंपनी'चा दुय्यम न्यायाधीश म्हणून बंगालमध्ये आला. त्याला असंख्य भाषा येत होत्या. सन १७८६ साली त्याने एक 'डिसइन्फर्मेशन' सोडून दिली. ती अशी की, 'प्रोटो इंडो-युरोपियन भाषा समूह' असा एक समूह सुमारे सहा हजार वर्षांपूव अस्तित्वात होता. त्यातूनच 'इंडो-इरानियन भाषा समूह' निर्माण झाला आणि पुढे या 'इंडो-इरानियन भाषा समूहा'तून 'संस्कृत' भाषा निर्माण झाली. हा पूर्णपणे खोटा सिद्धांत आमचेच विद्वान उराशी कवटाळून बसलेत. विल्यम जोन्स कोलकात्याच्या 'साऊथ पार्क स्ट्रीट'वरच्या कब्रस्थानात पडल्या-पडल्या आम्हाला हसत असेल. अशा असंख्य 'डिसइन्फर्मेशन्स', असंख्य 'फेक नॅरेटिव्ह' इंग्रजांनी अक्षरशः पावलापावलांवर पेरून ठेवलीत. रणांगणावर भू-सुरुंग पेरतात तसे. जरा पाय पडला की, उडाला धडाका.

भारताच्या दुर्गम जंगल प्रदेशात राहणारे लोक हेच खरे भारत देशातले 'आदिवासी' आहेत. गावांत आणि शहरांत राहणारे लोक नंतर बाहेरून आलेले आक्रमक आहेत, हा असाच एक मुद्दाम पेरलेला खोटा सिद्धांत. भारतातल्या बहुसंख्य असणाऱ्या बहुजन समाजाची अवनती झाली, याला कारण अल्पसंख्य असणारा ब्राह्मण समाज होय, हाही असाच एक सिद्धांत. इंग्रजांनी हा सिद्धांत भारतात सर्वच प्रातांमध्ये पसरवला. पण, त्याला भरपूर प्रतिसाद मिळाला तो तत्कालीन मुंबई आणि मद्रास प्रांतात. म्हणजेच, आजच्या महाराष्ट्र आणि तामिळनाडू या प्रांतांमध्ये. येत्या दि. २३ एप्रिल २०२६ रोजी तामिळनाडूमध्ये विधानसभा निवडणुका आहेत. रामस्वामी पेरियार यांच्या टोकाच्या ब्राह्मणविरोधी भूमिकेमुळे १९५० आणि ६० च्या दशकात असंख्य ब्राह्मण लोक तामिळनाडू सोडून कायमचे मुंबई किंवा दिल्लीला स्थलांतरित झाले. त्यानंतर 'द्रविड मुनेत्र कळघम' (डीएमके) या पक्षाने किंवा त्याच्यातूनच फुटून निघालेल्या 'एआयडीएमके' या पक्षांनी आलटून-पालटून तामिळनाडूवर सत्ता गाजवली. २०२६ च्या निवडणुकीत 'डीएमके', 'एआयडीएमके' आणि काँग्रेस या पक्षांनी एकाही ब्राह्मण उमेदवाराला तिकीट दिलेले नाही, यात आश्चर्य नाही. पण, भाजपच्या यादीतसुद्धा एकही ब्राह्मण नाही. इंग्रजांनी योजनाबद्ध रीतीने तामिळी बहुजन समाजाच्या मनात एका विशिष्ट समाजाबद्दल पेरलेला द्वेष आजही किती तीव्र आहे पाहा.

पश्चिम महाराष्ट्रातल्या एका लोकप्रिय नेत्याबद्दल असे सांगतात की, ते जर मुंबईत किंवा अन्यत्र प्रवासात नसले आणि गावी स्वतःच्या बंगल्यात असले, तर संध्याकाळी त्यांचा दरबार भरायचा. नाना घटना आणि उचापती त्यांच्या कानावर घातल्या जायच्या. मतदारसंघातले अडलेले- नडलेले लोक त्यांना भेटायला यायचे. ते शक्य तितके प्रश्न खरोखरच माग लावायचे. पण, अशा त्या कामाच्या आणि गावगप्पांच्या रगाड्यात मधेच त्यांना करमणूक करून घ्यायची सुरसुरी यायची. मग काहीही आगापिछा नसताना ते जवळच्या कुणाकडे तरी बघत एक फुसकुली सोडून द्यायचे, तुम्ही काही म्हणा अण्णा; पण अलीकडे साली भटं लई माजल्यात! बस्, एवढी बत्ती लागली की, सगळा दरबार ब्राह्मणांच्या खऱ्या-खोट्या कुचाळक्या करण्यात एकदम रंगूनच जायचा. इंग्रजांनी ब्राह्मण- ब्राह्मणेतर द्वेषाचे जे विष बहुजन समाजाच्या मनात पेरले, ते आजही असे उसळून येत असते. सध्या ज्या इराण-अमेरिका युद्धाच्या आगीत पश्चिम आशिया होरपळतो आहे, त्याच्या मुळाशी मुख्यतः ब्रिटिश आणि त्यांच्यासोबत अमेरिकेच्या हेरखात्याने पेरलेल्या खोट्या बातम्या आहेत. २०२६ मध्ये चालू असलेल्या या युद्धाची मूळ कारणे १९५३ मध्ये आहेत.

आतापर्यंत ब्रिटिश आणि अमेरिकन तेल कंपन्या इराणी तेल स्वस्तात लुटत होत्या. त्यांचे ते धंदे या राष्ट्रीयीकरणामुळे वांध्यात आले. तेव्हा ब्रिटिश आणि अमेरिकन हेरखात्यांनी निर्णय घेतला की, मोसादेघला हटवायचे. मग त्यांनी मोसादेघविरुद्ध अपप्रचाराची जोरदार मोहीमच उघडली. मोसादेघ हा अत्यंत भ्रष्ट आहे. तो इराणची अर्थव्यवस्था रसातळाला नेणार आहे, तो इराणला सोव्हिएत रशियाच्या साम्यवादी साम्राज्यात दाखल करणार आहे. असे नानाप्रकारचे लेख, बातम्या, अहवाल, वार्तापत्रे जगभरच्या वृत्तपत्रांमध्ये छापून येऊ लागली. ब्रिटन आणि अमेरिकेने इराणमधल्या अनेक राजकारणी, लेखक, पत्रकार यांना मोठमोठ्या रकमा देऊन आपल्याला हवे तसे लेख, बातम्या छापून आणल्या. हे सगळे लोक साधारणतः सगळीकडेच विकाऊ असतात. पण, ब्रिटन-अमेरिकेने अनेक उच्चपदस्थ इराणी सैनिकी अधिकाऱ्यांना वश करून घेऊन आपल्याला हवे ते बोलायला लावले. अखेर दि. १३ ऑगस्ट १९५३ रोजी राजधानीत प्रचंड दंगल घडूवन आणण्यात आली. मोसादेघ सरकार गडगडले. अमेरिकेचा जवळपास हस्तकच असणारा शाह रेझा पेहलवी याला इराणचा शहा म्हणून घोषित करण्यात आले. या आणि अशाच सगळ्या कारणांमुळे 'सीआयए' जगभर प्रसिद्धही झाली आणि बदनामही. याचा फायदा खुद्द इंदिरा गांधींनीही उचलला. काँग्रेस सरकारच्या भानगडी वृत्तपत्रांमधून बाहेर पडू लागल्या, संसदेत प्रश्न विचारले जाऊ लागले की, इंदिराजी ठरावीक उत्तर बाहेर काढायच्या, या सगळ्यामागे 'सीआयए'चा हात आहे. अमेरिकेला आमचे सरकार अस्थिर करायचे आहे. प्रत्यक्षात 'सीआयए'पेक्षा रशियाच्या 'केजीबी'ने या 'डिसइन्फर्मेशन' तंत्राचा फार प्रभावी वापर खुद्द रशियात, पूर्व युरोपातल्या सोव्हिएत साम्राज्यात आणि आशियातल्या अमेरिकन प्रभावाखालच्या देशांमध्येसुद्धा केला. १९८०च्या दशकात जगभर सर्वत्र 'एड्स' या नव्या प्राणघातक रोगाची लागण आणि चर्चा होऊ लागली. संशोधकजारीनेत्यावरप्रतिबंधकउपायशोध लागले. 'एड्स'ची भयानकता लक्षात येऊन धाबे दणाणलेल्या जगभरच्या शास्त्रज्ञांनी एकत्रितपणे संशोधन गट स्थापन केले. पण, सोव्हिएत रशियन राज्यकर्त्यांनी या सर्व धडपडीकडे अमेरिकेला बदनाम करण्याची एक संधी म्हणूनच पाहिले. सोव्हिएत आणि मित्र देशांमधल्या वृत्तपत्रांमधून मोठमोठ्या रशियन शास्त्रज्ञांच्या नावाने असे लेख यायला सुरुवात झाली . की, 'एड्स'चे विषाणू अमेरिकन युद्धखाते 'पेंटॅगॉन'च्या जैवरासायनिक प्रयोगशाळेतच निर्माण केले गेलेले असून, तिथूनच ते जगभर फैलावले आहेत. तसेच या विषाणूंपासून वेश्या, समलिंगी पुरुष आणि इंजेक्शनद्वारे अमली पदार्थ सेवन करणारे लोक यांनाच धोका आहे. (पान ६ वर)

पोरकी पोरं डॉ. तुषार सावरकर

# रेल्वे स्थानकांवर वाढणारी बालपणं



हाटेची वेळ. प्लॅटफॉर्मवर पहिली गाडी येण्यापूर्वीची शांतता. काही प्रवासी बाकांवर डुलक्या घेत आहेत, काही जण हातात तिकीट घेऊन आपल्या गाडीची वाट पाहत आहेत. त्या गर्दीत काही लहान मुलंही दिसतात. कुणी प्लॅटफॉर्मवर पडलेल्या बाटल्या गोळा करत असतं, कुणी चहाच्या स्टॉलवर भांडी धूत असतं तर कुणी झोपेच्या अर्धवट अवस्थेत थंड फरशीवर गुंडाळून पडलेलं असतं. या मुलांसाठी रेल्वे स्थानक हे फक्त प्रवासाचं ठिकाण नसतं; तेच त्यांचं घर असतं. भारतातील मोठ्या शहरांतील रेल्वे स्थानकं केवळ वाहतुकीची केंद्रं नाहीत; अनेक मुलांसाठी ती जगण्याची जागाही बनली आहेत. काही मुलं घरातून पळून आलेली असतात, काही हरवलेली असतात तर काहींचं कुटुंबच या परिसरात उपजीविका करत असतं. परिणामी या मुलांचं बालपण कुटुंबाच्या वातावरणात न घडता रेल्वेच्या प्लॅटफॉर्मवर घडतं.

भारतात दररोज ३० पेक्षा जास्त मुले रेल्वे परिसरातून सापडतात. भारतातील रस्त्यावर राहणाऱ्या मुलांची संख्या सुमारे १८ लाख असल्याचा अंदाज विविध अभ्यासांमध्ये व्यक्त केला गेला आहे. या मुलांपैकी मोठा भाग रेल्वे स्थानकांच्या परिसरात आढळतो. कारण रेल्वे स्थानक हे शहरातील सर्वात गजबजलेले, सतत चालू असलेले आणि तुलनेने 'अनामिक' ठिकाण असते; जिथे एखादं मूल सहज मिसळू शकतं. भारताच्या रेल्वे व्यवस्थेच्या अहवालानुसार, दरवर्षी अंदाजे ७०,००० ते १,००,००० मुलं रेल्वे स्थानकांवर हरवलेली किंवा घरातून पळून आलेल्ता अवस्थेत आढळतात. या मुलांपैकी अनेक मुलं काही दिवसांत कुटुंबाशी पुन्हा जोडली जातात; पण काही मुलं कायमस्वरूपी रेल्वे स्थानकांच्या परिसरातच राहू लागतात. रेल्वे स्थानकावर वाढणाऱ्या मुलांचं आयुष्य सततच्या हालचालीतून जातं.

गाड्या येतात, जातात; प्रवासी येतात, निघून जातात. पण या मुलांचं आयुष्य मात्र त्या प्लॅटफॉर्मवरच थांबलेलं असतं. काही मुलं प्रवाशांची बॅग उचलतात, काही प्लॅस्टिकच्या बाटल्या आणि कचरा गोळा करून विकतात तर काही वेळा ते भीक मागण्याकडे ढकलले जातात. अनेक मुलं छोट्या-मोठ्या कामांत गुंततात. चहा आणणे, डबे साफ करणे, सामान नेणे आदी. या कामातून मिळणारे पैसे अत्यंत कमी असतात, पण जगण्यासाठी तेच त्यांचं साधन असतं. या मुलांच्या आयुष्यातील सर्वात मोठी गोष्ट म्हणजे अस्थिरता. त्यांचं आयुष्य कोणत्याही ठरावीक चौकटीत बसत नाही. आज ते एका शहरात असतात, उद्या दुसऱ्या शहरात. रेल्वे गाड्यांच्या माध्यमातून ते सहज एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पोहोचतात. त्यामुळे त्यांच्या ओळखीचा, कुटुंबाचा किंवा शैक्षणिक नोंदींचा मागोवा घेणं कठीण होतं. या परिस्थितीमुळे ही मुलं अनेक धोक्यांच्या छायेत वाढतात. रेल्वे स्थानक हे गजबजलेलं आणि असुरक्षित ठिकाण असतं. चोरी, हिंसा, व्यसन आणि विविध प्रकारचं शोषण या सगळ्यांचा धोका या मुलांभोवती कायम असतो. २०१८ मध्ये रेल्वे सुरक्षा दलाने 'ऑपरेशन नन्हे फरिश्ते' अंतर्गत ४४ हजारांहून अधिक मुलांना रेल्वे स्थानकांवरून सुरक्षित ठिकाणी नेलं, ज्यात अनेक मुलं घरातून पळून आलेली किंवा हरवलेली होती. हा आकडा एका मोठ्या वास्तवाकडे निर्देश करतो.

रेल्वे स्थानकं मुलांसाठी धोकादायक परिस्थितीची केंद्रं बनू शकतात. याहूनही गंभीर बाब म्हणजे ही मुलं शिक्षणापासून पूर्णपणे तुटतात. रेल्वे स्थानकावर वाढणाऱ्या बहुतेक मुलांनी शाळा कधी पाहिलेलीच नसते किंवा पाहिली असेल तरी ती खूप आधी सोडलेली असते. परिणामी त्यांचं आयुष्य जगण्यासाठीच्या संघर्षातच अडकून राहतं. शिक्षण, कौशल्य आणि सुरक्षित भविष्य या गोष्टी त्यांच्यासाठी दूरच्या वाटतात. काही वेळा या मुलांची परिस्थिती केवळ दारिद्र्यामुळे नसते तर कुटुंबातील हिंसा, व्यसनाधीन पालक किंवा सततच्या संघर्षामुळेही ते घर सोडतात. घरातील असह्य वातावरणापेक्षा रेल्वे स्थानक त्यांना अधिक स्वातंत्र्याचं वाटतं. पण हे स्वातंत्र्य खऱ्या अर्थाने सुरक्षित नसतं; ते फक्त एका नव्या असुरक्षिततेचं रूप असतं. या प्रश्नाकडे पाहताना समाजाची भूमिका महत्त्वाची ठरते.

रेल्वे स्थानकावर भटकणारी मुलं आपल्याला अनेकदा दिसतात. काही वेळा आपण त्यांना दया म्हणून पैसे देतो, काही वेळा त्यांच्याकडे दुर्लक्ष करतो. पण फार कमी वेळा आपण विचार करतो की, ही मुलं इथे का आहेत आणि त्यांच्यासाठी दीर्घकालीन उपाय काय असू शकतात? प्रत्यक्षात भारतात रेल्वे स्थानकांवर सापडणाऱ्या मुलांसाठी काही महत्त्वाच्या यंत्रणा अस्तित्वात आहेत. १०९८ चाईल्ड लाईन ही राष्ट्रीय आपत्कालीन हेल्पलाईन अनेक वर्षांपासून अशा मुलांना मदत करण्याचं काम करीत आहे. अनेक स्वयंसेवी संस्था आणि सरकारी यंत्रणा रेल्वे स्थानकांवर मदत केंद्रं चालवतात, जिथे हरवलेली किंवा पळून आलेली मुलं ओळखली जाऊ शकतात. अनेक संस्थांकडून अशा मुलांसाठी आरोग्य तपासणी, प्राथमिक शिक्षण, समुपदेशन आणि तात्पुरत्या निवाऱ्याची व्यवस्था केली जाते. काही मुलांना शेल्टर होममध्ये ठेवून शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचाही प्रयत्न होतो. तरीही समस्या पूर्णपणे सुटलेली नाही. कारण रेल्वे स्थानकांवर येणाऱ्या मुलांची संख्या मोठी आहे आणि त्यामागची कारणंही विविध आहेत. दारिद्र्य, कुटुंबातील तणाव, स्थलांतर आणि कधी कधी केवळ अपघाताने हरवणं. या परिस्थितीत दोन गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या ठरतात. पहिली म्हणजे ओळख आणि हस्तक्षेप. रेल्वे कर्मचारी, पोलिस, विक्रेते आणि स्थानिक नागरिक हे सगळे अशा मुलांना सर्वात आधी पाहतात. जर त्यांना योग्य प्रशिक्षण आणि संवेदनशीलता दिली, तर अनेक मुलांना धोकादायक परिस्थितीतून बाहेर काढता येऊ शकतं. दुसरी गोष्ट पुनर्वसनाची प्रभावी व्यवस्था. (पान ६ वर)

कथा नीता ख्रोत

# साक्षी भाव



शनिवारची संध्याकाळ. साक्षी आज खुशीत होती. रविवार संध्याकाळपर्यंत पापासोबत दिवस घालवायचा होता. ती आता सहा वर्षांची होती. दर शनिवारी आपला पापा आपल्याला भेटतो, घरी घेऊन जातो, आपल्याशी खूप खेळतो, खूप काही घेऊन देतो. मात्र, रात्री ८ वाजता सानिया हजर होते घरी न्यायला. ''मला नाही आवडत या घरी यायला, मला तिथेच राहायचं असतं, पापाकडे!'' तिच्या मनात आलं. गेली तीन वर्षे हेच रुटीन होतं साक्षीचं. ती विभागल्या गेली होती आई आणि वडिलांच्या घटस्फोटामुळे. सारंग आणि क्षिप्रा दोघेही सुशिक्षित, उच्चपदस्थ. क्षिप्रा एका मोठ्या धनाढ्य घरातील एकुलती एक लाडाची लेक! सारंग मध्यमवर्गीय घरातला हुशार होतकरू, महत्त्वाकांक्षी, कर्तबगार, मोठी स्वप्न पाहणारा तरुण. सारंग आणि क्षिप्राची पहिली भेट...

दोघांनाही एकाच कंपनीत मुलाखतीसाठी जायचे होते, जागा महत्त्वाची होती. सुमारे १० उमेदवारांमधून दोघांचीही अंतिम फेरीसाठी निवड झाली. दोघेही प्रतीक्षा करीत होते. जुजबी ओळख झाली होती दोघांची. तेव्हा क्षिप्रा म्हणाली, ''हॅलो, मिस्टर.. जर तुम्हाला जास्त गरज असेल तर मी.... सोडायला तयार आहे ही संधी.'' सारंग म्हणाला, ''छे, छे! ज्याला मिळायची आहे, त्याला मिळेल ही नोकरी, पुढेही मिळतील अनेक संधी.'' किंचित हसत क्षिप्रा म्हणाली, ''आय एम इम्प्रेस्ड. तुम्ही खरंच विचार करा, मी दुसऱ्या कंपनीत बघते!'' ''नाही, मला नाही पटणार असे काही केलेले...'' सारंग सहज पण ठामपणे म्हणाला. त्याला नवल वाटले, हल्लीच्या या युगामध्ये कोण सोडतंय हाती आलेली उत्तम संधी? ही अशी कशी? आश्चर्य म्हणजे सारंग आणि क्षिप्रा दोघांनाही त्याच कंपनीत नोकरी मिळाली; मात्र वेगवेगळ्या विभागांमध्ये. दोघेही कंपनीत रुजू झाले. आता कामानिमित्त भेटी होऊ लागल्या. दोघांमध्ये संपर्क वाढू लागला. छान मैत्री झाली. एक सोनेरी संध्याकाळ... आणि क्षिप्राने सारंगला विचारले, ''तुला आवडेल माझी जन्मभराची साथ?'' सारंगलाही ती आवडू लागली होती. त्याचा जीव जडला होता तिच्यावर.. तो खुशीने 'हो' म्हणाला. त्याच्या घरी फक्त आई होती, वडील लहानपणीच गेलेले. त्यामुळे फारसा प्रश्न नव्हताच. दोघांनी रजिस्टर लग्न केले आणि क्षिप्रा त्याच्या घरी आली. त्याच्या दोन बेडरूम फ्लॅटमध्ये तो आणि त्याची आई राहत होते.

दुसऱ्या दिवशीची सकाळ. सारंगच्या फ्लॅटची घंटी वाजली. दारात क्षिप्राचे वडील दादासाहेब जहागीरदार उभे होते... रागारागाने दोघांकडे बघत. क्षिप्रा धास्तावून उठली आणि म्हणाली, ''बाबा, तुम्ही इथे?'' ''क्षिप्रा, स्वतःच्या मनाने एवढे मोठे पाऊल उचलताना तुला मला कळवावेसेदेखील वाटले नाही?'' त्यांनी जरब दाखवीत प्रश्न केला. सारंग हादरला... अरे बापरे! ही तर म्हणाली मला कोणीच नाही, मी एकटीच आहे या जगात आणि मी विश्वास ठेवला.. ही या कंपनीच्या मालकाची मुलगी आहे. मला वाटले असेल एक सारखे आडनाव. तो उठून उभा राहिला; बाप-लेक वाद घालू लागले. सारंगची आई मध्ये पडली, ''चला आपण मोठ्या मनाने माफ करूया, दोघांना! दोघेही सज्ञान आहेत. त्यांना आशीर्वाद देऊया!'' ''मला मान्य नाही हा संबंध. तू घरी चल, आताच्या आता.'' ते ओरडले. क्षणार्धात साऱ्या आनंदाचा विचका झाला होता. मात्र, क्षिप्रा घरी जायला तयार नव्हती. रागाने तणतणत ते घरी गेले. इकडे मात्र सारंगचे धाबे दणाणले. सारंग म्हणाला, ''क्षिप्रा, तू का खोटं बोललीस माझ्याशी. सगळं सांगितलं का नाहीस, तुझा माझ्यावर विश्वास नव्हता का?'' क्षिप्रा म्हणाली, ''माझ्या वडिलांनी कधीही परवानगी दिली नसती, तुझ्याशी लग्न करण्याची. मला त्यांच्या बऱ्याच गोष्टी पटत नाहीत, पण काय करणार? त्यांनाही माझ्याशिवाय कोणी नाही म्हणून मी ह्या सोनेरी पिंजऱ्यात अडकले होते. तू नको पडूस आमच्या मध्ये.'' सारंग धास्तावला. आता त्याला त्या कंपनीत काम करायचा ताण येऊ लागला होता. क्षिप्रा दुसऱ्या विभागात असल्यामुळे ते कंपनीमध्ये एकमेकांपासून वेगळे राहू शकत होते. दोघांच्या आर्थिक परिस्थितीत जमीन- अस्मानाचा फरक असल्यामुळे क्षिप्राला त्या छोट्या जागेत वावर करणे कठीण होऊ लागले. एक दिवस घाईघाईने कॉफी करताना, सवय नसल्यामुळे गरम दूध तिच्या हातावर सांडले आणि तिचा हात भाजला. ती जोरात किंचाळली आणि बाहेर पळाली. तिच्या मागे सारंगही धावला. तिच्या हाताला फोड आला होता. सारंगने तिच्या हाताला औषध लावले आणि ती घळघळा रडू लागली. सारंगची आई शक्य असेल तेवढा समतोल साधण्याचा प्रयत्न करू लागली.

क्षिप्राच्या वडिलांना न आवडलेलं हे लग्न, त्यांचीच कंपनी, तिचे लहानपणापासूनचे उच्च राहणीमान, सारंग तणावात राहू लागला. त्याची घरी आणि बाहेर दोन्हीकडे ओढाताण होऊ लागली. तो दुसरीकडे नोकरी शोधण्याचा प्रयत्न करू लागला. मात्र क्षिप्राला ते आवडत नसे... आहे ना आपली कंपनी. माझ्याशिवाय कोण आहे पप्पांचे? असे म्हणत ती त्याला मोडता घालत असे. त्याला एकूणच सारं प्रकरण जड व्हायला लागलं होतं. जीवनाची फरफट होत दोन वर्षे निघाली आणि एक दिवस क्षिप्राची गोड बातमी समजली. सारेच आनंदले. सातव्या महिन्यात क्षिप्राचे पप्पा तिला गोड बोलून घरी घेऊन गेले. तिथे नोकरचाकर, क्षिप्राच्या दिमतीला एक २४ तासांची मदतनीस, असे सारे काही होते. सारंग आणि त्याच्या आईने मनाला समजाविले... ''बरोबर आहे. मुलींना अशावेळी माहेरी राहायला बरे वाटते.'' साजिरी-गोजिरी एक सुंदर परी त्यांच्या घरी अवतरली. नाव ठेवले साक्षी. तीन महिने झाले आणि सारंगला वाटले की, आता क्षिप्राने घरी येऊन जावे. पण ती तर खुशीने अडकली होती तिच्या पप्पांच्या सोनेरी जाळ्यात. ''छोट्या साक्षीला तुझी गरज आहे. सध्या तू नोकरी सोडून दे, ती मोठी झाली की पुन्हा करता येईल.'' पप्पांनी तिला समजाविले आणि क्षिप्राने नोकरी सोडली...आणि एक दिवस सारंगला एक नोटीस मिळाली की, त्याने ताबडतोब तिच्या घरी राहायला यावे. स्वाभिमानी सारंगने ठाम नकार दिला. पुढच्या १५ दिवसांनंतर सारंगला क्षिप्राने घटस्फोटाची नोटीस पाठविली. त्यात अनेक खोट्या व अवास्तव तक्रारी नमूद केल्या होत्या आणि कहर म्हणजे (पान ६ वर)

वळणावरच्या नोंदी
स्वाती काळे



# कर्टिअसचा भारत

क्लोज गजेत्या अलेक्झांडरवर अनेक तत्कालीन इतिहासकारांनी आणि येथे आलेल्या राजदूतांनी तसेच प्रवाशांनी पुस्तके लिहिली. ही पुस्तके महत्त्वाची यासाठी की, यातून प्राचीन भारतीय संस्कृतीचे भग्नावशेष आपल्याला पाहायला मिळतात. यातील काही जणांनी हा इतिहास घडताना प्रत्यक्ष पाहिला किंवा त्यावेळच्या घटनांचे प्राथमिक स्रोत त्यांच्याजवळ होते. क्विंटस कर्टिअस् रुफूज हा पहिल्या शतकातील रोमन इतिहासकार. त्याने पहिल्या शतकात 'अलेक्झांडरचा इतिहास' या ग्रंथाचे १० खंड लिहिले. इतिहासाचे पुस्तक वाचण्याऐवजी आपण प्रत्यक्ष प्रवास वर्णन वाचतो आहे की काय, अशी भावना हे खंड वाचताना आपल्याला होते. त्याने लिहिलेल्या १० खंडातील दोन खंड गहाळ झाले आहेत. पण त्याच्या लेखनशैलीतून निर्माण झालेले प्राचीन भारताचे चित्रमय वर्णन त्याकाळच्या एखाद्या प्रवाश्याच्या नोंदवहीतून घेतलेले वाटते किंवा काय माहीत, हा बहाद्दर स्वतःच हिंदकुशच्या खडतर वाटा धुंडाळीत येथपर्यंत पोचला असावा. त्याच्या चित्रमय शैलीमुळेच कर्टिअस रुफूज हा पहिल्या शतकातील रोमन इतिहासकार महत्त्वाचा ठरतो.

कर्टिअसने प्राचीन भारताचे वर्णन करताना त्याच्या उंच-सखल पृष्ठभागांबद्दल नोंद केलेली आहे. तो म्हणतो की, येथे उंच डोंगररांगा आहेतच; इतर सपाट प्रदेश मात्र हिंदकुश पर्वतरांगांमधून आलेल्या नद्यांनी सुजलाम सुफलाम केलेला आहे. सिंधू नदीचे पाणी इतर नद्यांपेक्षा थंड आहे, असे वर्णन त्याने करून ठेवले आहे. गंगा नदी पूर्वेकडे कशी वाहत येते, याचेही वर्णन केलेले आहे. सिंधू नदी तिच्या तीरावरील महाकाय वृक्षांना गिळंकृत करीत धावते. मऊ मातीत तिचे पाणी संथ खोऱ्यात विसावतं आणि पाण्यामध्ये चिमुकली बेटं तयार होतात. चिनाब नदी भेटल्यावर तर तिला आनंदाचे भरते येते आणि ती खळखळून हसू लागते. गंगा नदी शांत आहे. प्रगल्भ आहे. पण तिची यमुनेशी भेट होते तेव्हा मात्र भावनांचा उद्रेक होतो. ब्रह्मपुत्रेबद्दल कर्टिअसने कमी माहिती दिली आहे, पण तिथे मगरींबरोबर महाकाय डॉल्फिन मासेही असतात, असे तो म्हणतो. रावी नदीचे पाणी गावकरी शेतीसाठी वापरतात. कर्टिअस म्हणतो, अळशी किंवा जवस वनस्पतीपासून येथील लोक वस्त्र विणतात. झाडाच्या खोडामधील अतिशय नाजूक अशा पृष्ठभागापासून कागद तयार करतात. येथील पक्ष्यांना माणसांची भाषा बोलायला सहज जमते. येथील प्राणीही वेगळ्या प्रकारचे आहेत.

भारतातले हे प्राणी सहसा बाहेरच्या देशांमध्ये दिसत नाहीत. कर्टिअस म्हणतो, येथील हत्ती आफ्रिकेतील हत्तींपेक्षा जास्त ताकदवान आहेत. येथील नद्या सुवर्णवाहिनी आहेत. हवेच्या झोक्यामुळे हिंदकळणाऱ्या पाण्यात सुवर्णकण चमकताना दिसतात. समुद्राच्या लाटाही किनाऱ्यावर माणिकमोती फेकतात. मौल्यवान दागिने बनविण्यासाठी त्यांचा उपयोग होतो. कर्टिअसचा एक मोठा सिद्धांत असा की, माणसाचा स्वभाव आणि चारित्र्य त्याच्या देशाचे स्थान आणि हवामानावरून ठरते. भारतात पायघोळ तलम वस्त्र, पादत्राणे आणि थंडी-उन्हापासून संरक्षण मिळण्यासाठी डोक्याला सुती कपडा गुंडाळावा लागतोच. या पोशाखामुळेच त्याचे ऊनवाऱ्यापासून रक्षण होते. प्रत्येक सामान्य माणूस कानात बाळी घालतो. श्रीमंत व्यक्ती मनगट दंडावर सोन्याचे 'कडे' घालतो.


कर्टिअसचे निरीक्षण सूक्ष्म आहे. तो म्हणतो, येथील लोक नेहमीच कंगव्याने केस विंचरतात, पण कापत नाहीत. त्यांची दाढीही ते कधीच कापत नाहीत. कर्टिअस पुढे म्हणतो, भारतातील राजांच्या राहणीमानाचे कसे वर्णन करू! जेव्हा राजा प्रजेला भेटायला जातो तेव्हा त्याचे सेवक त्याच्या वाटेवर जागोजागी चांदीची धूपदाणी आणि उदबत्ती फिरवितात. सगळीकडे धुपाचा मंद सुवास दरवळत असतो. राजा जणू सुगंधाच्या वाटेवरूनच प्रजेला भेटायला जातो. सोन्याच्या पालखीत मागे रेलून बसलेला राजा प्रजेचे अभिवादन स्वीकारतो. या सोन्याच्या पालखीला मोतिमाणकांनी सजवलेले असते. राजाने तलम वस्त्र परिधान केले असतात. या वस्त्रावर सोन्याच्या जाळीने आणि जांभळ्या रंगाने कलाकुसर केली असते. पालखीच्या मागून शस्त्रधारी सुरक्षारक्षक चालत असतात. काही जणांनी हातात झाडाच्या फांद्या घेतल्या असतात. फांद्यांवर पक्षी चिवचिव करीत असतात. कुठे काय बोलायचे हे या पक्ष्यांना शिकवलेले असते. राजाचा राजवाडा सोनेरी खांबांनी सुशोभित असतो. त्याच्यावर चंदेरी रंगाने आणि इतर अद्भुत रंगांनी पक्ष्यांची चित्रे काढली असतात. राजवाडा सर्व बाजूंनी प्रजेसाठी उघडा ठेवला असतो. राजा त्याचे केस विंचरत असेल किंवा इतर वैयक्तिक कामे जरी करीत असेल तरी तो त्यावेळी राजदूतांचे म्हणणे ऐकतो आणि प्रजेला न्याय देतो. त्यानंतर शिकारीसाठी तो लवाजम्यासकट जातो. राजा स्वार असलेले हत्तीघोडे नखशिखांत सुवर्णाने मढलेले असतात. कर्टिअसने असेही लिहिले आहे की, वृक्षांना कापल्यावर मृत्युदंडाची शिक्षा होते. प्राचीन भारतात वृक्ष म्हणजे देवपुरुष होते. कर्टिअसने वर्णन केलेले पोरस आणि अलेक्झांडरचे युद्ध चित्रासारखे डोळ्यासमोर उभे राहते. समोर झेलम नदी आणि पलीकडे पोरस राजाच्या सैन्याचा महासागर पाहून अलेक्झांडर आणि त्याचे सैन्य दडपून गेले होते. अलेक्झांडरला माहीत होते की, सैनिकांना शस्त्र डोक्यावर घेऊन पोहत झेलम नदी पार करणे फार कठीण काम आहे. नदीमध्ये महाकाय वृक्षांनी वेढलेले बेट होते. या बेटामध्ये एक मोठा खोल खड्डा होता. यात अलेक्झांडरचे संपूर्ण सैन्य सामावले आणि शत्रूच्या पहाऱ्यापासून त्यांना संरक्षण मिळाले. इकडे झेलमच्या तीरावर त्याने टोलेमीला निवडक घोडदळासकट सज्ज राहण्यास सांगितले. खुद्द अलेक्झांडरचा तंबूदेखील त्याने वेगळ्या दिशेला हलविला. 'अट्टालस' नावाच्या त्याच्यासारख्या दिसणाऱ्या सैनिकाला त्याची राजवस्त्रे नेसवली आणि तंबूसमोर येरझारा घालण्यास सांगितले. आता पोरसची खात्री पटली होती की, अलेक्झांडरचा इरादा झेलम पार करून त्याच्यावर आक्रमण करण्याचा दिसत नाही. पोरसला शेवटपर्यंत कल्पनाच आली नाही की, अलेक्झांडरचे बहुतांशी सैनिक झेलम नदीत बेटावर दबा धरून बसले आहेत. पोरसला अगोदर वाटले की, मित्रपक्षाचे सैन्यच त्याच्याजवळ सरकते आहे. पण ढग विरळ झाल्यावर लक्षात आले की, शत्रुसैन्य त्याच्या अगदी निकट आले आहे. त्याने चार हजार घोडे आणि शंभर रथ आक्रमण थोपविण्यासाठी पाठवले, पण उपयोग झाला नाही. कारण रथाची चाके चिखलात रुतू लागली आणि घोड्यांचे पाय निसरड्या जमिनीवरून निसटू लागले. पोरसला चारी दिशांनी बाण लागत होते आणि शेवटी घायाळ होऊन तो त्याच्या हत्तीवरून खाली पडू लागला. हत्ती हळुवारपणे खाली बसला. पण जेव्हा राजहत्ती खाली बसतो तेव्हा इतर सर्व हत्तींना खाली बसण्यास शिकवले जाते आणि हीच शिकवण रणांगणात अत्यंत घातक ठरली. राजहत्ती बसलेला पाहून रणांगणावरील पोरसकडील इतर सर्व हत्ती खाली बसले. अलेक्झांडरला वाटले, पोरस राजा मेला आहे. त्याने त्याची राजवस्त्रे, कवच काढण्यास सुरुवात केली. पण राजहत्तीला माहिती होते की, त्याचा मालक अजून मेला नाही. घायाळ झालेल्या त्या हत्तीने शेकडो सैनिकांना धूळ चारीत पुन्हा पोरस राजाला पाठीवर घेतले. तो गतप्राण झाल्यावर घायाळ पोरसला प्रतिकार करण्याचे त्राण उरले नव्हते. कर्टिअसच्या लिखाणात सूक्ष्म बारकावे आहेत. शैली चित्रमय आहे. पहिल्या शतकातील हा रोमन इतिहासकार भारतीय इतिहासातले रोमहर्षक वळण बारीकसारीक तपशिलासह सादर करतो. अनेकदा असे वाटते की, हा माणूस प्रत्यक्ष झेलम नदीच्या किनारीच उभा आहे. त्याचे लिखाण प्रवासी नोंदीप्रमाणे प्रभावी आहे. त्याने कधी भारत पाहिलाही नसेल. पण पोरसचा स्वाभिमान आणि अलेक्झांडरचा दुर्दम्य आत्मविश्वास त्याला उमजला आहे आणि त्यामुळेच प्राचीन भारताचा प्रवास त्याच्या चित्रलिपीतून समजून घेणे, ही एक आनंदपर्वणीच आहे.

विवेचन
श्रीरंग श्री. हिर्लेकर

# तंत्रयुक्ती : ग्रंथ वाचनाची शास्त्रीय पद्धत

'कर्मापेक्षा बुद्धी श्रेष्ठ' हे कृष्णाचे शब्द ऐकून आपल्या नियत कर्मापासून दूर पळणारा अर्जुन चिडून म्हणतो- **'व्यामिश्रेणेव वाक्येन बुद्धिं मोहयसीव मे। तदेकं वद निश्चित्य येन श्रेयोऽहमाप्नुयात।।'** म्हणजे एक काय ते सांग. उगीच भ्रमीत करू नकोस. अनेकदा शास्त्रातील परस्पर विरोधी वाटणाऱ्या वचनांमागची कारणे नीट न उमगल्यामुळे वाचकाचा वैचारिक गोंधळ होतो. एक हत्ती आणि पाच आंधळे या कथेसारखे होते. प्रत्येक जण आपापल्या बौद्धिक आकलनाप्रमाणे हत्तीचे वर्णन करतात. याचसाठी ग्रंथ फक्त शब्दांनी वाचावयाचा नसतो तर युक्तीने उलगडून घ्यायचा असतो आणि तो उकलून घेण्याची शास्त्रीय पद्धत म्हणजेच तंत्रयुक्ती किंवा ग्रंथ लावणे अर्थात ज्ञानभांडाराची किल्ली. कारण अनेकदा शब्द समजतो; पण त्यामागचा गूढार्थ समजत नाही. संदर्भ बघितला नाही तर अर्थाचा अनर्थ होतो. म्हणून तंत्रयुक्तीला दुर्लक्षून ग्रंथ वाचणे म्हणजे वापरण्याचे कौशल्य किंवा शास्त्र माहीत नसता शस्त्राचा उपयोग करणे, असे चरकाचार्य म्हणतात. या नावाचा काही स्वतंत्र ग्रंथ आहे का, असल्यास त्याचा काल, कर्ता कोण हे निश्चितपणे सांगता येत नसले, तरी तंत्रयुक्तींची योजना कौटिल्य आणि आयुर्वेदातील चरक, सुश्रुत, वाग्भट, चक्रपाणी आणि डल्हणांनी आपापल्या ग्रंथात व्यापक प्रमाणावर केल्याचे आढळते. नागपूर विद्यापीठाने आयुर्वेद अभ्यासक्रमात तंत्रयुक्ती विषयाचा समावेशच केला होता.

'उपायान् इति शास्त्रोपायान् तंत्रयुक्तीरूपान्' अशी त्याची महती सांगितली जाते. आयुर्वेद आणि कौटिलीय अर्थशास्त्रातील न्यायशास्त्र विभागापुरतेच तंत्रयुक्तीचे क्षेत्र मर्यादित नसून सर्वच शास्त्रांच्या अभ्यासाकरिता याची उपयुक्तता आहे. एक उदाहरण बघूसमजा 'मामेकं शरणं व्रज:' या नावाचा ग्रंथ वाचावयास घेतला तर इतक्या साध्या शब्दांवर भाष्य करण्यापूर्वी 'माम्' मधील मी कोण? मीच एकमेव का? कोणत्या संदर्भात एकमेव आहे? मग इतर सर्व गौण समजावेत का इत्यादी समजण्यासाठी आपल्याला ग्रंथातील प्रकरण, उपक्रम, उपसंहार, पुनरुक्ती, हेतू आणि अजूनही अनेक मुद्यांचा विचार करावा लागतो. यासाठीच सर्वसाधारणपणे सुमारे ३० ते ३९ युक्ती आढळतात. संख्या कमी-जास्त असण्याचे कारण



म्हणजे काही मुद्यांतूनच पुढील उपमुद्दे उत्पन्न झाले आहेत.

**आपण त्यांचा क्रमशः विचार करू.**

**१) उपक्रम:** ग्रंथाच्या आरंभावरून विषय काय असावा ते ओळखणे. **२) उपसंहार:** शेवट आणि आरंभ बघून ग्रंथ केंद्रबिंदूशी समतोल आहे किंवा विषय भरकटला हे समजते. **३)अभ्यास:** पुनरुक्ती झालेला विशिष्ट मुद्दा प्रतिपाद्य उपक्रमासाठी कसा महत्त्वाचा आहे ते बघणे. **४) अपूर्वता:** विवेचनात उपस्थित झालेल्या नवीन मुद्यांवरून हेतू समजतो. **५) परिणाम:** एखाद्या उदाहरणावरून त्याच्या पालनाचे फळ. **६) अर्थवाद:** स्तुती किंवा निंदेवरून मुख्य विषयाला बळ ओळखणे. **७) उपपत्ती:** तर्क मार्गाने किंवा कारणांवरून हे असेच का हे समजणे. **८) लिङ किंवा संकेत:** यावरून सूचक अर्थ ओळखणे. **९) वाक्य:** संपूर्ण वाक्यातून एकच अर्थ काढणे. **१०) प्रकरण:** विधानांचा संदर्भ बघणे. **११) स्थान:** ग्रंथातील स्थानानुसार किंवा अध्यायानुसार अर्थ बदलतो का हे बघणे. **१२) समाख्या:** म्हणजे शीर्षकावरून अर्थबोध होणे. **१३) योग:** शब्दांच्या किंवा अध्यायांच्या संयोगाने अर्थ लावणे. **१४) विभाग:** पूर्णांशाने न बघता विभाग पाडून अर्थ स्पष्ट होणे. **१५) विकल्प:** म्हणजे पर्याय. हे किंवा ते असे आढळते का? **१६) निश्चय:** अंतिम ठाम निर्णय. उदा. आपल्या पहिल्या **'मामेकं शरणं व्रज।'** या ग्रंथाला धरून गीतेचा शेवट बघू. 'सर्व धर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज।' सर्व धर्मांचा त्याग करून माझ्या याच एकमेव मार्गाचा अवलंब कर. **१७) आदेश:** **१८) निषेध:** काय करावे आणि काय करू नये ते सांगणे. उदा. तैत्तिरिय उपनिषदाच्या शिक्षावल्लीत गुरू सत्यं वद, धर्मं चर असा एकत्र आदेश आणि स्वाध्यायान्मा प्रमदः असा निषेध करतात. **१९) अनुमिती किंवा अर्थात्पत्ती आढळते का?:** उदा. तो उपवास करतो पण जाड्या आहे, या वाक्याचा अर्थ असा होतो की, तो चोरून खातो. **२०) संशय:** शंका अर्थात एकापेक्षा अधिक अर्थ व्यक्त होणे. **२१) समाधान:** शंकानिरसन केले आहे का? योग्य अर्थापर्यंत पोचणे. **२२) उदाहरण:** दिलेले दृष्टांत समजून घेणे. **२३) प्रत्यूह:** अडथळा किंवा विरोधी मत. **२४) अतिदेश:** एका गोष्टीचा नियम दुसरीकडे लावून पाहणे किंवा समानतेवर विस्तार बघणे. **२५) अनुप्रयोग:** सिद्धांताचा प्रत्यक्ष व्यवहारात उपयोग. **२६) परिहार:** अपवाद किंवा टाळण्याची पद्धत- नियमांचा अपवाद बघणे. **२७) व्याख्या:** स्पष्ट परिभाषा, शब्दाचा अचूक अर्थ लावणे. **२८) हेत्वर्थ:** कारणांवरून असेच का सांगितले? **२९) अपेक्षा:** एका शब्दाला दुसऱ्याची गरज का आहे हे बघत अपूर्ण अर्थ पूर्ण करणे. **३०) अन्वय-व्यतिरेक :** सहसंबंध आणि अभाव. उदा. हे असेल तर ते असते.

**(पान ६ वर)**

आनंद स्पदंन
डॉ. अविनाश मोहरील

# सांगीतिक आनंद प्रवास



काही वर्षांपूर्वी पूर्व विदर्भातील पांढरकवडा या गावी १२३ वर्षे जुन्या गणेशोत्सवामध्ये व्याख्यानासाठी जाण्याचा मला योग आला होता. नेहमीप्रमाणे यवतमाळला मित्र मंडळींच्या भेटी घेऊन एका मित्रासमवेत पांढरकवड्याला जाण्यासाठी गाडीने निघालो. निघण्यापूर्वीच मित्राने सूचना केली की, यवतमाळ ते पांढरकवडा हा रस्ता खूप खराब झाला आहे, मोठमोठे खड्डे पडलेले आहेत त्यामुळे काळजीपूर्वक गाडी चालव.

माझ्या ड्रायव्हिंगवर माझा विश्वास असला, तरी मी जरा सावध झालो होतो. यवतमाळातून निघतानाच एका ठिकाणी रस्त्याच्या मधोमध कुणीतरी गाडी पार्क केल्यामुळे निर्माण झालेल्या रहदारीच्या खोळंब्यामुळे प्रवासाची सुरुवात ताणयुक्तच झाली. पण ताण कमी करण्याच्या दृष्टीने गाडी रस्त्याच्या मधोमध पार्क करण्यामागे त्या गाडीवाल्याचे काहीतरी लॉजिक असेल आणि ते लॉजिक समजावून घेण्यासाठी आपण आपले रक्त का जाळून घ्यावे, असा विचार आम्ही दोघांनीही केला. प्रवासाची ही तर सुरुवात होती. अशा प्रकारे ताण घेत प्रवास करण्यापेक्षा काहीतरी उपाय करावा, हा विचार आम्हा दोघांच्याही मनात येतो न येतो तोच, माझ्या गाडीत नेहमी उपलब्ध असलेल्या सुंदर गाण्यांच्या कलेक्शनमधील लताबाईंचे 'आपकी नज़रोंने समजा...' हे गाणे लागले.

मला आणि माझ्या मित्रालाही गाणे ऐकण्याची आणि त्याचा मनसोक्त आस्वाद घेण्याची सवय असल्याने सहजच आम्ही लताबाईंच्या त्या अत्यंत सुमधूर गाण्यात रमून गेलो. प्रेमाची आणि समर्पणाची उत्कट अनुभूती ते गाणे ऐकताना जाणवते. आपल्या प्रियकरावर निस्सीम प्रेम करीत असलेल्या प्रेयसीच्या मनातील सुरेख भाव लताबाईंनी किती समर्पकतेने पोहोचविण्याचा प्रयत्न त्या गाण्यात केलाय या पद्धतीची चर्चा आम्ही गाणे ऐकतानाच करीत होतो. लताबाईंचा लागणारा सूर आणि त्या सुरांमधून जाणवलेल्या भावना या मनात स्थिरावेपर्यंत यवतमाळचे अडथळ्यांचे ट्रॅफीक ओलांडून आम्ही गावाच्या बाहेर पडलो होतो. अगदी सुरुवातीला जाणवलेला त्या रस्त्याच्या मधोमध उभ्या असलेल्या गाडीमुळे झालेला त्रास नंतर झालाच नाही. कारण लताबाई गात होत्या. पुढे निघालो. रस्ता जरा बरा होता, परंतु लगेच मित्राने सूचना केली. सावकाश... रस्ता खराब आहे. अचानक रस्त्यावर मध्ये मध्ये नुकतेच बनवून मोठमोठे पॅचेस दिसू लागले. ते चुकवित मी गाडी चालवू लागलो आणि अचानक... रस्त्यांवरील उखडून गेलेला एक मोठा पॅच चुकवतानाच राहुल देव बर्मन यांच्या संगीताने नटलेले आणि थेट व्हेनिसच्या होडीवर हेलकावे खाल्ल्याचा अनुभव देणारे नितांत सुंदर गीत सुरू झाले... 'दो लफ्जो की है, दिल की कहानी...' माझा मित्र मला म्हणाला, बघ, सुरुवातीचे संगीत संपल्यावर आशाबाईंनी काय सुंदर टेक घेतलाय. त्या सुरांच्या सुंदर टेकची मी वाट बघत राहिलो आणि मग ते सुंदर गाणे सुरू झाले.

आशा भोसलेंच्या जादुई आवाजाने आम्हा दोघांना थेट व्हेनिसमध्ये नेऊन ठेवले. त्या गाण्याची ट्युन, त्या गाण्याची सुंदर लय आणि मनाला संपूर्णपणे रीलॅक्स करणारे त्या गाण्याचे शब्द... सगळंच अफलातून.. सहा मिनिटांचे ते गाणे सुरू असेपर्यंत आम्ही दोघेही त्या स्वरानंदाच्या हेलकाव्यावर डोलत होतो. गाणे संपले तेव्हा जाणवले की, साधारण चार किलोमीटरचा तो उखडलेल्या पॅचेसचा रस्ता मागे पडला आणि त्यावरून जातानाची खडखड आम्हाला व्हेनिसच्या सूरमयी वातावरणामुळे जाणवलीदेखील नाही. जोडमोहा नावाचे गाव ओलांडून आम्ही पुढे निघालो. आता काही वेळ रस्ता चांगला आहे, असे मित्राने सांगितले. नवी गाडी असल्याने मी जरा वेग वाढविला. पण वेगाचा आनंद फार काळ टिकला नाही.

मित्राची सूचना, आता तू आजपर्यंत अनुभवले नसतील इतके स्पीड ब्रेकर्स लागतील, त्यामुळे स्पीड आवर. आतापर्यंत चांगली ताशी १०० किमीच्या वेगाने जाणारी गाडी एकदम ताशी २० किमीच्या वेगावर येऊन पोहोचली. स्पीड ब्रेकर्सही केवढे मोठे. पण त्यांचा विचार मनात येण्याआधीच माझ्या मित्राने न ऐकलेले आणि मला फारच आवडणारे एका अगदी नव्या चित्रपटातील गाणे लागले...

नव्या चित्रपटांमध्येही काही गाणी खरोखरीच गोड असतात हे विधान सिद्ध करणारे एक गाणे लागले. ते गाणे लागल्यावर मित्राला मी म्हणालो, आता हे गाणे शांतपणे डोळे मिटून ऐक. गाणे सुरू झाले. श्रेया घोषाल या अत्यंत प्रतिभावान गायिकेच्या गोड आवाजातील ते गाणे...' ये मोह मोह के धागे, तेरी उंगलीयोंसे जा उलझे, कोई टोह टोह ना लागे, किस तरह गिरह ये सुलझे...' ते अप्रतिम गाणे आम्ही दोघेही शांतपणे ऐकायला लागलो.

केवळ ज्या ज्या ठिकाणी श्रेया घोषालने सुंदर जागा घेतल्या त्या ठिकाणी 'क्या बात हैऽ'ची दाद एकाच वेळी दिली जात होती. एव्हाना बाहेर अंधार पडला होता. पण त्या गाण्यातील सुंदर सुरावटींसोबत रममाण होताना काहीच जाणवत नव्हते. गाणे संपताक्षणी दोघेही एकदम म्हणालो.'यार पुन्हा ऐकायचे गाणे?' परत एकदा तेच गाणे ऐकून फार आनंद मिळाला... तेवढ्या वेळात रस्त्यावरील अक्षरशः त्रस्त करून टाकणारे सर्व स्पीड ब्रेकर्स संपले होते. गाणे ऐकण्यात आम्ही एवढे गुंग होतो की, स्पीड ब्रेकर्सवर स्पीड कसा कमी होत होता, कसे धक्के बसत होते याकडे आमचे लक्षच राहिले नाही...

प्रवास सुरू राहिला.. त्रास न जाणवता. पुढे उमरी नावाच्या गावाजवळ मात्र मित्राने तीव्र इशारा दिला. या पुलावरून अतिशय हळू गाडी घे. येथे रस्ताच नाही. केवळ मोठे मोठे खड्डेच आहेत. समोर साधारण एखाद किलोमीटर सर्वात वाईट रस्ता आहे आणि तो सर्वात वाईट रस्ता सुरू झाला. मोठमोठे खड्डे चुकविणे अगदीच अशक्य होते, गाडी धडाधड आवाज करू लागली; परंतु या आवाजाला दाबून टाकणारा एक आवाज कानी पडला... परत लताबाईंचा. लताबाईंचा आर्त सूर, पण यावेळी सोबतीला गुलज़ारचे शब्द. मग काय बघावे? 'सिली हवाँ छु गयी, सिला बदन छिल गया, निली नदी के परे, गिला सा चाँद खिल गया...'

'लिबास' चित्रपटातील हे गाणे सुरू झाले आणि गुलज़ार भक्त असलेले आम्ही दोघेही वाङ्मयाचे अभ्यासक, त्या गाण्यातील काव्याचा मनसोक्त आस्वाद घेऊ लागलो. 'सिली' या शब्दाचा नेमका अर्थ काय असावा याबद्दल चर्चा सुरू झाली. गुलज़ारने हा शब्द 'लेकीन' चित्रपटातील गाण्यातही वापरला आहे. त्याचा नेमका काय अर्थ असावा वगैरे बोलणे सुरू झाले. अशा गप्पा रंगलेल्या असतानाच मित्र म्हणाला, आपण पांढरकवड्यात पोहोचलो.

प्रचंड खड्ड्यांचा रस्ता आणि पुढे सात किलोमीटरचे अंतर कधी संपले ते कळलेच नाही. खरे सांगायचे तर त्या सूरमयी मैफलीमुळे ७० किलोमीटरचा अत्यंत खडबडीत रस्ता कोणताही ताण न येता पार झाला, नव्हे आनंद प्रवासाचे सुख प्राप्त करून गेला. आपल्या प्रत्येकाच्या जीवनप्रवासात ताण निर्माण करणारे, कधी कधी तर जीवन नकोसे करून टाकणारे प्रसंग सामोरे येऊन ठाकतात. प्रवास करायचाच असतो आणि त्या प्रसंगांना किंवा परिस्थितींना टाळताही येत नाही. मग उपाय एकच, त्या सर्व प्रसंगांना निदान काही काळ दुर्लक्षित करता येईल इतके सक्षम माध्यम आपल्याकडे उपलब्ध असायला हवे. ज्यांना सुंदर संगीताचा आस्वाद घेता येतो ते भाग्यवान असतात. संगीताच्या शक्तीमुळे व निखळ आस्वादामुळे ताणयुक्त जीवनही सुखकर बनू शकते. संगीताचा निखळ आस्वाद ही एक साधनाच आहे. संगीताचा एक एक सूर आपल्याला आपल्या अस्तित्वाची खरी ओळख करून देतो आणि एक महत्त्वाची बाब समजावतो.

माणसाच्या आयुष्यातील ताणयुक्त प्रसंग त्रासदायक जरी असले, तरी त्यांना एक विशिष्ट मर्यादा आहे; परंतु माणसाच्या जीवनात आनंदनिर्मितीची प्रक्रिया मात्र अमर्याद स्वरूपाची आहे. त्याची केवळ ओळख पटायला हवी. श्रेष्ठ संगीत ती ओळख पटवून देते.

आकलन डॉ. शुभांगी पारकर

# प्राणिजगतातील एकतेचा आदर्श



२१ व्या शतकातील 'डिजिटल बर्नआऊट'पासून ते कोलमडलेल्या नागरी पायाभूत सुविधांपर्यंतच्या 'अदृश्य भारांना' सामोरे जात असताना, प्राणीजगत आपल्याला सामूहिक आरोग्याचा एक सखोल आराखडा देते. हे आपल्याला शिकवते की 'एकत्र येणे' ही केवळ सामाजिक निवड नाही, तर ती एक मूलभूत अस्तित्वाची जैविक गरज आहे.

**सोशल बफरिंग'चा मूक आधार**

संकटात सापडलेल्या हत्तीच्या पिल्लाला पाहून त्याचा कळप ज्या प्रकारे प्रतिसाद देतो, ते निसर्गातील सर्वांत हृदयस्पर्शी दृश्यांपैकी एक आहे. जेव्हा एखादे लहान पिल्लू घाबरलेले किंवा जखमी असते, तेव्हा त्याला केवळ शारीरिक मदत मिळत नाही, तर त्या पिल्लाच्या आजूबाजूचे प्रौढ हत्ती एक विशिष्ट लयीत आणि कमी कंपनांचा आवाज काढू लागतात. हा आवाज जमीन आणि हवेतून कंपनांच्या स्वरूपात प्रवाहित होतो. ते आपल्या सोंडेने त्या पिल्लाचे डोके, तोंड आणि पाठीला स्पर्श करून त्याला भावनिक धीर देतात. शास्त्रज्ञ याला 'सोशल बफरिंग' म्हणतात. संशोधनातून असे सिद्ध झाले आहे की, कळपाच्या केवळ अस्तित्वाच्या जाणिवेमुळे आणि स्पर्शाने, त्रस्त झालेल्या प्राण्यांच्या शरीरातील 'कोर्टिसोल' (ताण देणारे संप्रेरक) पातळी झपाट्याने खाली येते. तो कळप प्रभावीपणे त्या पीडितासाठी जणू 'बाह्य मज्जासंस्था' म्हणून काम करतो. कळपातील सर्व त्या मानसिक आघाताला एकमेकांमध्ये विभागून घेतात, जेणेकरून तो घाबरलेला एकटा जीव त्या ओझ्याखाली दबून जाऊ नये. माझ्या मानसिक उपचाराच्या अनुभवात, मला या 'राबलिंग'चा मानवी प्रतिध्वनी दिसतो. जेव्हा एखादे कुटुंब संकटाच्या वेळी एकत्र बसते किंवा जेव्हा एखादा आधार गट सामूहिक शांतता पाळतो, तेव्हा ते 'सोशल बफरिंग'च करत असतात.

**आधुनिक शहरी जीवनशैलीत अनेकदा 'स्वयंभू' असल्याबद्दल व्यक्तीचे कौतुक करतो. आपण राहण्यासाठी टॉवर्स बांधतो, जे आपल्याला खासगीपण देतात, आपण व्यावसायिक स्वातंत्र्याला महत्त्व देतो आणि वैयक्तिक संघर्षांना कोणालाही न सांगता सोसण्याचा प्रयत्न करतो. मात्र, आपण जर आफ्रिकेतील गवताळ प्रदेश किंवा महासागराच्या अथांग खोलीत डोकावले, तर निसर्ग आपल्याला एक वेगळीच गोष्ट सांगत असतो. निसर्गात 'स्वतंत्र' राहणे, म्हणजे मृत्यूला आमंत्रण असू शकते; तर 'परस्परावलंबित्व' हा जगण्याचा मूळ मंत्र आहे.**

आपण सस्तन प्राणी आहोत; जेव्हा आपण आपल्यासाठी 'सुरक्षित' वाटत असलेल्या समूहात असतो, तेव्हा आपल्या हृदयाचे ठोके एकमेकांशी जुळतात आणि आपली मज्जासंस्था शांत व्हायला लागते. याउलट, एकटेपणामुळे आपला मेंदू सतत भयभीत अवस्थेत राहतो, जणू काही आपण एखाद्या उघड्या माळावर शिकारी प्राण्यासमोर एकटेच असाहाय्य उभे आहोत.

**मधमाशांची लोकशाही : अहंकाराशिवाय समन्वय**

हजारो जीव स्वतःच्या सवयीनुसार वागताना एखाद्या हुकूमशहाच्या आदेशाशिवाय एकजुटीने कसे काय वागू शकतात? ते विखुरलेले किंवा विस्कलेले का वाटत नाहीत? जेव्हा मधमाशांची एखादी वसाहत त्यांच्या पोळ्यापेक्षा मोठी होते, तेव्हा 'स्काऊट माश्या' नवीन घराच्या शोधात बाहेर पडतात. शोधून परत आल्यावर त्या 'वॅगल डान्स' करून त्यांना मिळालेल्या ठिकाणांची माहिती देतात. इतर माश्या त्यांचे बारकाईने निरीक्षण करतात, मग त्या जागांवर जाऊन पाहतात आणि पटले, तरच त्या डान्समध्ये सामील होतात. या मधमाशा माझे ठिकाण श्रेष्ठ की तुझे, यावरून भांडत बसत नाहीत. त्या 'कोरम सेन्सिंग' नावाची प्रणाली वापरतात. एकदा का एका विशिष्ट ठिकाणासाठी ठरावीक संख्येने माश्या नाचू लागल्या की, संपूर्ण थवा एकत्र तिथे स्थलांतरित होतो. ही एक विकेंद्रित लोकशाही आहे, जिथे सर्वांत उत्तम विधायक कल्पनेचा विजय होतो; सर्वांत मोठ्या आवाजाचा नाही.

**स्टर्लिंग पक्ष्यांचे गुपित : साताचा नियम**

स्टर्लिंग पक्ष्यांचे हजारो थवे आकाशात ढगासारखे आकार बदलत उडताना पाहून आश्चर्य वाटते की, ते एकमेकांवर आदळत कसे नाहीत आणि त्यांचा आकार कसा काय शिस्तीत टिकून राहतो? या थव्याचे नेतृत्व कोण करत असते? आश्चर्य वाटेल, याचे उत्तर आहे, कोणीही करत नाही. गणितीय प्रारूपांनी असे दाखवून दिले आहे की, प्रत्येक स्टर्लिंग पक्षी एका सोप्या नियमाचे पालन करतो, तुमच्या जवळच्या सात शेजाऱ्यावर लक्ष ठेवा! केवळ आपल्या जवळच्या सात पक्ष्यांशी जोडून राहिल्यामुळे, ते पक्षी एक प्रचंड आणि एकसंध हालचाल तयार करतात. शहरी लवचिकतेसाठी हा एक महत्त्वाचा धडा आहे. वाहतुककोंडी, प्रदूषण किंवा पाणीटंचाई अशा शहराच्या 'मोठ्या' समस्यांमुळे आपण अनेकदा हतबल होतो. पण, स्टर्लिंग पक्षी आपल्याला शिकवतात की आपल्याला संपूर्ण 'ढगाचे' व्यवस्थापन करण्याची गरज नाही. जर इमारतीतील प्रत्येक रहिवासी किंवा कर्मचार्यांमधील प्रत्येक सदस्य आपल्या 'जवळच्या सात' लोकांशी प्रेमाने आणि सहकार्याने वागला, तर समाजाचा हा संपूर्ण थवा सुरक्षितपणे उडू शकतो. 'एकत्र येणे' ही एक स्थानिक कृती आहे, जिचा जागतिक प्रभाव पडतो.

**सामाजिक विधींचा 'जैविक डिंक'**

चिम्पांझींपासून ते बॅबूनपर्यंतच्या प्रगत प्राणी जगतात, एकत्र राहण्यासाठी एकमेकांचे केस विंचरण्याचे विधी केले जातात. तासन्तास ते एकमेकांच्या अंगावरील कीड काढण्यात घालवतात. जैविक दृष्टिकोनातून, हे केवळ स्वच्छतेसाठी नाही; तर हा एक 'सामाजिक डिंक' आहे, जो शरीरात 'ऑक्सिटोसिन' आणि 'एंडोर्फिन'सारखी रसायने स्रवण्यास मदत करतो. प्रख्यात शास्त्रज्ञ फ्रान्स डी वाल यांनी नोंदवले आहे की, वादानंतर हे प्राणी एकमेकांचे केस विंचरून नाते पुन्हा जोडतात. प्रतिकूलतेची जागा मैत्रीपूर्ण स्पर्शाने घेण्याची ही क्षमता भावनिक बुद्धिमत्तेचे लक्षण आहे. आपल्या मानवी जगात, आपण हे 'ग्रूमिंग विधी' मोठ्या प्रमाणावर सोडून दिले आहेत. आपण एकत्र चहा पिणे, बैठकीपूर्वीच्या गप्पा किंवा शेजाऱ्यासोबत संध्याकाळी फिरणे टाळतो, कारण आपल्याला वाटते की ते वेळेचा अपव्यय आहे. पण, विज्ञान सांगते की, हेच विधी संकटाच्या वेळी टिकून राहण्यासाठी आवश्यक विश्वास निर्माण करतात. या सामाजिक विधींच्या डिंकाशिवाय, आपला समूह केवळ अनोळखी लोकांची गर्दी बनतो. पुढच्या भागात प्राण्यांच्या जगातील अदृश्य नियमावलीचा वेध घेणार आहोत, जी त्यांना संघर्षावर मात करायला, लोकशाही पद्धतीने निर्णय घ्यायला आणि एकसंध राहायला शिकवते. कारण खरी लवचिकता ही वैयक्तिक नसून ती सामूहिक असते.

पान २ वरून

# अफवा, अपप्रचार यांचे सामर्थ्य!

बाकीच्यांनी काळजी करण्याचे कारण नाही. गंमत म्हणजे, या 'फेक नॅरेटिव्ह'वर विश्वास ठेवून सोव्हिएत जनतेनेच नव्हे, तर सोव्हिएत नेत्यांनीही 'एड्स'च्या भयानकतेकडे दुर्लक्ष केले, असे लेखक म्हणतो. तसेच लेखकाच्या मते, आताच्या रशियन नेतृत्वालाही या समस्येचे गांभीर्य लक्षात घ्यावेसे वाटत नाही. त्यामुळे युक्रेन युद्ध सुरू झाल्यापासून रशियात 'एड्स'चा प्रसार वाढतो आहे. आपण नेहमी अशी आवाहने ऐकत अगर पाहत असतो की, समाजविद्यातक तत्त्वे अफवा पसरवून सामाजिक शांतता, ऐक्य, सामंजस्य धोक्यात आणू पाहत आहेत. तेव्हा अफवांवर विश्वास ठेवू नका. पण, कोणती बातमी खरी आहे आणि कोणती 'डिसइन्फार्मेशन' किंवा 'फेक नॅरेटिव्ह' आहे, हे सर्वसामान्य माणसाने समजायचे कसे? ती विवेकबुद्धी त्याला कोण शिकवणार? इथेच सुसंस्कार, सुयोग्य शिक्षण हे विषय सुरू होता आणि लक्षात येते की, बलशाली समाजनिर्मिती हे सोपे काम नाही.

# धर्मसंरक्षकः भगवान परशुराम

प्रासंगिक प्रतिनिधी

**भारतीय संस्कृतीत प्रत्येक उत्सवामागे एक गूढ अर्थ, इतिहास आणि मूल्यांची शिकवण दडलेली असते. त्यापैकीच एक महत्त्वाचा उत्सव म्हणजे परशुराम जयंती. भगवान परशुराम हे भगवान विष्णूंचे सहावे अवतार मानले जातात. अन्याय, अत्याचार आणि अधर्माविरुद्ध उभे राहणारे, पराक्रम आणि संयम यांचे प्रतीक असलेले परशुराम आजही समाजाला प्रेरणा देतात.**

परशुरामांचा जन्म अक्षय तृतीयेच्या पवित्र दिवशी झाला. त्यांचे वडील जमदग्नी ऋषी आणि माता रेणुका यांच्याकडून त्यांना संस्कारांचा वारसा लाभला. लहानपणापासूनच त्यांनी शौर्य, तपश्चर्या आणि धर्मनिष्ठा यांचा आदर्श घालून दिला. हातात परशु (कुऱ्हाड) घेऊन अन्यायाविरुद्ध लढणारा हा योद्धा केवळ शक्तीचा नव्हे, तर न्यायाचा पुरस्कर्ता होता.

परशुरामांनी अत्याचार करणाऱ्या सत्ताधाऱ्यांविरुद्ध आवाज उठवला. त्यांनी केवळ युद्धच केले नाही, तर धर्म आणि न्याय यांचे रक्षण केले. त्यामुळेच त्यांना क्षत्रियसंहारक म्हणून ओळखले जात असले, तरी त्यामागे समाजातील समतोल राखण्याचा हेतू होता. परशुरामांचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांची गुरु म्हणून असलेली भूमिका. त्यांनी अनेक महान योद्ध्यांना शिक्षण दिले. त्यांचे जीवन हे केवळ युद्धापुरते मर्यादित नव्हते, तर ज्ञान, संयम आणि तपश्चर्या यांचेही ते प्रतीक होते.

आजच्या काळात परशुराम जयंती साजरी करताना आपण केवळ पूजाअर्चा न करता त्यांच्या विचारांचे अनुकरण करणे आवश्यक आहे. अन्यायाविरुद्ध उभे राहणे, सत्याचा मार्ग स्वीकारणे आणि समाजासाठी कार्य करणे हीच खरी परशुरामांना आदरांजली ठरेल. आजच्या आधुनिक युगातही परशुरामांचे तत्त्वज्ञान अत्यंत सुसंगत आहे. भ्रष्टाचार, अन्याय आणि असमानता याविरुद्ध लढण्यासाठी त्यांच्या धैर्याची आणि तत्त्वनिष्ठेची गरज आहे.

युवकांनी त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन समाजाच्या उन्नतीसाठी पुढाकार घ्यावा, हीच या जयंतीची खरी शिकवण आहे. परशुराम जयंती म्हणजे केवळ एक धार्मिक उत्सव नसून, न्याय, धर्म आणि कर्तव्याची जाणीव करून देणारा दिवस आहे. परशुराम हे भगवान विष्णूंचा सहावा अवतार समजले जातात. गमदग्नी व रेणुकामाता यांच्यापोटी यांचा जन्म झाला. ब्राह्मण असून क्षत्रियांचे सर्व गुण यांच्यात होते, म्हणूनच त्यांना शरादपि शापादपि असे म्हणतात.

भगवान शंकरांकडून त्यांनी परशू हे शस्त्र घेतले आणि अनेक विद्या आत्मसात केल्या. त्याच विद्यांच्या जोरावर त्यांनी दुष्ट आणि प्रजेला जाच देणाऱ्या राजांचा बंदोबस्त केला. त्याच वेळी त्यांनी सहस्रार्जुनाला ठार केले. पुढे राजांना जिंकून ताब्यात घेतलेली जमीन त्यांनी ऋषिकुलाला देऊन ते महेन्द्र पर्वतावर तप करण्यासाठी निघून गेले. त्यानंतर त्यांचा उल्लेख सीता स्वयंवरात येतो. तेथे त्यांनी शिवधनुष्य तोडणाऱ्या रामाला आव्हान दिले. मात्र राग शांत झाल्यावर आपल्याकडील धनुष्य त्यांनी प्रभू श्रीरामाला भेट दिले.

पुढे त्यांनी भिष्मांना त्या सगळ्या विद्या दिल्या. नंतर अंबेच्या याचनेवरून त्यांनी भीष्मांशी युद्ध केले. भीष्म हारले पण तरीही त्यांनी अंबेशी लग्न करण्यास नकार दिला. कोकण प्रदेशाची निर्मितीच्या कथाही तेवढ्याच रंजक. असं म्हणतात की कोकणाच्या भुप्रदेशाची निर्मिती परशुरामाने समुद्रच्या योजने मागे हटवून केली आहे. म्हणूनच परशुरामाला सप्त कोकणाचा देव म्हणतात.

संपूर्ण भारतात समुद्रालगतच्या राज्यांमध्ये परशुरामाची ही कथा सांगितली आणि ऐकली जाते. त्यामुळे संपूर्ण भारतात परशुराम क्षेत्रे आहेत. केरळची भूमी परशुरामाने निर्माण केली असे सांगत. तिथेही एक परशुराम क्षेत्र आहे. ओरिसा, आसाम, गुजरात आणि पंजाबमध्येही परशुराम क्षेत्र आहे. तसेच ते कोकणातही आहे. परशुराम हा अमर्त्य किंवा चिरंजीव मानला गेला आहे. त्यामुळे त्याचा कायम निवास असतो असा समज आहे.



कथा अनिता चतुर

# राजम्मा

मी दुपारी साधारण चारच्या दरम्यान पेपर वाचत होते. घरातून मला सार्वजनिक नळ दिसत होता. त्या नळावरची गर्दी, भांड्यांची फेकाफेक, अद्वातद्वा बोलणी, पाण्यासाठी भांडणं ही नित्याचीच होती. त्या प्रत्येक भांडणाचं प्रतिनिधित्व कृष्णम्मा करायची. आजही कृष्णम्मा पदर खोचून आली. लाथेनेच तिने रांगेत असलेली पाण्याची भांडी उडवली. आपली पाण्याची भांडी चेहरा दिसेल इतकी स्वच्छ घासली. पाण्याने भरली. भरलेला हंडा, कळशी डोक्यावर घेणार इतक्यात छोटा पाच वर्षांचा शिवा रडत रडत तिच्याजवळ आला. त्याचे वाहणारे डोळे आणि शेंबडाने भरलेलं नाक पदराने पुसत त्याला तेलगूतून दोन शिव्या हासडल्या.

डोक्यावर हंडा, कळशी घेतली. छोट्या येरुण्णाला कुत्र्याचं पिलू उचलून घ्यावं तसं त्याचं बकोट पकडून कडेवर घेतलं आणि ती घराकडे निघाली. तिच्या रुद्रावताराला बायका खूपच घाबरायच्या. ती लांबून येताना दिसली की त्या आधीच बाजूला व्हायच्या. त्यामुळे तिचीच सगळीकडे ताईगिरी असायची. तिच्याकडे बघता बघता तिच्या जागी मला राजम्मा दिसू लागली. राजम्मा माझ्या आईच्या घराशेजारी रहायची. कोळशाच्या खाणीतून निघाल्यासारखा काळाकुट्ट रंग, काळेभोर लांबसडक केस, कपाळावर रुपयाएवढं कुंकू, कुंकवाच्या वर भस्म, कुंकवाच्या खाली हळद, नाकामध्ये चमकी, विड्याने तोंड रंगलेलं. विचकन दात दाखवून हसली तर अंगावर भीतीने सरसरून काटाच यायचा. ती कधी मुलांवर गुदमरून जाण्याइतके प्रेम करायची तर कधी त्यांना मरेपर्यंत मारायची. तिचं प्रेम आणि राग म्हणजे उत्तर ध्रुव- दक्षिण ध्रुवच होते. तिचा नवरा मजुरी करायचा. ही बहुतेक घरातलीच कामं करायची. ती क्वचितच मजुरीला जायची. होडीच्या आकाराच्या दगडी खलात भिजवलेल्या बचकाभर लाल मिरच्या, लसूण आणि पाणी घालून रगड्याने ओलं तिखट तयार करताना ती आजही माझ्या नजरेसमोर येते.

**राजम्मा माझ्या आईच्या घराशेजारी रहायची. कोळशाच्या खाणीतून निघाल्यासारखा काळाकुट्ट रंग, काळेभोर लांबसडक केस, कपाळावर रुपयाएवढं कुंकू, कुंकवाच्या वर भस्म, कुंकवाच्या खाली हळद, नाकामध्ये चमकी, विड्याने तोंड रंगलेलं. विचकन दात दाखवून हसली तर अंगावर भीतीने सरसरून काटाच यायचा. तिचा राग आणि प्रेम यांचा अतिरेकच असायचा.**

त्या दिवशी माझ्या आईला खूप ताप होता. मी आईला दवाखान्यातून तब्येत दाखवून घेऊन आले. तिला औषध देऊन झोपवलं. आईला बरं नाही हे राजम्माला समजलं. ती आईच्या भेटीला आली. तिने आईच्या तब्येतीची चौकशी केली. तिच्याबरोबर वीस वर्षांची लग्न झालेली मुलगी होती. होती काळीसावळीच पण त्यात एक तजेलदारपणा होता.

राजम्माच्या निरक्षर घरात ती शिकलेली आहे, हे तिच्या चेहऱ्यावरून दिसून येत होते. टपोरे डोळे, धनुष्याकृती भुवया, समोरचे कुरळे केस, कपाळावरचं खूप मोठं नाही पण ठसठशीत कुंकू, कुंकवाच्या वर भस्म, दोन्ही नाकपुड्यांमध्ये चमकी, अबोली-कुंदाचे भरगच्च गजरे, गळ्यात सौभाग्य लेणं म्हणून ल्यायलेला पिवळा धागा आणि त्यातील मंगळसूत्राच्या वाट्या, एकंदरीत समोरच्याला आकर्षून घेणारं व्यक्तिमत्त्व होतं तिचं. मी न रहावून विचारलं, "चाची। ये आपके साथ आयी हुअी लडकी कौन है?" ती तेलगूमिश्रित हिंदी बोलायची. ती म्हणाली, "ये हमारा बेटी है लक्ष्मी।" "लेकिन आपके तो दोनो बेटे ही है न रामण्णा और व्यंकण्णा?" मी "हाँ! लेकिन ये हमारा बडी बेटी है। बेटी लक्ष्मी घर जा मैं आती!" राजम्मा. "जी माँ! म्हणत लक्ष्मी गेली.

तिच्या दिशेने बघत राजम्मा माझ्या आईला सांगत होती- "दीदी! तुम्हारा बेटी सही बोला। लक्ष्मी हमारा खुदका बेटी नही!" "फिर? वह आपको कहाँ मिली? कैसी मिली?" आई. आईला औषधाने थोडे बरे वाटल्यामुळे ती अंथरुणावर उठून बसली. बाबा दुसऱ्या खोलीत झोपले होते. "दीदी! एक बार ऐसा हुआ मैं और मेरा मरद दोनो मुलुख जा रहे थे। तब हमारे कोई बच्चे नही थे। हम स्टेशनपे गाडी की राह देख रहे थे। तब देखा की हमारे पास मेंही एक साल की बच्ची बहुत रो रह थी। हम उसके माँबाप का बहुत तलाश किया लेकिन वो नही मिले। हमसे देखा नही गया। हम वो बच्ची को उठाया। गोद में लिया। हम उसको साथ लाना चाहते थे।" राजम्मा. "लेकिन किसी बच्चेको इस तरह उठाना सही नही होता। वह कानूनी अपराध है।" मी.

"हाँ। हम जानता था। इसलिये हम पुलिस के पास उस बच्ची को ले गये। "फिर पुलिसने क्या कहाँ?" मी आणि आई एकदमच म्हणालो. "पुलिसने भी हमारे साथ कानून की बात की। हमारी समझ में नही आया तो हमे समझाया। फिर उसके साथ वकील था उसने किसी फारमपर हमारे अंगुठे लिए। और बच्ची हमे दी। हमारा पता लिया और ये भी बताया की अगर उसके जनम देनेवाले माँबाप आये तो तुम्ही बच्ची को उन्हे देना होगा।" राजम्मा

"फिर?" मी "लेकिन आजतक उसका हक माँगनेवाला कोई नही आया। हम बच्चीको साथ लेके आये। घर आके हम बच्ची का नाम रखा लक्ष्मी।" राजम्मा. "लक्ष्मी! बहुत प्यारा नाम है राजम्मा!" लक्ष्मीबद्दलचं कौतुक राजम्माच्या डोळ्यात दिसत होतं. "लेकिन आप तो हमारे पडोस में बहुत दिनसे है। लेकिन आपकी यह बेटी हम कभी नही देखी!" मी "ये देख बेटी, हमारी जिंदगी तो अंगुठा लगाने में गयी। लेकिन इसकी जिंदगी अच्छी जानी चाहिये। इसलिये हमारे मुलुखके गाँव में उसको स्कूल में डाला और वहाँही वो बच्चे रहते है उसको क्या बोलते है?" राजम्मा. "हाँ! होस्टेल बोलते है।" मी "हाँ! तो उसको वहाँही रखा। दसवीतक पढा है मेरा बेटी। वहाँही हमारे जातवाला पढालिखा अच्छी कमाई करनेवाला लडका मिला। तो उसकी शादी कर दिया।" राजम्मा. मानलेल्या मुलीसाठी पोटाला चिमटा देऊन तिचं इतकं करणाऱ्या राजम्माचा मला एक वेगळाच पैलू दिसला. नेहमी भांडखोर असणाऱ्या राजम्माचे हे नवीनच रूप मी बघत होते. अशाच काही कालावधीत थोड्याशा दुखण्यात माझी आई गेली. नातेवाईक, शेजारी यांच्या गोतावळ्यात आईचे कलेवर होते.

राजम्माला हे कळताच ती धावतच धाय मोकलून रडत रडतच आली. माझ्या आईच्या पायांना घट्ट धरून नमस्कार करत म्हणाली, "बेटी! दीदी बहुत अच्छी थी। ऐसी माँ मिलना तकदीर की बात होता है।" आणि मला जवळ घेऊन माझे डोळे पुसत म्हणाली, "बहोत किया तुमने अपने माँ का। ऐसी बेटी मिली ये तुम्हारी माँ का तकदीर है।" मी अश्रूभरल्या डोळ्यांनी तिच्याकडे बघत होते. आई गेल्याचं दु:ख वेगळंच होतं पण जिला सगळेजण भांडखोर समजत होते ती वेगळीच राजम्मा मी बघत होते.

आज त्या गोष्टीला बरीच वर्षे झाली. आज राजम्मा कुठे असेल, कशी असेल, जिवंतही असेल की नाही माहीत नाही. कचाकचा भांडणारी राजम्मा, निरक्षर असूनही लक्ष्मीसारख्या निराधार मुलीला समाजात मानाचे स्थान मिळवून देणारी राजम्मा, माझ्या आईसारख्या परक्या बाईसाठी घळघळा अश्रू गाळणारी राजम्मा. किती किती रूपात राजम्मा आजही माझ्या नजरेसमोर येते.

आज मोठमोठे नावाजलेले सिनेकलावंत, नावाजलेले खेळाडू खोऱ्याने पैसा ओढत आहेत. पण, निरक्षर असूनही मजुरी करून श्रमाच्या पैशातून आपल्या घासातला घास दुसऱ्याला देऊन समाजाचे भान ठेवणारी राजम्मा मला हिमालयाच्या उत्तुंग शिखरासारखी भासते. एक अफलातून व्यक्तिमत्त्व.

काय म्हणू तिला? गोड गरे असलेला काटेरी फणस म्हणून की थंडगार गोड पाणी असलेलं शहाळं म्हणू? तिला समजणं म्हणजे मोठंच प्रश्नचिन्ह आहे माझ्यासमोर. फक्त आणि फक्त प्रश्नचिन्ह.

कीर्तिरूपांच्या आठवकथा
डॉ. रमा गोळवलकर

# दमयंती

'महाभारत' या आर्षकाव्यात अनेक सुरस आणि रिक कथा आल्या आहेत. त्यातली प्रत्येक कथा सांगण्यामागचा उद्देश अगदी स्पष्ट आहे. आजकालच्या भाषेत त्याला 'केस स्टडी' म्हणतात. एखाद्या परिस्थितीत एखादी व्यक्ती कसा विचार करते, काय निर्णय घेते, कशी वागते, त्यासाठी ती कोणत्या माहितीचा, शास्त्राचा, संदर्भांचा आधार घेते आणि या सगळ्याचे तत्काळ होणारे आणि दीर्घकालीन परिणाम काय होतात याचा सांगोपांग ऊहापोह त्यात करण्यात आलेला असतो. अशीच एक केस स्टडी युधिष्ठिराला सांगण्यात आली आहे. अर्थात त्याकाळी काल्पनिक परिस्थिती निर्माण करून सांगण्यापेक्षा भूतकाळात घडून गेलेल्या घटनेचा आधार घेतला जायचा. हे विधान करण्यामागचं कारण म्हणजे या घटनेत गुंतलेल्या व्यक्ती, त्यांचे नातेवाईक, मित्रपरिवार आणि स्थानांचं अगदी सविस्तर वर्णन त्यात आढळतं.



त्या सगळ्यातून धर्माविषयीची आस्था वाढावी, मानवी वृत्ती अधिकाधिक सत्प्रवृत्त आणि धीरोदात्त व्हावी हा मुख्य हेतू असायचा. कौरव आणि पांडवांच्या या प्रसंगाचा शेवट पांडवांच्या विजयात झाला. यातूनच सांगितल्या गेलेल्या या कथांतून पांडवांनी किती आणि कसा बोध घेतला हे स्पष्ट होतं. यातलीच एक केस स्टडी म्हणजे नलोपाख्यान (नल + उपाख्यान साईड स्टोरी). द्यूताच्या खेळात सर्वस्व हरल्यानंतर पाची पांडव आणि द्रौपदी बारा वर्षांचा वनवास आणि एक वर्षाचा अज्ञात वास भोगण्यासाठी वनात जातात. कालांतराने युधिष्ठिराच्या मनात नको नको त्या शंका-कुशंका येऊ लागतात. धीर खचून त्याला नैराश्य येतं. साहजिकच त्याच्या या मन:स्थितीचा परिणाम त्याची पत्नी म्हणून द्रौपदीवरही होतो. अशा वेळी अतिथी म्हणून आलेले बृहदश्व ऋषी त्याला नल-दमयंतीची कथा सांगून धीर देतात. ही कथा महाभारताच्या 'वनपर्वा'त येते. त्यातल्या बहुतेक पात्रांची नावं इथे देण्याचा प्रयत्न केला आहे. यातली दमयंती हा आजचा आपला वर्ण्य विषय आहे. विदर्भदेशीचा भीम राजा निपुत्रिक होता. त्यानं आपली व्यथा दमनऋषींना सांगितली. त्यांच्या आशीर्वादांनी भीमराजाला दम, दान्त आणि दमन असे तीन पुत्र आणि दमयंती नावाची कन्या झाली. दमयंती त्रैलोक्यसुंदरी होती. तिची कीर्ती आणि ख्याती सर्वत्र पसरली होती. तशीच ती निषद राज्याचा राजा वीरसेनाचा युवराज नलराजाच्या कानी गेली.

कशी गेली त्याचीही कथा सुरसच आहे. नलराजा शिकारीला गेला असताना त्याला सोनेरी पंखांचा एक राजहंस पक्षी दिसला. त्यानं तो जिवंत पकडला तर तो हंस मानवी भाषेत त्याला म्हणाला, 'तू जर मला जिवंत सोडलंस तर मी तुझा प्रेमसंदेश घेऊन विदर्भदेशीची राजकन्या दमयंतीकडे घेऊन जाईन!' आणि त्यानं तिच्या सौंदर्याचं, तिच्या एकूणच व्यक्तिमत्त्वाचं वर्णन केलं. ते ऐकल्यानंतर नलराजानं राजहंसाला त्याचा प्रेमदूत म्हणून दमयंतीकडे पाठवलं.

दमयंतीनंही राजहंसाकडून नलराजाचं वर्णन ऐकलं. हा तरुण बलवान, रूपवान, अश्वविद्या आणि पाककलेत पारंगत आहे. तीही मनोमन त्याच्यावर भाळली. दमयंतीच्या स्वयंवराची वार्ता ऐकून इंद्र, वरुण, अग्नी, यम आणि कली (ज्याच्यामुळे नंतर कलियुग अवतरणार आहे असा) देखील तिच्याशी विवाह व्हावा, या उद्देशानं विदर्भदेशाच्या राजधानीत पोहोचतात. पण दमयंती नलराजालाच वरते. ते कलीला सहन होत नाही.

नवपरिणत जोडप्याला तो, ती दोघे देशोधडीला लागतील, असा मनोमन शाप देतो. विवाहानंतर ते राजदाम्पत्य निषद राज्यावर राज्य करू लागले. त्यांना इंद्रसेन नावाचा एक पुत्र आणि इंद्रसेना नावाच्या कन्यारत्नाचाही लाभ झाला. पण कलीनं दिलेला शाप आणि नलराजाचं द्यूत खेळण्याचं व्यसन यात त्यानं आपलं राज्य गमावलं. पुष्कर नावाच्या भावाकडून द्यूत हरल्यावर त्याला विवस्त्र होऊन वनवास पत्करावा लागला. दोन्ही मुलांना आपल्या माहेरी पाठवून दमयंतीदेखील त्याच्यासोबत वनवासात गेली. एका समृद्ध राज्याची राजकन्या आणि एका संपन्न राज्याची महाराणी असूनही तिला आपलं अर्धं वस्त्र देऊन आपल्या पतीची लाज राखावी लागावी इतकी तिची विपन्नावस्था झाली. नलराजाला ते बघवेना. त्या घनघोर वनात रात्री ती गाढ झोपेत असताना तिचं अर्धं वस्त्र फाडून कंबरेला बांधून नलराजा तिला एकटीला सोडून निघून जातो. दमयंती ओळखली जावी ती तिनं त्यानंतर केलेल्या संघर्षासाठी. कारण त्या अरण्यात तिला एक अजस्र अजगर गिळू बघतो. तिच्या आक्रोशामुळे एक व्याध (शिकारी) तिथे येतो आणि तिची सुटका करतो. पण तिचं असामान्य सौंदर्य बघून त्याची मती भ्रष्ट होते आणि तो तिच्यावर बळजबरी करू लागतो. ती रागावून त्याला शाप देते, त्यात तो जळून जातो.

तीन दिवस भटकल्यानंतर तिला एका आश्रमात आश्रय मिळतो. तिथून ती आधी तिच्या मावशीकडे 'चेदी' साम्राज्ञीकडे आणि नंतर आपल्या पित्याकडे विदर्भदेशी परत जाते. नलराजाला शोधण्यासाठी तिच्या वडिलांनी विविध दिशांना ब्राह्मण पाठविले. पर्णाद नावाचा ब्राह्मण अयोध्या नगरीत पोहोचतो. तिथे कर्कोटक सर्पाच्या कृपेनं रूपांतर आणि वेषांतर करून बाहुक नावानं नलराजा राजा ऋतुपर्णाचा सारथी म्हणून राहात असतो.


तो नलराजा असल्याची शंका पर्णादाला येते. बाहुकानं एकदा तरी समोर यावं म्हणून पुन्हा एकदा दमयंतीचं स्वयंवर करण्याची घोषणा करण्यात येते. सर्व राजांना स्वयंवरात सहभागी होण्यासाठी अतिशय कमी वेळ देण्यात येतो. अयोध्या ते विदर्भ हे अंतर अतिशय कमी वेळात पार करून बाहुक आणि ऋतुपर्ण तिथे येऊन पोहोचतात. नलाची ओळख पटते आणि नल-दमयंती दोघांचंही मिलन होतं. यात लक्षात घेण्यासारख्या तीन मुख्य गोष्टी आहेत. पहिली - पती कितीही संकटात असू दे. पत्नी त्याच्या सोबतच असते, हा वस्तुपाठ त्या त्रिभुवनसुंदरीनं घालून दिला. संकटात एकवेळ पुरुष खचू शकतो, पण स्त्री कणखरपणे तोंड देते.

तिसरी आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे पती हरवला असल्यास पत्नीला दुसरं लग्न करण्याचा अधिकार फार पूर्वीपासून या भूमीत मान्य करण्यात आला होता. तर अशा या लावण्यवती आणि धैर्यवती भारतीय स्त्रीत्वाची आदर्श असलेल्या दमयंतीची ही आठवकथा!

बोली आणि संस्कृती
प्रा. अजय देशपांडे

# प्रेम 'अपराजित' मरणावर करावं...

आपली मराठी भाषा, तिच्या बोली आणि तिच्याशी नाते ठेवणाऱ्या लोकभाषा शब्दाशब्दांनी हळूहळू मरत आहेत. शब्दाशब्दांनी होणारे मरण दिसतही नाही, जाणवतही नाही. शब्दांचे मरण ही भाषा व संस्कृतीच्या दृष्टीने महाभयंकर हानी असते; तिला चव, स्पर्श, वास काहीही नसते, म्हणूनच ती जास्त भयावह असते. एखाद्या शब्दाचा मृत्यू होणे म्हणजे पाचही संवेदनांचा प्रत्यय देणारा एक सांस्कृतिक आशय; एक सांस्कृतिक संदर्भ नष्ट होणे होय. शब्दांची हानी कधीच भरून काढता येत नाही. लोकभाषेतील शब्द हा लोकसंस्कृतीचा वाहक असतो.



संस्कृतीच्या जतनाचे आणि प्रसाराचे एक लघुतम माध्यम शब्दच असतो. त्यामुळे शब्द या अर्थपूर्ण घटकाचे आणि संस्कृतीच्या समृद्धीसाठी मोठे योगदान असते. एखाद्या भाषेतील लोकव्यवहारातून लोकसंवादातून त्या भाषेतील शब्द कमी होणे, शब्दांची जागा अन्य भाषांतील शब्दांनी घेणे आणि कालांतराने त्या भाषेतील शब्द लोकव्यवहारातून वजा होणे; नंतर तो शब्द लुप्त होणे या आणि अशा घटना त्या भाषेतील शब्दांच्या मृत्यूची प्रक्रिया झाल्याचे दर्शवित असतात. मराठी भाषेत प्रक्रिया सुरू झाली आहे. गेल्या काही दशकांपासून प्रक्रिया विलक्षण गतीने घडत आहे. कुसुमाग्रजांनी 'प्रेमयोग' या कवितेत 'अपराजित' या शब्दाचे सुरेख उपयोजन केले आहे.

प्रेम...राधेच्या वत्सल स्तनावर करावं
कुब्जेच्या विद्रूप कुबडावर करावं, भीष्म द्रोणांच्या थकलेल्या तीर्थरूप चरणांवर करावं दुर्योधन-कर्णाच्या अभिमानी अपराजित मरणावर करावं, प्रेम कुणावरही करावं. अलिकडे 'विनर' या शब्दाने अपराजित या शब्दाचे अर्थसंदर्भच विस्मृतीत गेले आहेत. या शब्दाची आशयघनता हरवून जाऊ नये. या शब्दाची स्थूल रचना अ+परा+जित अशी आहे. 'परा' या शब्दाला उपयोजनानुरूप आशयाची वेगवेगळी वलये जडलेली आहेत. 'परा' हा उपसर्ग आहे. त्याने काही सामासिक शब्द घडवले आहेत. 'पराकाष्ठा'मधला 'परा' म्हणजे शेवटची आणि काष्टा म्हणजे मर्यादा. पराक्रममध्ये पर+आ+क्रम अशी अक्षरे दडली असून 'परा'चा अनुबंध जिंकण्याच्या कृतीशी जुळला आहे.

पराजय आणि पराजित या शब्दांतील 'परा'चे नाते हारण्याच्या संदर्भाशी जुळलेले आहे. खरे तर 'जित' म्हणजे जिंकणे, विजय मिळविणे आणि जित म्हणजे विजय मिळविणे; ज्याला जिंकायचे त्यांच्या जिवावर विजय मिळवायचा, एकतर जीव घेऊन किंवा त्याचा जीव आपला गुलाम करून. 'जित' या शब्दाचे अर्थ संदर्भ सजीवतेशी जुळले आहेत. 'जिती' हा बोलीतील शब्द चैतन्य आणि सजीवत्वासंदर्भात वापरला जातो. 'जिती' या शब्दाचे सुरेख उपयोजन ज्ञानदेवांनी केले आहेच.


पराजित मधल्या 'जित' या शब्दाचे नाते 'जिती' या शब्दाशी आहे. ते अजित मधल्या जित या शब्दाशीही आहे. अजितेंद्रिय म्हणजे इंद्रियांवर मुळीच ताबा किंवा अंकुश नसलेला. जिवावरचा अंकुश घालवून बसलेला तो अजित. अपराजित मधला परा+जित या दोहोंच्या अगोदर येणारा 'अ' हा देखील अजितमधल्या 'अ' सारखाच नकारार्थी आहे. थोडासा पण खूपच महत्त्वाचा अर्थसंदर्भ या दोन्ही शब्दांत दडला आहे. पराजित म्हणजे पराजय झालेला आणि जिवंतता. 'जित' या शब्दाला 'पत' हा शब्द जोडला की 'जितपत' हा बोलीतील शब्द तयार होतो. त्याचा अर्थ जितके, जिथपर्यंत असा होतो. पुन्हा बोलीत 'जितराब' हा शब्द शेती, निसर्ग आणि कृषिनिष्ठ प्राणी यांच्या एकरूपत्वाचा सांस्कृतिक संदर्भ उजागर करणारा आहे तर जितवन म्हणजे जिवंतता, सजीवत्व. बा. सी मर्ढेकरांनी 'जिवंतता' या शब्दाचे अर्थसंदर्भ 'आळसली बघ जिवंतता ती या वृद्धेच्या वदनावरती' या ओळीत नेमके अभिव्यक्त केले आहेत.

एकूणच जित या शब्दात जिंकणे म्हणजे जिवंत व्यक्ती अथवा पशुपक्षी यांवर अपराजित म्हणजे पराजित न झालेला, पराभव न झालेला, अजिंक्य असलेला. ज्याला कोणी जिंकले नाही असा किंवा जो सर्वांना हरवतो असा. अजित आणि अपराजित हे दोन्ही शब्द अर्थदृष्ट्या भिन्न आहेत.

कुसुमाग्रजांनी 'अपराजित' हा शब्द फार सूचकतेने योजिला आहे. 'प्रेम... दुर्योधन- कर्णाच्या अभिमानी अपराजित मरणावर करावं...' ही ओळ अपराजित या शब्दाने अर्थसघन आणि अर्थसूचक झाली. 'महाभारतात' दुर्योधन-कर्ण या व्यक्तिरेखांनी रणभूमिवर मरण पत्करले असेलही. या व्यक्ती शौर्यवान असतीलही, पण मृत्यू अपराजित आहे. शौर्यवान, महापराक्रमी माणसांना पराजित करणाऱ्या आणि निरंतर अपराजित असणाऱ्या मृत्युवक्ष प्रेम करावे, हा सूचक आशय या ओळीत दडला आहे. प्रेम अपराजित मृत्यूवर करावयाचे आहे, पराधिन अशा प्रवृत्तींवर करावयाचे नाही. देहातून सजीवत्व कायमचे हिरावून घेण्याचे सामर्थ्य ज्याचे ठायी आहे तो अपराजित होय. अपराजित सामर्थ्य असणाऱ्या मृत्यूवर प्रेम करावे, या आशयबीजाचे प्रस्फुरण करणारी ओळ लिहून कुसुमाग्रजांनी 'प्रेम' या प्रकाशमूल्याची अपराजित अर्थवत्ता अधोरेखित केली आहे.

असा हा अपराजित शब्द आपण भाषेतून हद्दपार करू नये. परभाषेपुढे पराधिन, पराजित न होता हा शब्द आपल्याला जोपासावा लागेल. मुद्रित माध्यमांसह इलेक्ट्रॉनिक मीडियातही हा शब्द मन:पूर्वक वापरावा लागेल. 'कोरोना आणि अपराजित भारतीय', 'भारतीय हॉकी संघ अपराजित' असे मथळे-शीर्षकं वापरून हा शब्द ओठांवर जिवंत ठेवावा लागेल. 'अपराजिता' हा सुंदर शब्द आता जिभेवरून हद्दपार होत आहे. अपराजिता हे आदिशक्ती देवीचे नाव आहे. अयोध्यानगरीचे एक नाव अपराजिता हे आहे. चौदा मात्रांचे अपराजिता नावाचे वृत्त आहे. अपराजिता नावाचे एक सुंदर फूल आहे. अपराजिताची निळी आणि पांढरी फुले बंगालमध्ये कालीमातेला, दुर्गादेवीला वाहतात. बंगालमध्ये अपराजिता म्हटल्या जाणाऱ्या या फुलांना मराठीत 'गोकर्ण' म्हणतात. या गोकर्णीला बोलीत सुपली म्हणतात. गाईच्या कानाचा आकार आहे म्हणून गोकर्ण. बोलीत लहान सुपाला सुपली म्हणतात. गोकर्णीची निळी आणि पांढरी फुले सुपलीच्या आकारासारखी असतात म्हणून लोकवाणीने या सुंदर फुलांना 'सुपलीची फुले' म्हटले. आता सुपली ही वस्तू आणि सुपली हा शब्दही दोन्ही दुर्मिळ झाले आहेत.

समाजभान
योगिता साळवी



# 'कॉर्पोरेट जिहाद': आता आणखी किती जिहाद?

**'लव्ह जिहाद'! हा एक जिहाद घडवण्यासाठी, जिहादी 'लॅण्ड जिहाद' ते 'ड्रग्ज जिहाद' ते आता 'कॉर्पोरेट जिहाद'चाही वापर करत आहेत. पण, हे कॉर्पोरेट स्तरावरच होते का? तर तसे नाही. एखाद्या विषारी किड्याने जिथून मार्ग मिळेल तिथून आत जावे आणि सगळा परिसर उद्ध्वस्त करावा तसेच हे आहे. हे जिहादी जिथे असतील तिथून प्रत्येक स्तरावरील सर्व शक्यतांचा वापर करत, 'लव्ह जिहाद' करत आहेत. नुकताच उघडकीस आलेला नाशिकचा 'कॉर्पोरेट जिहाद' हे त्याचेच उदाहरण. या घटनेच्या पार्श्वभूमीवर 'कॉर्पोरेट जिहाद'चा घेतलेला मागोवा...**

आपला उगीच समज असतो की, गरीब, अज्ञानी आणि जगओळख नसलेले मुस्लीमच धर्मांध असतात आणि ते 'जिहाद' वगैरेसाठी काहीही करतात. शिकलेले लोक, सुधारलेले असल्याने असे काही करत नाहीत. पण, नाशिकच्या 'कॉर्पोरेट जिहाद'ने ही सगळी अफवा असल्याचे सिद्ध केले आहे. ते सगळे इंजिनिअर आणि अगदी कॉर्पोरेट स्तरावरचे आधुनिक राहणीमान असणारेच होते. पण, त्यांनाही नुकतेच पोलिसांनी अटक केली. त्यांनी त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या हिंदू महिला-पुरुष कर्मचाऱ्यांना 'नमाज' पढायला लावणे, हिंदू देव-देवतांची टिंगल करणे, निंदा करणे, अपमानास्पद बोलणे, मुद्दाम धार्मिक भावना दुखावणे, विनयभंग करणे आणि धर्मांतरणासाठी दडपण आणणे असे गुन्हे केले होते. ते सगळे टीम लीडर होते, वरिष्ठ अधिकारीही होते.

दानिश शेख, तौसिफ अख्तार, निदा खान, शफी शेख, रझा मेमन, शाहरुख कुरेशी वगैरे हे ते आरोपी, शिकलेले आणि बहुराष्ट्रीय कंपनीत काम करणारे गुन्हेगार ठरले. त्यांना पाहून कुणालाही वाटेल की, अरे हे असे कसे करू शकतात? पण, सत्यपरिस्थिती हीच आहे की, धर्मांध समाजविघातकांनी सुशिक्षित आणि ज्यांच्यावर संशय येणार नाही, अशा लोकांनाच कटकारस्थानात सहभागी करण्याचे षड्यंत्र रचले आहे.

मागे दिल्लीत आत्मघातकी हल्ला झाला, त्यातले गुन्हेगार तर डॉक्टर होते. आताही नाशिकच्या बहुराष्ट्रीय कंपनीतील जे आठ टीम लीडर आणि वरिष्ठ कर्मचार्यांना अटक करण्यात आली आहे, हे सगळेच इंजिनिअर आहेत. गेली अनेक वर्षे त्यांचे 'लव्ह जिहाद'चे कटकारस्थान 'सुखेनैव' सुरू होते. गरीब घरच्या मुलींना नोकरीचे आमिष द्यायचे, त्यांची गरिबी आणि गरिबीतून आलेली लाचारी असाहाय्यता हेरायची आणि त्यांना नोकरी द्यायची. आपण तिचे हितचिंतक आहोत, तसेच तिच्या कामामध्ये काही चुका झाल्यास तिला सांभाळून घेऊ, अधिकचा ओव्हरटाईम देऊन तिला जास्त पगार कसा मिळेल हे बघू, असे सांगत ते त्या मुलींशी जवळीक साधायचे. गरीबच काय; पण सधन घरच्या मुलींनाही वाटायचे की, अरे वा, आपल्याला नोकरी दिली. आता आपली कमाई वाढवण्यासाठीही हा टीम लीडर आपल्याला मदतदेखील करतो. आपल्याला विशेष आणि जवळचे मानतो. त्यातूनच मुलींची त्यांच्याशी जवळीक व्हायची. मग मानसिक आणि शारीरिक शोषण करण्यासाठी हे राक्षस पुढे सरसवायचे. त्या टीम लीडरची एकी तर पाहा. ते सगळे मुस्लीम होते आणि मिळूनच तिथल्या हिंदू मुली- महिलांच्या धार्मिक भावना दुखावायचे. त्या टीम लीडर्सपैकी कुणाच्याही मनात आले नाही की, आपण या महिलांच्या आर्थिक परिस्थितीचा गैरफायदा घेत आहोत, त्यांना त्रास देत आहोत. उलट, त्यांच्यासाठी ते पुण्याचेच काम असणार!

या हिंदू कर्मचार्यांचे धर्मांतरण केले की, कयामतच्या रात्री आपल्यासकट आपण सांगू त्याचे पाप धुतले जाईल आणि आपल्याला जन्नत मिळेल, याच विचारात ते धुंद होते. ना कसली भीती, ना कसले बंधन! या मुली- महिलांनी या कंपनीच्या 'एचआर'कडेही याबाबत तक्रार केली होती. पण, या कर्मचार्यांना न्याय दिला गेला नाही. ही घटना उघडकीस कशी आली, तर अतिशय आधुनिक असलेली ती युवती त्या कंपनीत कामाला लागली. काही महिन्यांतच तिचा पेहरावच बदलला. जीन्स- मिडी- शॉर्ट टॉप घालणारी ती मुलगी आता सलवार-कुर्ता, तसेच मुस्लीम महिला ज्या पद्धतीने पेहराव करतात त्या पद्धतीने पेहराव करू लागली. घरातल्यांना वाटले, मुलगी मल्टी- नॅशनल कंपनीमध्ये कामाला आहे, त्यामुळे तिच्या पोशाखात बदल झाला असेल. पण, तिने कट्टर धार्मिक मुसलमानांसारखे, एक महिना 'रोजा'चे उपवास पकडले आणि घरातल्यांच्या पायाखालची वाळू सरकली. हिंदू घरातील हिंदू-संस्कार झालेली आपली मुलगी, मुसलमान रूढी- प्रथा कशा पाळू लागली? घरातल्यांनी तिला विश्वासात घेतले. प्रेमाने; पण कसून चौकशी केली, तेव्हा सत्य उघडकीस आले की, कंपनीतल्या टीम लीडर्सनी त्या कामाच्या ठिकाणाला 'लव्ह जिहाद'चा अड्डा केला होता, जणू कटच केला होता. हिंदू कर्मचार्यांनी मुस्लीम पद्धतीने तिथे वावरावे, जगावे, मुस्लीम श्रद्धा बाळगाव्यात, यासाठी त्यांच्यावर दडपण आणले जाई. पुढे हे प्रकरण पोलिसात दाखल झाले आणि पोलिसांनी नियोजन केले.

महिला पोलिसांनी पाळत ठेवली. ४० 'सीसीटीव्ही' फुटेज तपासल्यानंतर, मुंबई नाका पोलीस ठाण्यात धार्मिक भावना दुखावल्याचा एक, विनयभंगाचे चार, धार्मिक भावना दुखावत विनयभंगाचे तीन असे एकूण आठ गुन्हे नोंदवण्यात आले. याप्रकरणी आठ महिला, तर एक पुरुष तक्रारदार आहे. बळजबरीने धर्मांतराचा प्रयत्न केल्याचा आरोप त्याने केला आहे. बळजबरी धर्मांतर केलेल्या संबंधित तरुणाचे, संशयित आरोपीसोबतचे डोक्यावर गोल टोपी घातलेले फोटोही सोशल मीडियात व्हायरल झाले आहेत. असो, ही घटना उघडकीस आली म्हणून! पण, जरा डोळे उघडून पाहिले तर काय दिसते? कॉल सेंटर, आजूबाजूची गारमेंट किंवा पॅकिंग किंवा इतर कंपन्या पाहा, मॉल किंवा शॉपिंग सेंटर पाहा, तिथे वरिष्ठ स्तरावर टीम लीडर कोण आहे ते पाहा आणि त्याच्या हाताखाली काम करणारे कोण आहेत ते देखील पाहा. शाहरुख- सलमान-सैफ सारखे हातवारे करत, डोळ्यांची हालचाल करत चांगली हिंदी बोलता येते किंवा वरिष्ठांची मज राखत, त्याच्यासाठी वाटेल ते करण्याची तयारी दाखवण्याचे कसब असते म्हणून किंवा येणाऱ्या ग्राहकांशी मधाळ आणि 'जी-जी' करून बोलण्याची पद्धत असते म्हणून तिथे असतात. यामध्ये टीम लीडर म्हणून जास्त कोण व्यक्ती असतात? दुसरीकडे त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या मुली- महिला, खरेच गरीब घरच्या आणि परिस्थितीने गांजलेल्या असतात. त्यांच्याशी कसे वागले जात असेल?

(पान ६ वर)

# ग्रहसंकेत

**(रविवार, १९ एप्रिल ते शनिवार, २५ एप्रिल२०२६)**

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर, ज्येष्ठ पत्रकार
'शिवकृपा' फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि. सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✲ **रविवार, १९ एप्रिल-** अक्षय्यतृत्तीया, महात्मा बसवेश्वर जयंती, श्री परशुरामजयंती, युगादि, कल्पादि, जलकुंभ, पंखादान, एकरामाध्य जयंती रथोत्सव म्हार्दोळ, शिवजयंती (परंपरेने), सिध्दनाथ यात्रा पाल (ता. कराड), चैत्री हिंदोळा पुजा, अंबाबाई मंदिर कोल्हापूर ✲ **सोमवार, २० एप्रिल-** विनायक चतुर्थी, तिसरी तीज, सौर ग्रिष्म ऋतू प्रारंभ, भैरवनाथ यात्रा बावरहिरे, श्री ज्योतिबा रथोत्सव चितळी (ता. खटाव), जैन वर्षी तप समाप्त ✲ **मंगळवार, २१ एप्रिल-** श्री आद्य शंकराचार्य जयंती, भारतीय वैशाख मासारंभ, देव वेतोबा उत्सव आरवली, बसवकल्याण यात्रा जि. बिदर, दारुकाचार्य जयंती (वीरशैव), लक्ष्मीदेवी यात्रा वाघापूर (ता. तासगाव), मरुळाराध्य जयंती ✲ **बुधवार, २२ एप्रिल-** जागतिक वसुंधरा दिन, श्री नृसिंह नवरात्रारंभ, चंदन षष्ठी, श्री रामानुजाचार्य जयंती, श्रीनाथ रथ भाग्यनगर, पद्मावती यात्रा म्हसोबाचे कार्वे, वामन पंडित पुण्यतिथी ✲ **गुरुवार, २३ एप्रिल-** गंगोत्पत्ती, गंगापूजन, गंगासप्तमी, गुरुपुष्यामृत (रात्री २०: ५७), जागतिक पुस्तक दिन, श्री मल्लीकार्जून यात्रा कारकल ✲ **शुक्रवार, २४ एप्रिल-** दुर्गाष्टमी, शंकर महाराज पुण्यतिथी पुणे, धोंडीराज महाराज रथोत्सव पलूस, सिध्दनाथ रथ नेवरी (ता. कडेगाव), लक्ष्मीआई यात्रा शिंदेवाडी (ता. माळशिरस), हत्तूर यात्रा शिरोड ✲ **शनिवार, २५ एप्रिल-** सीता नवमी, जानकी जन्म, ताम्हणकर महाराज जयंती सांगली, कवी शंभूराजू तुरेवाले पुण्यतिथी भिलवडी, लक्ष्मीदेवी यात्रा पाटण

**मुहूर्त:-** ✲ **साखरपुडा-** २१ एप्रिल ✲ **डोहाळ जेवण-** २१, २३, २४ एप्रिल ✲ **बारसे-** २१, २३ एप्रिल ✲ **जावळ-** २३, २४ (८ नंतर) एप्रिल ✲ **गृहप्रवेश-** २३, २४ एप्रिल

### मेष :- वाचा मवाळ ठेवावी

अक्षय्य तृतीयेस व्ययात मंगळ- शनिची युती होत आहे. त्यामुळे आर्थिक गुंतवणूक विचाराने करावी. अचानक नच्या खर्चाला सामोरे जावे लागेल. गुरू कृपेने सर्व समस्यांतून मार्ग निघत जाईल. चिंता करू नका. डोळ्याच्या तक्रारींची दखल घ्यावी. वाचा मवाळ ठेवावी. विनाकारण वाद वाढवू नका. शुभ ता. १९, २, २५

### वृषभ:- सामंजस्याने रहावे

लाभस्थानी सप्हारंभी मंगळ- शनिची युती होत आहे. त्यामुळे आर्थिक समस्या संभवतात. येणे रक्कम वसुलीसाठी अधिक प्रयत्न करावे लागतील. राशीत राशी स्वामी शुक्र, हर्षल समवेत आहे. त्यामुळे कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. मतभेदाचे प्रसंग टाळावेत. ज्ञानदान, बॅंक, विमा क्षेत्र अनुकूल आहे. शुभ ता. १९, २३

### मिथुन:- कार्यक्षेत्रात दुर्लक्ष नको

कर्मस्थानी मंगळ- शनिची युती होत आहे. त्यामुळे नोकरी, व्यवसायात दुर्लक्ष होऊ देऊ नका. समस्या संभवतात. यांत्रिकी, वैद्यकिय क्षेत्रात विविध आव्हानांना सामोरे जावे लागेल. चिंता करू नका. वेळीच मार्गही निघत जाईल. प्रशासन सेवेत अनुकूलता राहिल. नव्या योजना विचारपूर्वक स्विकाराव्यात. घाईने निर्णय नकोत. शुभ ता. १९, २५

### कर्क:- भाग्योदयात अडचणी

भाग्यस्थानी मंगळ- शनिची युती होत आहे. त्यामुळे भाग्योदयात अडचणी येण्याची शक्यता आहे. हितशत्रूंपासून सदैव सावध रहावे. अंगच्या हुशारीने विविध समस्यांवर मात करू शकाल. संसर्गजन्य आजरांपासून सावध रहावे. प्रशासन सेवेत अनुकूलता राहिल. अचानक खर्च करावा लागेल. संततीशी मतभेद टाळावेत. शुभ ता. १९, २१

### सिंह:- प्रकृतीकडे दुर्लक्ष नको

अष्टमात मंगळ- शनिची युती होत आहे. त्यामुहे प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका. कौटुंबिक जीवनात विलंबाने सौख्याच्या घटना घडतील. स्वमताग्रह टाळावा. अर्थिक बाबतीत समाधानकारक घटना घडतील. नव्या संधी लाभतील. नव्या कामात अधिक लक्ष घालावे. औषधे डॉक्टरांच्या सल्ल्यानेच घ्यावीत. प्रतिकूलतेवर मात कराल. शुभ ता. १९, २३

### कन्या:- कौटुंबिक समस्या

सप्तमात मंगळ- शनिची युती होत आहे. त्यामुळे कौटुंबिक जीवनात समस्या संभवतात. जीवन साथीदाराबाबत चिंता राहिल. रवि अष्टमात मेषेचा त्यामुळे उष्णतेपासून त्रास होईल. काळजी घ्यावी. कार्यक्षेत्रातील समस्या दूर होत जाईल. कलागुणांचा विकास होत जाईल. धार्मिक कार्यात लक्ष घालाल. शुभ ता. १९, २२, २३

### तुला:- शारीरिक समस्या

षष्ठात रविवारी मंगळ- शनिची युती आहे. त्यामुळे शारीरिकबाबतीत समस्या संभवतात. फार धावपळ, दगदग करू नका. धार्मिक, सामाजीक कार्यात जास्त लक्ष घालू शकाल. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. संततीच्या प्रगतीकडे अधिक लक्ष घालावे. विलंब संभवतो. शुभ ता. १९, २१

### वृश्चिक:- सामंजस्याने रहावे

पंचमात मंगळ- शनिची युती होत आहे. आर्थिक कामे विलंबाने होतील. संततीच्या हितसंबंधाकडे दुर्लक्ष करू नका. स्पर्धांमध्ये यश मिळेल. विलंबाने प्रश्न सुटतील. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. शुभ कार्यात अडचणी संभवतात. वादाचे प्रसंग टाळावेत. शुभ ता. १९, २४

### धनु:- प्रवासात समस्या

सुखस्थानी सप्तारंभी मंगळ- शनिची युती होत आहे. त्यामुळे कोणत्या ना कोणत्या कारणावरून अस्वास्थ राहिल. घरातील वातावरण शांततेचे ठेवावे. वाहनांची सर्व्हिसिंग करून घ्या. प्रवासात समस्या संभवतात. नव्या कार्यात अधिक लक्ष घालावे. ऐष आरामची आवड वाढेल. विविध प्रतिकूलतेतून मार्गही निघत जाईल. चिंता नको. शुभ ता. १९, २२

### मकर:- आर्थिक समस्या

पराक्रमस्थानी मंगळ- शनि युती होत आहे. त्यामुळे परिश्रमाच्या मानाने प्राप्तीचे प्रमाण साधारण राहिल. भावंडाबाबत चिंता संभवते. विनाकारण जास्त धावपळ होईल. आर्थिक समस्या संभवतात. नवीन कामे विचाराने करावीत. दूरचे प्रवास टाळावेत. संततीशी मतभेदाचे प्रसंग टाळावेत. पोटाच्या तक्रारींची दखल घ्यावी. आहाराकडे दुर्लक्ष नको. शुभ ता. १९, २४

### कुंभ:- विचाराने बोलावे

धनस्थानी मंगळ-शनिची युती आज रविवारी होत आहे. त्यामुळे ऐन अक्षय्य तृतीयेस धनचिंता राहिल. कार्यक्षेत्रात अधिक परिश्रमघ्यावे लागेल. मोजकेच व विचाराने बोलावे. अन्यथा कार्यहानी संभवते. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. अनावश्यक खर्च कसोशीने टाळावेत. नव्या कामात अधिक लक्ष घालावे. अडचणी संभवतात. शुभ ता. १९, २३

### मीन:- स्वास्थ टिकवा

आपल्या राशीतच मंगळ- शनिची युती होत आहे. त्यामुळे शारीरिक व मानसिक स्वास्थ कसे टिकून राहील, याकडे लक्ष द्यावे. कलेत परिश्रमाने प्रगती होईल. भागीदारीच्या व्यवसायात सामंजस्याने रहावे. कौटुंबिक जीवनातही एक विचाराने रहावे. प्रशासन सेवेत अनुकूलता राहिल. सुखस्थ गुरूमुळे सर्व समस्यांतून मार्ग निघत जाईल. चिंता नको. शुभ ता. १९, २४

!! शुभ भवतु !!

तत्त्वदर्शन डॉ. राजेंद्र डोळक

# भारतीय दर्शन



भारतीय तत्त्वज्ञानालाच 'भारतीय दर्शने' असे म्हटले जाते. या दोहोंचेही सूक्ष्म अर्थ भिन्न असले, तरी ते परस्परपूरक आणि एकमेकांत गुंफले आहेत. 'दर्शन' हा शब्द 'दृश' या मूळ धातूपासून बनला आहे. 'दृश' म्हणजे पाहणे. 'दर्शन'चा साधारण अर्थ भेटणे किंवा दिसणे. एखादी व्यक्ती खूप दिवसांनी भेटली की, आपण 'अलभ्यदर्शन' असे म्हणतो. दर्शनचा मूळ अर्थ दृष्टी. जे दिसते ते पाहण्याचा विषय म्हणजे 'दृश्य.' ते पाहणारी व्यक्ती म्हणजे द्रष्टा. द्रष्ट्याला ज्यावेळी जे 'दृश्य' दिसते ते दर्शन. दर्शन घेतो तो दार्शनिक. माणसांच्या सर्व ज्ञानेन्द्रियांमध्ये डोळा हे सर्वात विश्वसनीय म्हणून सत्याच्या जवळ जाणारे इंद्रिय असल्याने 'दर्शन' महत्त्वाचे मानले गेले. यासाठीच 'चक्षुर्वैसत्यम' किंवा 'चक्षुर्वैप्रतिष्ठा' म्हणतात. या अर्थाने 'तत्त्वज्ञान साधन शास्त्रदर्शनम' म्हणजे तत्त्वाचे ज्ञान (तत्त्वज्ञानाचे) होण्यास साधन असे शास्त्र म्हणजे 'दर्शन' असे म्हटले आहे.

'तत्त्वज्ञान', 'फिलॉसॉफी' आणि 'दर्शन' हे शब्द अनुक्रमे मराठी, इंग्रजी आणि हिंदी भाषेत साधारणतः एकाच अर्थाने वापरले जातात. व्यावहारिक सुलभता म्हणून ते ठीक आहे. परंतु त्यात सूक्ष्म फरक आहे. 'तत्त्वज्ञान' हा शब्द आपण सरधोपटपणे वापरतो. व्यक्तिगणित तत्त्वज्ञान भिन्न असू शकते, पण 'दर्शनां'चे तसे नाही. दर्शन हे एका निश्चित व्यक्तीच्याच नावाने ओळखले जाते. जसे 'पूर्वमीमांसा' म्हटले म्हणजे जैमिनी, 'सांख्यदर्शन' म्हटले की 'कपिल', 'योगदर्शन' म्हटले म्हणजे पतंजली, 'वैशेषिक' म्हटले की कणाद, 'न्यायशास्त्र' म्हटले की गौतम इत्यादी. इंग्रजीमध्ये दर्शनांना सिस्टिम म्हणण्याची पद्धती आहे. जसे वेदांत सिस्टिम, सांख्य सिस्टिम याप्रमाणे. तत्त्वज्ञानाला 'फिलॉसॉफी' हा जो इंग्रजीमध्ये शब्द सांगितला जातो तो मुळात प्राचीन ग्रीकमधील आहे.

सोफिया=शहाणपणा आणि फिलिन=प्रेम करणे. या दोन शब्दांपासून तो बनला आहे. फिलॉसॉफी=शहाणपणा विषयीचे प्रेम; आणि फिलॉसॉफर=तत्त्वज्ञानी=शहाणपणा विषयी प्रेम बाळगणारा. पण शहाणपणाविषयी प्रेम बाळगणारा हा स्वतः हटकून शहाणा असतोच असे नाही. ग्रीक तत्त्वज्ञांनी सॉक्रेटिस याला लोक शहाणा म्हणत. पण तो म्हणे, 'मी शहाणा नाही. मी शहाणपणावर फक्त प्रेम करतो आणि सर्व लोकांच्या अंगी ते यावे, असावे अशी माझी इच्छा असते. तो करी ते फक्त इतकेच की, ज्ञानी असे स्वतःला म्हणून घेणाऱ्यांना प्रश्न करकरून मूर्ख व अज्ञानी ठरवी. त्यांना असे जाणवी की, 'अजून तुम्हाला सत्यज्ञानही नाही, मग खरे शहाणपण अंगी येण्याचे दूरच आहे.' 'तत्त्वज्ञान' हा शब्द इंग्रजी 'फिलॉसॉफी'चे भाषांतर असले, तरी तो दर्शन या शब्दाच्या अधिक जवळचा वाटतो.

आपल्याकडे 'दर्शन' हे ज्याप्रमाणे व्यक्तीच्या नावाने ओळखले जाते त्याचप्रमाणे पाश्चात्त्यांमध्येही ते व्यक्तीच्या नावाने ओळखले जाते. जसे सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल, कांट, हेगेल यांची तत्त्वज्ञाने. 'इंडियन फिलॉसॉफी', 'वेस्टर्न फिलॉसॉफी' यांचे भाषांतर अनुक्रमे भारतीय दर्शन, पाश्चात्त्य दर्शन असे केले जाते. 'डिपार्टमेंट ऑफ फिलॉसॉफी' याच्या बरोबरीने 'दर्शन विभाग' असे लिहिलेले असते. तत्त्वज्ञान किंवा दर्शन कोणतेही असले, तरी सृष्टी आणि माणूस समजावून घेणे, ही सर्वसमावेशक भूमिका त्यामागे असते. या भूमिकेतून तो या संबंधांकडे पाहतो तेव्हा त्याचे दर्शन प्रत्येकाला वेगवेगळे झाले. अशा विविध दर्शनांची चर्चा होण्यालाच दर्शनशास्त्र असे म्हटले गेले. सृष्टीच्या मूळ तत्त्वाचे आणि सत्याचे यथार्थ ज्ञान करून घेणे ही जिज्ञासा सर्व तत्त्वज्ञानाच्या मुळाशी असली, तरी भारतीय तत्त्वज्ञानाचे अथवा दर्शनांचे एक निराळे वैशिष्ट्य असे की, त्यांनी संसार दुःखमय आहे ही कल्पना गृहीत धरून आपल्या दर्शनांची उभारणी केली आहे. बौद्ध दर्शनाने तर 'सर्व दुःखम' अशा स्पष्ट शब्दांत स्वतःचे मत प्रकट केले आहे. दुःखाची मीमांसा करताना भारतीय दर्शने असे सांगतात की, जगात उपलब्ध होणारी बहुतेक सुखसाधने ही दुःखाशी निरंतर संबद्ध आहेत. त्यांना दुःख सतत चिकटलेले असते. विविध अडचणींनी ती साधने गुरफटलेली आहेत म्हणून सर्व सुखसाधने हे मूर्तिमंत दुःख होय. शरीर हे दुःखाचे माहेरघर आहे. इंद्रिये, विषय आणि विषयांच्या संवेदना ही दुःखाची साधने असल्यामुळे त्यांना दुःख असे म्हटले आहे. सुखसुद्धा दुःखाने व्यापलेले असल्यामुळे दुःख होय आणि दुःख हे तर स्वतः दुःख आहेच. अशारीतीने हा संपूर्ण संसार प्रामुख्याने दुःखमय आहे, अशी मीमांसा भारतीय दर्शनांनी केली आहे. अशी मीमांसा पाश्चात्त्य दर्शनात दिसत नाही. त्यांना हा निराशावाद वाटतो. परंतु त्यांनी हे लक्षात घेतले नाही की, भारतीय दर्शनाने संसाराचे चित्र जरी दुःखमय व दुःखप्रधान स्वरूपात रेखाटले असले, तरी दुःखाचा नाश होणे अशक्य आहे, असा निराशावादी सूर आळवला नाही. उलट संसारातील दुःखांची सूक्ष्म मीमांसा करून त्या दुःखांचा परिहार करून आनंदप्राप्ती कशी करून घ्यावी हे सांगणे, यावरच सर्व दर्शनांचा भर आहे. दुःख हा भारतीय दर्शनकारांचा अंतिम शब्द नसून अंतिम तत्त्वांचे संपादन करण्याचा एक उपाय, एक साधन आहे. दुसऱ्या शब्दात दुःख निवृत्तीच्या प्रत्यक्ष गरजपूर्तीने हे तत्त्वज्ञान निर्माण झाले, असेही म्हणता येईल. दुःख निवृत्ती होऊन आनंदप्राप्ती व्हावी ही व्यावहारिक गरज या 'दर्शनां'द्वारे साधली गेली आहे. दुःखनिवृत्तीच्या स्थितीला 'मोक्ष' असे म्हटले आहे. 'मोक्षा'त आत्यंतिक दुःखनिवृत्ती म्हणजेच संपूर्ण आनंद असतो. त्यात दुःखाचा लव-लेश नसतो. जिवाला सुखाचे प्रचंड आकर्षण असते. ते कायम हवे असते आणि दुःख मात्र कधीच नको असते. जीव सदैव दुःख टाळण्याचाच प्रयत्न करीत असतो; पण हे शक्य नसते. कारण जीवन हे सुख-दुःखमय असते. या प्रयत्नातून म्हणजेच दुःखापासून सुटका होऊन जास्तीत जास्त निर्भेळ सुख कसे प्राप्त होईल याचे ज्ञान करून देणे हेच तत्त्वज्ञानाचे खरे प्रयोजन असते. भारतीयांनी या स्थितीलाच 'मोक्ष' म्हटले आहे. 'मोक्ष' या शब्दाचा अर्थ मुक्ती अथवा सुटका असाही आहे. त्यावरून दुःखापासून सुटका होऊन सुखाची प्राप्ती होते. अशी स्थिती म्हणजे मोक्ष अशी व्याख्या रूढ झाली. या मोक्षनामक स्थितीलाच 'ब्राह्मीस्थिती' असे म्हटले आहे व म्हणून पर्यायाने 'ब्रह्म' हीच अंतिम ज्ञेय वस्तू ठरते. अशा रीतीने 'दर्शन म्हणजे मोक्ष व त्याप्रत जाणारे उपाय याची प्रत्यक्षानुभावादी ज्ञानप्रमाणांच्या आधारावर केलेली मीमांसा.' अशी दर्शन शब्दाची व्याख्या केली जाते. थोडक्यात सांगायचे झाल्यास मोक्षशास्त्रालाच दर्शन हे दुसरे नाव आहे. दुःखनिवृत्ती म्हणजेच मोक्ष आणि त्याचे ज्ञान प्राप्त करून घेणे हे मत सर्व दर्शनांना संमत असताना दर्शनांचे प्रकार वेगवेगळे का झाले, हा एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो. याचे उत्तर असे की, दुःखमुक्ती हा सर्वच दर्शनांचा विषय असला आणि त्याकरिता सर्व दर्शनकारांनी सृष्टीतील मूलतत्त्वाकडे धाव घेतली असली, तरी या मूलतत्त्वाकडे पाहण्याच्या दृष्टीत फरक पडला. सांख्यदर्शन हे द्वैतवादी दर्शन ठरले तर न्याय, वैशेषिक, जैन यांसारखी परमाणुवादी दर्शने अनेकत्त्ववादी म्हणून मानली गेली. असे असले तरी सर्व दर्शनांचे उद्दिष्ट मात्र एकच आहे आणि ते म्हणजे सृष्टीतील मूलतत्त्वांचा शोध घेणे आणि मोक्ष प्राप्तीचा उपाय सांगणे.

पान २ वरून

## साक्षी भाव

मला माझ्या मुलीपासून तोडलंस.'' कौटुंबिक न्यायालयात अनेक वाद-प्रतिवाद करीत त्यांचा घटस्फोट झाला. साक्षी लहान असल्यामुळे कस्टडी अर्थातच क्षिप्राला मिळाली. मात्र आठवड्यातून एक दिवस वडिलांना भेटण्याची न्यायालयाने परवानगी दिली. तेव्हापासून साक्षी शनिवारी संध्याकाळी जाऊन रविवारपर्यंत आपल्या पापा व आजीसोबत राहू लागली. ग्रॅंडपाचे खूप मोठे घर, नोकरचाकर, खेळायची खूप साधने होती; मात्र तिथे अनेक बंधने असायची. कुणाशी खेळायचे, कुणाशी बोलायचे, एक ना दोन. पापा आणि आजीचे मात्र छोटे घर. छान छान गोष्टी सांगणारी, जवळ घेणारी आजी, तिच्याशी खूप खेळणारा पापा त्यामुळे साक्षीला साहजिकच पापांच्या घरी राहावेसे वाटे. मात्र, ग्रॅंडपांना ते आवडत नसे. एक दिवस तिने विचारले, ''ए मम्मा! माझं कोणतं घर खरं आहे, इकडचं की पापाचं? मला नक्की सांग. मला कोणतंही एक घर हवं आहे.'' हे ऐकताच तिचे ग्रॅंडपा जोरात ओरडले, ''जा... तुझ्या बापाला इथे राहायला घेऊन ये. तुझी मम्मा कुठेही जाणार नाही.'' घाबरलेली साक्षी म्हणाली, ''मी स्कूल हॉस्टेलमध्ये राहायला जाते. मला कुणीच नको. मी एकटीच राहणार...'' आणि तिच्या निरागस डोळ्यात अश्रू आले. हे ऐकून क्षिप्रा प्रचंड हादरली. ''अरे देवा! ही एवढी लहानशी मुलगी असा विचार करते.'' आपल्या मुलीला आई आणि वडील दोघांचे प्रेम मिळाले नाही तर तिची निकोप वाढ होऊ शकणार नाही, हे तिच्या लक्षात आलं. एक दिवस घरी कायदा सल्लागार आणि तिचे पप्पा बोलताना, तिचे नाव आल्याने ती तिथेच थबकली. तिने ऐकले की घरातला बिझनेस घरातंच राहावा व जहागीरदारांचे नाव त्या मोठ्या इस्टेटीवरून पुसले जाऊ नये म्हणून तिनेच ही कंपनी पुढे चालवावी, असे तिच्या पप्पांना वाटत होते. म्हणूनच त्यांनी तिचा घटस्फोट घडवून आणला... हे ऐकताच तिला त्यांचा स्वार्थीपणा स्पष्ट दिसू लागला आणि तिची नजर स्वच्छ झाली. खरं तर सारंग आणि तिच्यामध्ये केवळ परिस्थितिजन्य दुरावा होता. मतभेदाचे मूळ कारण होते तिच्या वडिलांची स्वार्थी मानसिकता आणि सारंगचे स्वाभिमानी विचार! एका सोमवारी सकाळी तिने पाहिले, साक्षी आपल्या पुस्तकांसोबत काही कपडेही भरते आहे दप्तरात... आता नक्कीच निर्णय घेण्याची वेळ आली आहे, असे तिच्या मनाला वाटले. सहा वर्षांच्या लहान मुलीची होणारी कुतरओढ, वडिलांचे स्वार्थी विचार या साऱ्याचं अचानकच तिच्या मनावर दाट मळभ दाटून आलं. तिने मनोमन आपले अंतरंग खंगाळले. तिला कळले की, तिचे पुढचे आयुष्य सारंग आणि साक्षीशिवाय अपूर्ण आहे. आज एका लहानशा जीवाने तिचे डोळे उघडले. जेव्हा तिने साक्षी भावाने तिच्या अंतर्मनात डोकावले तंव्हा योग्य निर्णय घेतला आणि ती साक्षीसोबत आपलेही कपडे भरू लागली...

पान २ वरून

## रेल्वे स्थानकांवर वाढणारी बालपणं

फक्त मुलांना स्थानकावरून हटवणं हा उपाय नाही. त्यांना सुरक्षित निवारा, समुपदेशन, शिक्षण आणि कुटुंबाशी पुनर्मिलन या सगळ्या गोष्टींची गरज असते. अन्यथा ती मुलं पुन्हा त्याच परिस्थितीत परतण्याची शक्यता असते. रेल्वे स्थानकांवर वाढणाऱ्या मुलांचा प्रश्न हा केवळ बालसंरक्षणाचा मुद्दा नाही; तो समाजाच्या असमानतेचा आणि उदासीनतेचाही आरसा आहे. जेव्हा एखादं मूल प्लॅटफॉर्मवर रात्र घालवतं, तेव्हा ती केवळ एका कुटुंबाची अपयशाची कथा नसते; ती समाजाच्या दुर्लक्षाची कहाणी असते. बालपण म्हणजे सुरक्षितता, शिक्षण, खेळ आणि स्वप्नांची जागा असायला हवी. पण जेव्हा बालपण रेल्वेच्या गोंगाटात, धुरात आणि अस्थिरतेत वाढतं, तेव्हा त्या मुलांच्या आयुष्यातील अनेक शक्यता आधीच कमी होतात. म्हणूनच या प्रश्नाकडे केवळ सहानुभूतीने नव्हे, तर जबाबदारीने पाहण्याची गरज आहे. कारण प्रत्येक रेल्वे स्थानकावर दिसणारं ते मूल आपल्याला एकच प्रश्न विचारत असतं ''प्रवास करणाऱ्यांच्या देशात, माझ्या बालपणाला कुठेच पोहोचायचं ठिकाण नाही का?''

पान ३ वरून

## तंत्रयुक्ती : ग्रंथ वाचनाची शास्त्रीय पद्धत

**सारांश:** या सर्व युक्त्या म्हणजेच ग्रंथ उलगडण्याच्या किल्ल्या. यांच्या योग्य वापराने अर्थ अचूकतेने समजतो. ग्रंथांतरीचे गूढ उकलते.

आता एखादे उदाहरण घेऊन तंत्रयुक्तीचा प्रत्यक्ष उपयोग करून बघू. '**कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन। मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते सङ्गोऽ स्त्वकर्मणि।।**' या श्लोकाचा उपक्रम कर्मयोगाची महती सांगण्यासाठी आणि उपसंहार अर्जुनाला कर्मप्रवृत्त करण्यासाठी आहे. याचा निष्कर्ष कर्मयोग हाच आहे. याचे प्रकरण म्हणजे अर्जुनाचे भलत्या वेळेस संभ्रमित होणे. एकाच श्लोकात 'मा' हे नकारार्थी पद तीन वेळा येणे हा अभ्यास, वारंवार 'मा' म्हणत निषेध आणि कर्म कर हा आदेश असे आहे. बंधमुक्ती हे फल सूचित आहे. फलाशा नको हे कर्म निरर्थक नाही तर निष्कामतेने करावे हे अर्थात्पतीने सांगितले. यात कर्माचा अधिकार आहे फलाचा नाही, हे लिङ्ग म्हणजे संकेताने सांगितले. यातील वाक्य म्हणजे कर्म आवश्यक पण आसक्ती टाळावी. यातील उपपत्ती म्हणजे फळावर लक्ष ठेवशील तर दुःखी होशील.

अर्जुनाची प्रारंभीची युद्ध टाळू का ही शंका; पण तिचे टाळू नकोस, असे समाधान आहे. अतिदेश म्हणजे हे विधान फक्त युद्धापुरतेच नसून सर्वच व्यवहारांसाठी आहे. याचा अन्वय किंवा व्यतिरेक म्हणजे कर्म करशील तर प्रगती, न करशील तर अधोगती. तंत्रयुक्तीमुळे उलगडलेला श्लोकाचा अर्थ : हा श्लोक फक्त कर्म कर इतकेच सांगत नसून कर्म कर, आसक्ती नको, तुझा फळावर अधिकार नाही आणि कर्म टाळणे हा पर्याय नाही असे सांगतो. याप्रमाणे तंत्रयुक्तीचा उपयोग कोणत्याही विषयावरील ग्रंथ व्यवस्थित समजून घेण्याकरिता करता येतो. अर्जुनाला कृष्णाने विश्वरूप दाखवण्यास सुरुवात केली, पण त्याच्या सामान्य दृष्टीला काहीच दिसू शकले नाही.

तेव्हा कृष्णाने 'दिव्यं ददामि ते चक्षुः' असे म्हणत त्याला दिव्यदृष्टी दिली. याचप्रमाणे तंत्रयुक्तीच्या कर्त्याने सर्वांसाठी ही बौद्धिक दिव्यदृष्टी दिली आहे. हिच्या सहाय्याने कोणत्याही विषयाच्या ग्रंथाच्या आणि फक्त ग्रंथच का म्हणावे? कोणत्याही कृतीच्या अंतरंगात सहजपणे शिरून तिच्या निर्मात्याला अभिप्रेत भूमिकेशी तादात्म्य साधता येते. मग ती कृती म्हणजे साहित्य असो, संगीत असो, शिल्पकला असो किंवा अजून काही असो.

'तंत्रयुक्ती' या विषयावर आयुर्वेद अभ्यासक्रमासाठी उपयुक्त असा एक ग्रंथ माझ्या वडिलांनी- आयुर्वेदाचार्य पंडितराव हिर्लेकरांनी सुमारे ५५ वर्षांपूर्वी लिहिलेला आहे.

पान ५ वरून

## कॉर्पोरेट जिहाद': आता आणखी किती...

धर्मांध लोकच का टीम लीडर्स होतात? किंवा हाताखाली गोरगरीब हिंदू असतील तिथे ते वरिष्ठ म्हणून कसे पोहोचतात? तर त्या स्तरावर पोहोचलेच पाहिजे आणि का पोहोचले पाहिजे? याबाबतचा त्यांचा हेतू स्पष्ट आणि ठाम असतो. तिथेपर्यंत ते पोहोचावेत म्हणून, त्यांना मदत करणारी एक सपोर्ट सिस्टम असते. अर्थातच, पुरोगामी स्वतःच्या हिंदू धर्माची ओळख विसरलेले आणि छोट्या-मोठ्या आमिषाने खूश होणार्या, काही स्वाथ हिंदूंची यात मोलाची भूमिका असते. आम्ही धर्म मानत नाही, आम्हाला कामाशी काम. जो आम्हाला काही देईल आम्ही त्याचेच ऐकू. आमचा फायदा झाला आणि दुसर्याचे नुकसान झाले, तर आम्हाला काही देणेघेणे नाही, अशी भूमिका असलेल्या काही हिंदूंमुळेच, हिंदू समाजाचे नुकसान होत आहे. खरेतर तिने फरमान खानशी केलेला विवाह म्हणजे, 'लव्ह जिहाद'ला सपोर्ट सिस्टम कसे काम करते याचे उत्तम उदाहरण ठरावे. ती अल्पवयीन असूनही ती सज्ञान आहे असा दावा करणे, तिच्या तोंडून हिंदूंच्या देव-देवतांचा उच्चार करवून घेणे, सुंदर, अतिश्रीमंत, मोठमोठ्या घरच्या अभिनेत्रीही मुस्लिमांशी विवाह करतात, म्हणजे तसे करणे चांगलेच आहे असे मोनालिसाच्या तोंडून वदवणे, केरळमच्या कम्युनिस्ट सरकारच्या मंत्र्यांनी तिच्या विवाहाला हजर राहणे, या सगळ्या गोष्टी एकमेकांशी जोडलेल्या आहेत.

तलवारीच्या आणि शस्त्राच्या धाकदपटशाच्या माध्यमातून हिंदूंना या देशात अल्पसंख्याक करता येणार नाही, म्हणून त्यांनी रचलेल्या या असंख्य षड्यंत्रांना आपण कसे थांबवणार आहोत? 'आपल्या घराबाहेर काहीही होवो, आम्हाला काय करायचे; मरू दे तिकडे' ही वृत्ती जोपर्यंत आपण सोडत नाही आणि सकल हिंदू म्हणून जोपर्यंत संघटित होत नाही, तोपर्यंत अशाप्रकारचे हजारो 'जिहाद' दररोज उघड होतच राहणार! हिंदू तेज जागा रे!

# मतदारयाद्यांवरून ममतादीदींचा थयथयाट



राजकारण — दत्ता पंचवाघ

प. बंगालमध्ये दि. २३ एप्रिल ते २९ एप्रिल या काळात विधानसभेच्या निवडणुका होत आहेत. या निवडणुकीत तृणमूल काँग्रेससमोर लोकसभा निवडणुकीप्रमाणेच भारतीय जनता पक्षाने तगडे आव्हान उभे केले आहे. प. बंगाल विधानसभेच्या एकूण २९४ जागा असून, या निवडणुकीत राज्याची सत्ता मिळवायचीच, या निर्धाराने भारतीय जनता पक्ष निवडणूक रिंगणात अगदी त्वेषाने उतरला आहे. या निवडणुकीपूव प. बंगालमध्ये मतदारयाद्यांची विशेष सखोल फेररचना (एसआयआर) करण्याचा कार्यक्रम निवडणूक आयोगाने हाती घेतला होता. त्या कार्यक्रमास तृणमूल काँग्रेसने आणि त्या पक्षाच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांनी वेळोवेळी आक्षेप घेतला. मतदारयाद्यांची विशेष सखोल फेररचना करण्यामागे केंद्रातील भाजपला मदत व्हावी, हा निवडणूक आयोगाचा अंतस्थ हेतू असल्याचा आरोप त्यांनी केला. पण, प्रत्यक्षात असे मुळीच नाही. प. बंगाल हे भारत-बांगलादेश सीमेवरील एक संवेदनशील राज्य. या राज्यात मोठ्या प्रमाणात सातत्याने घुसखोरी होते. तसेच तेथून येणारे घुसखोर हे मतदारयाद्यांमध्ये आपले नाव घुसडून मतदानाचा हक्क बजाविण्याचे उद्योग वर्षानुवर्षे करीत आहेत. असे सर्व बेकायदेशीर मतदार शोधून काढून त्यांची नावे मतदारयाद्यांमधून वगळण्याची विशेष मोहीम निवडणूक आयोगाने हाती घेतली होती. पण, त्या मोहिमेला ममता बॅनज यांच्यासह काही विरोधी पक्षांनी विरोध केला होता. पण, मतदारयाद्यांची सखोल फेररचना करणे हे देशाच्या हिताचा विचार करता आवश्यक होते. पण, ममतादीदी यांना मात्र ते मान्य नव्हते! निवडणूक आयोगाने प. बंगालमध्ये मतदारयाद्यांची फेररचना करून या यादीमधून सुमारे ९० लाख लोकांची नावे वगळली. हे ९० लाख लोक आतापर्यंत मतदानास पात्र होते. पण, आता त्यांची नावे वगळण्यात आल्याने आपली मोठी 'मतपेढी' हातातून गेल्याने तृणमूल काँग्रेससह अन्य पक्षांची 'कोल्हेकुई' सुरु आहे. पण, निवडणूक आयोगाने काही प्रथमच अशी विशेष मोहीम हाती घेतली नव्हती. गेल्या दोन वर्षांमध्ये देशातील काही राज्यांमध्ये अशी मोहीम हाती घेण्यात आली होती. २०१४ मध्ये घेण्यात आलेल्या मोहिमेत आंध्र प्रदेशात १८.६ लाख, महाराष्ट्रात २१.५ लाख, हरियाणात ५.८ लाख आणि ओडिशा राज्यात ९.४ लाख नावे मतदारयाद्यांमधून वगळण्यात आली होती. २०२५ मध्ये दिल्ली आणि बिहारमध्ये ही मोहीम राबविण्यात आली. दिल्लीमधून ११.२ लाख आणि बिहारमधून ४६ लाख नावे वगळण्यात आली, तर केरळम्मधून ८.५७ लाख, तामिळनाडूमधून सुमारे ७४ लाख नावे वगळण्यात आली होती. प. बंगालसाठी अशी फेररचना करणे आवश्यकच होते. हे राज्य अत्यंत संवेदनशील असून भारत आणि बांगलादेश यांच्यात ४ हजार, ९५ किमी इतक्या लांबीची सीमा आहे. त्यातील सुमारे २ हजार, २१६ किमी सीमा ही प. बंगाल राज्यासमवेत आहे. उत्तर २४ परगणा, नादिया, मुर्शिदाबाद, मालदा, उत्तर दिनाजपूर, दक्षिण दिनाजपूर, जलपैगुडी, कुचबिहार असे जिल्हे सीमेला लागून आहेत. या भागांमधून सातत्याने घुसखोरी होत आली आहे. कोणतीही कागदपत्रे नसलेले असंख्य घुसखोर प. बंगालमध्ये राहात असून, ती एक डोकेदुखी ठरली आहे. असे असून गेल्या तीन वर्षांमध्ये केवळ २ हजार, ६०० बांगलादेशी नागरिकांना परत पाठविण्यात आले. ही सर्व स्थिती लक्षात घेऊन या राज्यात मतदारयाद्यांची सखोल फेररचना करणे आवश्यक होते. खरे म्हणजे, ममता बॅनज यांनीही त्यास विरोध करण्याचे काही कारण नव्हते. कारण, ही फेररचना देशहिताचीच होती. परंतु, केवळ आपलाच विचार करणाऱ्या ममता बॅनर्जी यांच्या ते कधी लक्षात येणार? त्यातूनच त्यांचा हा थयथयाट सुरू आहे, इतकेच!

**प. बंगालमध्ये 'एसआयआर' प्रक्रिया राबविण्याचा निर्णय झाल्यापासून, ते प्रक्रियेदरम्यान आणि आता प्रक्रियेनंतरही वाद काही शमलेला नाही. कारण, 'एसआयआर'मुळे प. बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जीची हक्काची 'व्होटबँक' असलेल्या लाखो अवैध घुसखोरांची नावे वगळण्यात आली आहेत. पण, तरीही ममतादीदींचा थयथयाट थांबलेला नसून, हा मुद्दा प्रचाराच्या केंद्रस्थानी त्यांनी कायम ठेवलेला दिसतो. आता दीदींनी त्यावरुन कितीही राजकीय भांडवल लाटायचे ठरवले तरी उपयोग शून्यच! कारण, पंतप्रधान मोदींच्या सभांना होणार्या रेकॉर्डब्रेक गदने दीदींची पुरती घाबरगुंडी उडाली आहे.**

# इतिहासाचे भविष्य

**मानवी संस्कृतीचा चेहरामोहरा बदलण्याची ताकद दोन विद्याशाखांमध्ये आहे. पहिले म्हणजे विज्ञान आणि दुसरी म्हणजे इतिहास! इतिहास या विद्याशाखेचा विचार करताना, बर्याचदा केवळ विशिष्ट घटना आणि त्यासंदर्भातील प्रवाह यांवरच भाष्य केले जाते. मात्र, बरेचदा यापेक्षा वस्तुस्थिती पूर्णपणे वेगळी असते. वर्तमानातील संस्कृतीवर ऐतिहासिक घटनांचा, व्यक्तिरेखांचा, जीवनपद्धतीचा प्रभाव असतो. 'व्यक्ती ते समष्टी' अशा सर्वंकष प्रभावाखालीच समाज जगतो. इतिहासाचे सम्यक् आकलन नसेल, तर कुठलेही राष्ट्र प्रगती करू शकत नाही.**

वेध — मुकुल आव्हाड

यामध्ये इतिहासकारांची, संशोधकांची भूमिका महत्त्वाची अशीच. म्हणूनच कदाचित, प्रख्यात इतिहासकार एडवर्ड हॅलेट कार एके ठिकाणी असे म्हणाले होते की, मांडलेल्या वस्तुस्थितीचा अभ्यास करण्यापूर्वी, मांडणाऱ्या इतिहासकाराचा अभ्यास करावा! आज आपल्या भोवतालचा परिवर्तनाचा वेग प्रचंड वाढला असताना, इतिहास दररोज आपल्यासमोर नवीन आव्हानं घेऊन उभा ठाकत आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे, सगळ्यांचेच जीवन बदलून गेले आहे.

कलेच्या क्षेत्रातही आज याचा वापर वाढला आहे. 'एआय'च्या माध्यमातून तयार केलेले व्हिडिओ, गाणी यांचादेखील समाजमाध्यमांवर सध्या बोलबाला आहे. ऐतिहासिक पात्रांना जिवंत करून, आपल्याला हवी तशी माहिती त्यांच्याकडून वदवून घेणारे महाभागही कमी नाहीत. या सगळ्या गोष्टी मनोरंजनाच्या कक्षेपुरत्या मर्यादित असल्या, तरी खऱ्या अर्थाने वारसा आणि संस्कृतीच्या संवर्धनासाठी 'एआय' तंत्राचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. उदाहरणार्थ, एखाद्या जुन्या चित्राचे विलेषण करताना, 'एआय'मधील 'इमेज प्रोसेसिंग' अल्गोरिदम क्ष- किरण आणि 'इन्फ्रारेड डेटा'चा वापर करून, चित्राच्या मूळ थराची पुनर्रचना करतात. यालाच 'डिजिटल रीस्टोरेशन' म्हणतात. यामुळे मूळ पेंटिंगला स्पर्श न करता, चित्रकाराने सुरुवातीला काय काढले होते, याचे हुबेहूब डिजिटल चित्र 'एआय' तयार करून देते. मशीन लर्निंग मॉडेल्सना जुन्या काळातील रंगांच्या डेटाबेसचे प्रशिक्षण दिलेले असते. त्यामुळे रंगसंगतीमधील फरक 'एआय' अगदी अचूकपणे सांगतो. याच्याही पुढे जाऊन, 'एआय' चित्रांमध्ये वगकरण करून, त्यातील सूक्ष्म नोंदी आपल्याला सांगते. ऐतिहासिक कागदपत्रं, दस्तऐवज, काही विशिष्ट लिपींमधील कागदपत्रं यांचे मोठ्या प्रमाणत जतन- संवर्धन सुरू असते. त्यातूनच येणाऱ्या काळात इतिहास संशोधनाला नवी दिशा मिळेल, यात शंका नाही. मात्र दुसऱ्या बाजूला कृत्रिम बुद्धिमत्ता आपला इतिहासाकडे आणि समाजाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलू शकते. काही दिवसांपूव 'पीएनएएस नेक्सस' येथे प्रकाशित एका अभ्यास अहवालानुसार, जेव्हा लोक ऐतिहासिक तथ्यांसाठी चॅटबॉट्सवर अवलंबून राहतात, तेव्हा त्यांच्या राजकीय विचारसरणीवर परिणाम होतो. संशोधकांनी या अभ्यासामध्ये सहभागी झालेल्या लोकांना काही ऐतिहासिक आणि राजकीयदृष्ट्या संवेदनशील विषयांवर प्रश्न विचारण्यास सांगितले होते. यामध्ये 'एआय'ने दिलेल्या उत्तरांचा अभ्यास करण्यात आला. 'एआय' जेव्हा एखाद्या ऐतिहासिक घटनेचे विलेषण करते, तेव्हा त्यातील भाषेचा कल वापरकर्त्यांच्या विचारांवर प्रभाव पाडत असल्याचे दिसून आले. 'एआय' माहिती देताना काही तथ्ये ठळकपणे मांडते, तर काही जाणीवपूर्वक किंवा तांत्रिक मर्यादांमुळे वगळते. यामुळे वाचकाला पूर्ण सत्य समजल्याचा भास होतो. अभ्यासात असे दिसून आले की, वापरकर्त्यांनी वारंवार 'एआय' वापरल्यास त्यांच्या मूळ राजकीय भूमिकांमध्ये बदल होऊन, त्या 'एआय'ने मांडलेल्या भूमिकेकडे झुकू लागतात. ऐतिहासिक घटनांकडे पाहण्याचे अनेक दृष्टिकोन असतात मात्र, 'एआय' अनेकदा एका सरासरी किंवा मुख्य प्रवाहातील दृष्टिकोनातूनच माहिती देते. जेव्हा वापरकर्ते यालाच अंतिम सत्य मानतात, तेव्हा इतिहास समजून घेण्याची त्यांची क्षमता मर्यादित होते. या पार्श्वभूमीवर येणाऱ्या काळात इतिहासकारांची भूमिका किती महत्त्वाची आहे, हे वेगळे सांगायला नको. अशा वेळी इतिहासकाराचे काम हे भूतकाळावर प्रेम करणे किंवा त्यापासून स्वतःची सुटका करून घेणे नसून, वर्तमानकाळाच्या आकलनाची गुरूकिल्ली म्हणून भूतकाळावर प्रभुत्व मिळवणे आणि तो समजून घेणे, हे आहे, हे एडवर्ड हॅलेट कारचं वाक्य महत्त्वाचं ठरतं.






# अजिंक्य स्वरांचा अमर प्रवास...

श्रद्धांजली — डॉ. शुभांगी पारकर

आशा भोसले यांच्याविषयी काही लिहिणे, म्हणजे केवळ एका गायिकेबद्दल लिहिणे नसून, ते एका जिद्दीच्या संघर्षाचेही स्मरण ठरावे. त्यांच्या थोरल्या भगिनी, लता मंगेशकर, यांना जेव्हा 'स्वराभिषेकाची देवता' मानले जात होते, तेव्हा आशाताईंनी स्वतःचे अस्तित्व अतिशय मानवी, लवचिक आणि संघर्षाच्या आगीतून तावून-सुलाखून निघून सिद्ध केले. एक असाहाय्य मुलगी ते एका कणखर स्त्रीपर्यंतचा त्यांचा हा प्रवास 'सायकॉलॉजिकल ग्रिट'चे एक उत्तम उदा. आहे.

**बंडखोरी आणि सुरुवातीच्या काळातील आघात-** आशाताईंच्या व्यक्तिमत्त्वाचा पायाच मुळी बंडखोरीतून रचला गेला. वयाच्या अवघ्या १६व्या वष त्यांनी गणपतराव भोसले यांच्याशी लग्न करून घर सोडले. हा केवळ एक भावनिक निर्णय नव्हता, तर स्वायत्ततेसाठी मारलेली ती एक मोठी उडी होती. मात्र, ज्या स्वातंत्र्याचा त्यांनी शोध घेतला, तेच पुढे घरगुती हिंसेचे कारण बनले. आपण कमावलेले पैसे वापरायचे स्वातंत्र्य त्यांना मिळत नसे. रेकॉर्डिंगमध्ये त्यांना स्वतःच्या बहिणीशीही संवाद साधता येत नसे. तरुण वयात शारीरिक आणि मानसिक छळाला सामोरे जावे लागणे, कोणत्याही स्त्रीला तोडण्यासाठी पुरेसे असते; परंतु या छळातूनच त्यांच्यातील 'बंडखोर स्त्री' जन्माला आली. जेव्हा त्यांना घरातून बाहेर काढले गेले, तेव्हा त्या हार मानून परतल्या नाहीत, तर आपल्या मुलांसाठी आणि भविष्यासाठी ताठ कण्याने उभ्या राहिल्या.

**वडाच्या झाडाची सावली आणि भगिनींमधील स्पर्धा-** आशाताईंच्या आयुष्यातील सर्वांत गुंतागुंतीचा भाग म्हणजे त्यांच्या थोरल्या भगिनीशी, लतादीदींशी असलेली व्यावसायिक स्पर्धा. त्याकाळी चित्रपटसृष्टीत लतादीदींचे स्थान एखाद्या वडाच्या झाडासारखे विस्तीर्ण होते. आशाताईंकडे सुरुवातीला केवळ दुय्यम दर्जाची गाणी येत होती. अशा वेळी न्यूनगंड निर्माण होणे स्वाभाविक होते, पण आशाताईंनी या परिस्थितीचे संधीत रूपांतर केले. त्यांना जाणीव झाली की, टिकून राहण्यासाठी केवळ 'चांगले' असून चालणार नाही, तर आपले वेगळेपण जपणे गरजेचे आहे. त्यांनी पाश्चात्य संगीत, लोकसंगीत आणि शास्त्रीय संगीत अशा सर्व शैलींमध्ये स्वतःला झोकून दिले आणि स्वतःचे एक स्वतंत्र सुरांचे साम्राज्य निर्माण केले.

**एकाकीपणाचा प्रवास आणि पंचमदांची लाभलेली साथ-** त्यांनी समाजमान्यतेची ओढ फार पूर्वच सोडून दिली होती. त्यामुळेच संगीतातील बदल असो किंवा स्वतःच्या आयुष्यातील संघर्षाचे सत्य, त्या कोणत्याही आवर्तनाशिवाय मांडतात. त्यांच्या या मानसिक पारदर्शकतेमुळेच त्या आजही अस्सल वाटतात. चित्रपटसृष्टीच्या चकाकीत वावरताना आशाताईंच्या नावाभोवती अनेक 'गॉसिप्स' आणि चर्चांचे वादळ उठले. समाजाने त्यांच्या खासगी आयुष्यावर भाष्य करण्याची एकही संधी सोडली नाही. परंतु, या सगळ्या अफवांना आणि टीकेला पुरून उरून आपला मार्ग एकट्याने चालणे, हे सोपे नसते. अशा झंझावाती आणि संघर्षाच्या आयुष्यात प्रत्येकाला एका खंबीर साथीदाराची गरज असते, जो तुमच्यातील व्यक्तीला आणि तुमच्यातील कलेला समजून घेईल. आशाताईंच्या आयुष्यात आर. डी. बर्मन (पंचमदा) यांचे येणे, ही केवळ एक वैयक्तिक घटना नव्हती, तर ती सर्जनशील क्रांती होती. पंचमदांनी त्यांना केवळ एक पत्नी म्हणून नव्हे, तर एक स्वतंत्र कलाकार म्हणून जपले. ही भागीदारी आशाताईंच्या मानसिक स्वास्थ्यासाठी आणि कलात्मक प्रगतीसाठी संजीवनी ठरली. जेव्हा एका स्त्रीला असा जोडीदार मिळतो, जो तिच्या पंखांमधील बळ ओळखतो, तेव्हा तिचे कर्तृत्व अधिकच उजळून निघते.

**संगीत: दुःखातून मुक्तीचा दिव्य मंत्र** आशाताईंचे आयुष्य अनेक वैयक्तिक दुःखांनी व्यापलेले होते. आपली मुले वर्षा आणि हेमंत यांचा मृत्यू हा कोणत्याही मातेसाठी सर्वांत मोठा धक्का असतो. अशा दुःखातून बाहेर पडणे सोपे नसते. कन्येच्या निधनानंतर आशाताई पूर्णपणे कोलमडून गेल्या होत्या. त्यांनी लोकांशी बोलणे आणि भेटणे बंद केले होते. अशा वेळी त्यांचे धाकटे बंधू आणि गुरू हृदयनाथ मंगेशकर यांनी त्यांच्या हातात तानपुरा दिला आणि त्यांना पुन्हा सुरांशी जोडले. त्यांनी आशाताईंना एका शापित गंधर्वाचा दृष्टिकोन दिला. त्यांनी समजावले की, कलाकार हे ईश्वराच्या दरबारातील अशा गंधर्वांसारखे असतात, ज्यांना पृथ्वीवर पाठवले जाते, त्यांना कलेचे वरदान मिळते, पण दुःख सोसणे ही त्यांची नियती असते. त्यांनी आशाताईंना अमूल्य जीवनमंत्र दिला, सुख जगाला वाटावे, पण दुःख मात्र काळजात दाबून ठेवावे; कारण रडणाऱ्यासोबत कोणी रडत नाही, लोक हसणाऱ्यासोबतच हसतात. भावाच्या या शब्दांनी आणि संगीताच्या सामर्थ्याने आशाताईंच्या मनातील निराशेचे ढग दूर झाले.

**ताठ कणा आणि स्वाभिमान-** आशाताईंनी केवळ प्रसिद्धीसाठी गाणे गायले नाही, तर आपल्या मुलांच्या अस्तित्वासाठी आणि भविष्यासाठी त्या गायल्या. हा त्यांच्या मानसिक कणखरतेचा सर्वोच्च पुरावा आहे. समाजाने आणि कुटुंबाने नाकारलेले असतानाही, एक स्त्री इतका भव्य वारसा उभा करू शकते, हे त्यांनी जगाला दाखवून दिले.त्यांच्यातील स्पष्टवक्तेपणा त्यांच्या आत्मसन्मानाचे प्रतीक आहे. तरुणपणी अभिनयाच्या 'ऑफर्स' नाकारताना त्या म्हणाल्या होत्या, मी रोज आरशात पाहते आणि मला नाही वाटत की, माझा चेहरा मोठ्या पडद्यासाठी योग्य आहे. त्यामुळे मी चित्रपट करणार नाही. ही स्वतःच्या मर्यादांची आणि शक्तीची जाणीव असणे, हेच एका सक्षम स्त्रीचे लक्षण आहे.

**अन्नपूर्णा: मायेचा आणि कर्तृत्वाचा संगम** आशाताईंच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांत प्रबळ पैलू म्हणजे त्यांचे अन्नपूर्णा रूप. जागतिक कीतच्या शिखरावर असतानाही त्या आपल्या कुटुंबासाठी स्वतः स्वयंपाक करत असत. जर त्यांच्या सुरांनी जगाचा आत्मा तृप्त केला, तर त्यांच्या हाताच्या चवीने त्यांच्या कुटुंबाला आधार दिला. त्यांच्यासाठी स्वयंपाक करणे हा त्यांच्या संगीताचाच एक विस्तार होता. त्यांच्या गाण्यात आणि अन्नात एकच गोष्ट समान आहे, ती म्हणजे अस्सलपणा!

**महिला सक्षमीकरणाचे उत्तम उदा-हरण-** आज आशा भोसले यांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे अतूट जिद्दीचा एक नमुना आहे. परिस्थिती कितीही कठीण असली, तरी माणूस आपल्या प्रतिभेने आणि मेहनतीने पुन्हा उभा राहू शकतो, हे त्यांनी सिद्ध केले. सात दशकांहून अधिक काळ स्वतःला काळाप्रमाणे बदलण्याची लवचिकता आणि वैयक्तिक दुःखाचे रूपांतर सुरांच्या माधूर्यात करण्याची कला त्यांच्याकडे आहे. आशाताईंचा रोखठोकपणा हा केवळ एक स्वभाव नसून, तो त्यांच्या संघर्षातून कमावलेला आत्मसन्मान आहे. कणखर मातृत्व आणि जागतिक दर्जाचे व्यावसायिक कौशल्य यांचा असा अद्वितीय संगम असलेले त्यांचे व्यक्तिमत्त्व खरोखरच लोकोत्तर आहे. आज समाजात ज्या स्त्रिया विविध संकटांचा सामना करत आहेत, त्यांच्यासाठी आशाताई हे महिला सक्षमीकरणाचे सर्वांत मोठे आणि जिवंत उदाहरण आहेत. त्यांनी आपल्या कर्तृत्वाने हे जगाला दाखवून दिले की, तुमची परिस्थिती तुमची ओळख ठरवत नाही, तर तुमचा ताठ कणा तुमची खरी ओळख ठरवतो. एका बाजूला मुलांसाठी अहोरात्र कष्ट करणारी आई आणि दुसऱ्या बाजूला जागतिक कीतच्या शिखरावर असलेली व्यावसायिक कलाकार अशा दोन्ही भूमिका त्यांनी ज्या ताकदीने पेलल्या, तसा मेळ होणे दुमळ. त्यांच्या स्वरातील तो अलौकिक गोडवा आणि त्यांच्या जगण्यातील ती अदम्य जिद्द पाहून मनात कृतज्ञतेची भावना दाटून येते. त्यांच्या या संघर्षाला अभिवादन करताना बोरकरांच्या ओळी आठवतात, दिव्यत्वाची जेथे प्रचिती, तेथे कर माझे जुळती!

आकलन

संजीव ओक

# होर्मुझचा स्फोटक खेळ आणि आर्थिक घुसमट

**होर्मुझ सामुद्रधुनीभोवती पुन्हा एकदा महासत्तांचा संघर्ष पेटलेला दिसतो. ट्रम्प यांच्या नाकाबंदीच्या इशाऱ्यामुळे तेलदरांनी १०० डॉलरचा टप्पा ओलांडला असून, हा संघर्ष युद्धापेक्षा अधिक धोकादायक आर्थिक विघातक शस्त्र ठरू शकतो. परिणामी, महागाई, मंदी आणि अनिश्चिततेमुळे जागतिक चिंतेत भर घातली आहे.**



युद्ध सुरू होण्याआधीच त्याचे परिणाम जाणवू लागतात, हे आजच्या जागतिक व्यवस्थेचे नवे वास्तव. गोळी झाडली जात नाही; पण त्या आशंकेने बाजार कोसळतो. बॉम्ब प्रत्यक्षात पडत नाही; पण पेट्रोल मात्र लगोलग महागते. रणांगण आखले जात नाही; पण सामान्यांच्या खिशावर त्याचा ताण पडतो. होर्मुझ सामुद्रधुनीवरील सध्याची परिस्थिती ही अशाच नव्या अदृश्य युद्धाचीच साक्ष देत आहे. अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिलेला होर्मुझच्या नाकेबंदीचा इशारा हा एक राजकीय संदेश नाही; तर तो ऊर्जा- राजकारणाच्या नव्या टप्प्याची घोषणा आहे. इराणवर दबाव आणण्याच्या नावाखाली जागतिक पुरवठा साखळीला ओलीस ठेवण्याचा हा प्रयत्न आहे. असे असतानाही, इराणने अमेरिकेला दिलेले प्रत्युत्तरही तितकेच ठाम असून, यात धमकी आहे, उपहास आहे, अप्रत्यक्ष इशाराही.

इराणने एक समीकरण पोस्ट करत, अमेरिकेतील नागरिकांना एक संदेश दिला आहे. यात सध्याचे इंधनाचे दर लवकरच भूतकाळात जमा होतील आणि सामान्यांना त्याचा कसा थेट फटका बसेल, हे इराणने दर्शवले आहे. साधारणतः तेलाच्या किमतीत एक निश्चित वाढ होते. मात्र, अमेरिकेच्या नाकाबंदीच्या निर्णयाने ही वाढ चक्रवाढ दराने आणि अतिवेगवान असेल, असे इराणने अप्रत्यक्षरीत्या सुचवले आहे. होर्मुझ ही अरुंद सामुद्रधुनी असली, तरी तिचे महत्त्व प्रचंड आहे. जगातील जवळपास २० टक्के कच्चे तेल या मार्गाने जाते. म्हणूनच, येथे निर्माण होणारी अस्थिरता म्हणजे जागतिक अर्थव्यवस्थेवर थेट परिणाम करणारी ठरते. ट्रम्प यांनी होर्मुझची नाकाबंदी करण्याचा घेतलेला निर्णय म्हणूनच, संपूर्ण जगाला वेठीला धरणारा ठरणार आहे. ट्रम्प यांची रणनीती सरळ आहे. इराणच्या तेलनिर्यातीवर गदा आणून त्याला आर्थिकदृष्ट्या अडचणीत आणणे, तसेच प्रत्यक्ष युद्ध टाळत, इराणवरील दबाव वाढवणे. मात्र, हा खेळ एकतर्फी नाही. कारण, इराणकडेही एक मोठे शस्त्र आहे.

होर्मुझ पूर्णपणे बंद करण्याची क्षमता. ही धमकी प्रत्यक्षात उतरली, तर त्याचा परिणाम प. आशियापुरता मर्यादित राहणार नाही. एका देशाला रोखण्यासाठी उचललेले पाऊल संपूर्ण जगाला अडचणीत आणणार आहे. तेलपुरवठा खंडित झाला, तर त्याचे पडसाद प्रत्येक अर्थव्यवस्थेत उमटतात. त्यामुळे ही नाकाबंदी रणनीती कमी आणि धोकादायक अधिक ठरते. तेलाचे दर १०० डॉलरच्या पुढे गेले, ही बाब वरवर पाहता बाजारातील चढ-उतार वाटू शकते. पण, प्रत्यक्षात ती जागतिक महागाईच्या नव्या चक्राची सुरुवात आहे. पेट्रोल-डिझेल महागले की, वाहतूक महागते. वाहतूक महागली की, अन्नधान्य महागते आणि शेवटी सर्वसामान्य नागरिकांवर ताण वाढतो.

ऊर्जा दरवाढ ही अर्थव्यवस्थेची मूक महामारी असते. ती हळूहळू प्रत्येक क्षेत्राला बाधित करते; उद्योग, शेती, सेवा, व्यापार. उत्पादन खर्च वाढतो, मागणी घटते आणि विकासाचा वेग खुंटतो. महागाई आणि मंदी यांचे एकत्रित संकट म्हणजे 'स्टॅगफ्लेशन'. ज्याचा अनुभव जगाने १९७०च्या दशकात घेतला होता. आजची परिस्थिती त्याकाळाशी साधर्म्य दाखवते. पण, फरक असा की, आजची अर्थव्यवस्था अधिक परस्परावलंबी आहे. त्यामुळे एका भागातील धक्का संपूर्ण जगभर पसरतो, अधिक वेगाने आणि अधिक तीव्रतेने. अमेरिकेची भूमिका या पार्श्वभूमीवर द्विधा दिसते. एका बाजूला ती इराणला रोखण्याचा प्रयत्न करते, तर दुसर्या बाजूला या परिस्थितीतून स्वतःचा आर्थिक फायदा साधण्याचा प्रयत्न करते. अमेरिकी तेलनिर्यातीसाठी ही संधी म्हणून पाहिली जाते. म्हणजेच, संकट आणि संधी हे दोन्ही एकाच हातात आहेत. मात्र, ही कसरत दीर्घकाळ टिकणारी नाही. कारण, जागतिक मागणी इतकी प्रचंड आहे की, एकाही देशाला ती पूर्ण भागवता येत नाही. त्यामुळे अस्थिरता अपरिहार्य ठरते. या संघर्षाचा परिणाम आशियावर होणार, हे स्पष्ट आहे. चीन आणि भारत या दोन्ही देशांची ऊर्जा- गरज मोठ्या प्रमाणावर या मार्गावर अवलंबून आहे. चीनसाठी ही जीवनरेषा आहे, तर भारतासाठी आर्थिक स्थैर्याचा कणा. भारतातील परिणाम अधिक बहुआयामी असतील. आयात बिल वाढेल, रुपयावर दबाव येईल, महागाई वाढेल आणि विकासदरावर परिणाम होईल. विशेषतः इंधन दरवाढीचा थेट फटका सामान्य नागरिकांना बसतो, जो कोणत्याही सरकारसाठी राजकीयदृष्ट्याही संवेदनशील मुद्दा असतो. या संपूर्ण घडामोडीत आणखी एक महत्त्वाचा बदल दिसून येतो. अमेरिकेच्या मित्रराष्ट्रांची अनिश्चित भूमिका.

युरोपीय देश या संघर्षात उडी घेण्यास तयार नाहीत. याचा अर्थ, जागतिक सत्तासंतुलन बदलत आहे. बहुध्रुवीय जगाच्या दिशेने होणारी ही वाटचाल अमेरिकेच्या एकछत्री वर्चस्वाला आव्हान देते. चीनसारख्या देशांसाठी ही संधी आहे, तर इतरांसाठी संतुलन साधण्याची कसोटी. ट्रम्प यांची नाकाबंदी ही खरोखर युद्धाची सुरुवात आहे का? की, ती दबाव टाकण्याची नीती? त्यांच्या राजकीय शैलीचा विचार करता, ही 'ब्रिंकमॅनशिप' म्हणजे टोकाचा निर्णय घेऊन तडजोड साधण्याची पद्धत असण्याचीच शक्यता अधिक. मात्र, या पद्धतीत एक मोठा धोका असतो. एक चुकीचा अंदाज परिस्थिती हाताबाहेर घालवणारा ठरतो. होर्मुझसारख्या संवेदनशील भागात ही शक्यता अधिकच वाढते. पुढील काही दिवस हे म्हणूनच निर्णायक असतील. मर्यादित संघर्ष, पूर्ण नाकाबंदी किंवा राजनैतिक तोडगा या तिन्ही शक्यता खुल्या आहेत. मात्र, कोणताही मार्ग निवडला, तरी त्याचे परिणाम जागतिक पातळीवर जाणवणार आहेत. हा संघर्ष आता दोन देशांपुरता मर्यादित राहिलेला नाही; तर तो जागतिक अर्थव्यवस्थेच्या स्थैर्याचा प्रश्न आहे. तेलाच्या प्रत्येक थेंबामागे आता सत्तेचे राजकारण असून, त्या राजकारणाची किंमत सामान्य माणसाला चुकवावी लागणार आहे. प्रश्न कोण जिंकणार हा नाही. प्रश्न हा आहे की, या संघर्षाची किंमत नेमकी किती वाढणार? कारण, ती जगालाच मोजावी लागणार, म्हणूनच, होर्मुझमध्ये पेटलेला हा संघर्ष जागतिक अर्थकारणाच्या अस्थिर युगाची स्पष्ट चाहूल आहे.



# प्लॅस्टिकमुक्त वसुंधरा

**२२ एप्रिल जागतिक वसुंधरादिन. त्या निमित्त घेतलेला आढावा... साधारण साठच्या दशकानंतर प्लॅस्टिक आले अन् सारे चित्रच पालटले. प्लॅस्टिक एक बहुपयोगी वस्तू वाटत असतानाच ती आज एक बहुमुखी समस्या होऊन बसली आहे. ती साऱ्या जगाची समस्या आहे. जगभरातील समुद्रकिनारे अन् नद्यांची खोरी प्लॅस्टिकने व्यापली आहेत. गावखेड्यांत गेलात की प्लॅस्टिकच्या वापरून फेकलेल्या पिशव्या उडत असल्याचे भयाण असे दृश्य दिसते.**

निमीत्त

श्याम पेठकर

या जगात अमर असे काही नाही. लहानपणी काही लोककथा पौराणिक रंगरंगोटी करून पेश करण्यात आल्या होत्या. त्यानुसार समुद्र मंथनानंतर गवसलेल्या अमृताचा कलश घेऊन गरुड जात असताना त्यातून काही अमृताचे थेंब सांडले. अर्थात ते गवतावर (हरळ) सांडले, एका सर्पाने काही थेंब प्राशन केले, एका कावळ्यानेही पोचीत झेलले काही... त्यामुळे हे तीन अमर आहेत, असे सांगण्यात येत होते. आता गवत काही अमर नाही हे लक्षात आले. विषारी साप तर ब्लड कॅन्सरने म्हणजे त्याच्याच विषाची पिशवी फुटून ते त्याच्या शरीरात पसरते आणि तो आपल्या विषाने मरत असतो. ध्वनिलहरींच्या किरणोत्सर्गाने कावळे संपुष्टात येण्याची वेळ आलेली आहे. मग या पृथ्वीवर अमर असे काय आहे?

मानव स्वत:च मर्त्य आहे त्यामुळे त्याला काही निर्माण करण्याचा अन् ते संपविण्याचा अधिकार नाही. तरीही मानवाने निर्माण केलेले प्लॅस्टिक मात्र मरण नसलेले आहे. किमान हजार वर्षे लागतात प्लॅस्टिकचे विघटन व्हायला आणि त्यानंतरही ते पूर्णपणे विघटित होत नाही. आता गंमत बघा. एखादी वस्तू अशी अमर असेल तर तिची बेरीज किंवा गुणाकारच होत राहणार. वजाबाकी किंवा भागाकार होणारच नाही. त्यामुळे अर्थातच ती वस्तू गुणाकाराने किंवा बेरजेने वाढतच जाणार. प्लॅस्टिक गुणाकाराने वाढते आहे. कारण वापरात आलेले प्लॅस्टिक तर मरणार नाहीच अन् दररोज प्लॅस्टिकची निर्मितीही सुरूच राहणार आहे. १९५० च्या आसपास प्लॅस्टिक वापरले जाऊ लागले. साधारण पहिल्या महायुद्धाच्या आधीच्या काळांत 'सहस्त्रोपयोगी' अशी मानाची पदवी मिळालेल्या प्लॅस्टिकचा जन्म झाला. सहज, सुंदर, मजबूत, टिकावू आणि स्वस्त असे केवळ कल्पनाच असू शकते, असे प्रत्यक्षात आलेले मटेरियल म्हणजे प्लॅस्टिक. १९०७ मध्ये कृत्रिम धाग्यांपासून बनवले गेले. पॉलिइथिलिन, पॉलिप्रापिलिन, पॉलिस्टायरीन, पॉलिविनाइल क्लोराईड असे पॉलिमर्सने प्लॅस्टिक बनते. फार वजन नसते. चिवट, लवचिकही. विविध रंगांत मिळते. त्यावर सहज मुद्रणही होते. त्यावर पाणी, दमट हवामान, माती यांचा काहीच परिणाम होत नाही. त्यामुळे पॅकेजिंग इंडस्ट्रीसाठी तर प्लॅस्टिक वरदानच आहे. पहिल्या महायुद्धाच्या आधीच्या काळात म्हणजे १९०६ च्या आधी प्लॅस्टिकचा अवतार झाला. अमेरिकादी देशांनी म्हणजे मित्र राष्ट्रांनी दोन्ही महायुद्धात प्लास्टिकचा उपयोग पॅराशूट, दोरखंड बनवण्यापासून पॅकिंगसाठी केला. हे तसे जादूई संयुग आहे. वाट्टेल ते रूप घेऊ शकते. ते संगणक असते आणि लहान मुलांचे खेळणेही. विमानातही ते वापरले जाते आणि शेतीतही... एकाच्या घरी कणीक, डाळ, तांदूळ वगैरे ठेवण्यासाठी प्लॅस्टिकचे डबे होते. प्लॅस्टिकने बघता बघता माणसाचे सारे आयुष्यच कवेत घेतले आहे. आता त्यापासून सुटका नाही. जैविक साखळीत ते येऊ लागले आहे.

प्लॅस्टिक आता माणसाच्या अन्नातही मिसळू लागले आहे. ते पाण्यात मिसळले की अन्नात सहजच मिसळत असते. आजकाल तर पाणी पिण्याचे ग्लासही प्लॅस्टिकचे असतात. 'यूज अँण्ड थ्रो' ही नवी नीती आहे. त्यामुळे अशा पाच मिनिटे वापरण्याच्या वस्तू प्लॅस्टिकच्या असतात. तुम्ही पाच मिनिटे वापरून फेकलेली प्लॅस्टिकची वस्तू नंतर किमान पाचशे वर्षे टिकून असते. आजकाल समारंभात पाण्याचे ग्लास, जेवणाच्या थाळ्याही प्लॅस्टिकच्या असतात. ते अन्न फेकले जाते. सोबत प्लॅस्टिकही असते. ते मग नाल्यात, नद्या, समुद्रात जाते. गायी- जनावरे अन्नासाठी प्लॅस्टिकही खातात. बारीक तुकडे अन् अगदी सूक्ष्म असे कण पाण्यात अन् मग अन्नात मिसळतात. मासे, कोंबड्या, अंडी, दूध अशा अन्न घटकांत प्लास्टिक मिसळते आणि मग ते आपल्या पोटातही जाते... एकुणात काय की प्लॅस्टिकने आयुष्य ग्रासूनच टाकले आहे. मागे निरंजन घाटे यांची रोबोवरची एक कथा वाचली होती. त्या राज्यात इतके रोबो झालेले असतात की नेमकी माणसं कुठली आणि रोबो कुठले, हेच कळत नाही. एक जोडपे बागेत बसले असते प्रणयाराधन करीत. तो ही खंत तिच्याकडे व्यक्त करतो. तीही उसासते. म्हणते, ''खरेय ना राजा, आपण दोघे सोडलो तर बाकी सारे रोबोच आहेत की काय, असे वाटू लागले आहे...'' ती असे म्हणत असताना तो तिच्या केसात हात फिरवतो आणि थोडा जास्त दाब पडताच केसांचे टर्मिनल्स त्याच्या हातात येतात... तो खूपच उद्विग्न होतो आणि या जगात आता आपण एकमेव मानव उरलो आहोत, आणखी माणसे शोधली पाहिजे म्हणून तो विमान घेऊन उडतो. एक खेडे दिसते. शेत, गवताची कुरणे... म्हशी चरत आहेत अन् विहिरीवर बायका पाणी भरत आहेत. तो तिथे उतरतो. त्याला आनंद होतो की चला माणसांच्या वस्त्या आहेत तर... तो त्या बायकांना पाणी मागतो. त्या विहिरीतून पाणी काढून त्याच्या ओंजळीत ओततात. ओतताना त्या बाईच्या हाताला जरा जोरात झटका बसतो कळशीचा अन् तिच्या हातातून टर्मिनस बाहेर पडतात... मग तो खूपच निराश होतो. आता आपण स्वत:ला संपविलेच पाहिजे, या रोबोंच्या युगात काय राहायचे, असा विचार करून तो विमान उडवितो अन् एका पहाडाला टक्कर देतो मुद्दाम... विमानातून पडून तो दरीत कोसळत असताना त्याचा हात एका झाडाला लटकतो अन् त्यातून टर्मिनस बाहेर पडतात... प्लॅस्टिकच्या बाबत असे झाले आहे आपले. प्लॅस्टिक नाही, असे नाहीच. प्लॅस्टिकचा हा भस्मासूर अमरत्वाचे वरदान घेऊन आला आहे. मात्र त्याचे विघटन रासायनिक प्रक्रिया करून करता येते. त्यापासून उपयुक्त इंधनही बनवता येते. पुनर्वापर करता येते; पण त्यासाठी केवळ यंत्रणा असूनच भागत नाही तर प्रचंड इच्छाशक्तीही हवी.

सामान्य नागरिकांची आणि सरकारचीही. आता शक्य आहे. पण त्यासाठी वेगळी यंत्रणा हवी. मुळात व्यापारीकरण, बाजारीकरणाने आधुनिक काळ भ्रष्टावूनच टाकला आहे. करपवून टाकला आहे. प्लॅस्टिकच्या ज्यांच्या इंडस्ट्री आहेत, त्यांनी रिसायकलिंगचे प्रोजेक्ट उभेच राहू दिले नाही. तुम्ही प्लॅस्टिक वापरून फेकत जा आणि आम्ही नवे निर्माण करून धंदा करत राहू... एका अहवालानुसार मोठ्या शहरांतील एक नागरिक महिन्याला किमान दोन किलो प्लॅस्टिकचा कचरा निर्माण करत असतो. महानगरपालिकेच्या शहरांत दररोज निर्माण होणारा प्लॅस्टिकचा कचरा ९० ते १ लाख हजार किलो इतका असतो. त्यात आमच्याकडे कचरा विलगीकरणाची प्रक्रियाच नाही. ओला आणि सुका कचरा वेगळा घरांतही केला जात नाही अन् नगर प्रशासनाची माणसे येतात ती जसाच्या तसा कचरा नेऊन डम्पिंग यार्डमध्ये नेऊन फेकत असतात. आता कशात प्लॅस्टिक नाही, असे विचारा. त्यातही प्लॅस्टिकच्या कॅरीबॅग्ज फारच घातक झाल्या आहेत. आधीच्या काळी गृहस्थ ऑफिसला निघाला किंवा बाहेर पडला की सायकलच्या कॅरीयरला पिशवी असायचीच. घरच्या पँटा, पायजामे, घप्प कपडे, साड्या-धोतर यांच्या पिशव्या शिवल्या जायच्या. दुकानदारही पिशव्या ठेवायचे. शिलाई मशीन ही कुटुंबात प्रतिष्ठेची वस्तू होती. त्यामुळे कपड्यांच्या पिशव्या तर नक्कीच शिवल्या जात होत्या.

साधारण साठच्या दशकानंतर प्लॅस्टिक आले अन् सारे चित्रच पालटले. प्लॅस्टिक एक बहुपयोगी वस्तू वाटत असतानाच ती एक बहुमुखी समस्या होऊन बसली आहे. ती साऱ्या जगाची समस्या आहे. जगभरातील समुद्र किनारे अन् नद्यांची खोरी प्लॅस्टिकने व्यापली आहेत. गावखेड्यांत गेलात की प्लॅस्टिकच्या वापरून फेकलेल्या पिशव्या उडत असल्याचे भयाण असे दृश्य दिसते. प्लॅस्टिकवर सरसकट बंदी तर घालताच येणार नाही मात्र कॅरीबॅग्ज खतम करण्याचा प्रयत्न केला जातो आहे. अगदी जगभर हे सुरू आहे. बंदी घातली की मग अनेक व्यापारी प्रतिष्ठाने अन् कार्पोरेट हाऊसेसनी पॅकेजिंग म्हणून ज्या पिशव्या तयार करून ठेवलेल्या असतात त्यांचे काय करायचे, असा सवाल निर्माण होतो आणि ही मंडळी सरकारवर दबाव आणतात. त्यातून मग इतके मायक्रोकॉन- तितके मायक्रोकॉन अशा पळवाटा काढल्या जातात. या पिशव्यांची जाडी मोजण्याचे परिमाण आहे मायक्रॉन.

आपल्या देशात कायद्यानुसार आता २० मायक्रॉन्स जाडीची पिशवी वापरण्यावर बंदी आहे. त्याऐवजी ४० मायक्रॉन्स व जास्त जाडीच्या पिशव्या वापरल्या जातात. याचं कारण अति पातळ पिशव्यांचे तुकडे होऊन त्या जमिनीत व पाण्यात सर्वत्र मिसळतात व त्यामुळे जमिनींचा कसदारपणा नाहीसा होतो तसंच जलचरांना धोका उद्भवतो. जास्त जाडीच्या पिशव्यांचे तुकडे कमी वेगाने पडतात. तेवढाच पर्यावरणाला कमी धोका पोहोचता. मात्र ४० मायक्रॉन्सची पिशवी साधारण २ रुपयांना पडते व त्या तुलनेत २० मायक्रॉन्सची पिशवी ही १० पैशांना पडते. त्यामुळे अनेक ठिकाणी या पातळ पिशव्या वापरल्या जातात. मुळात प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर कमी व्हावा यासाठीची जास्त जाडीच्या पिशव्यांची किंमत जास्त ठेवण्यात आली आहे. काही देशांत तर समुद्र किनाऱ्यावर प्लॅस्टिकची बेटंच तयार झालेली आहेत. भारतात गायी, बकऱ्या अशी दुधाळू पाळीव जनावरं मरतात तसेच जलचर प्राणीही प्लॅस्टिकने मरतात. प्लॅस्टिकने गायी, बकऱ्या, इतर जनावरे... जसे देवस्थानच्या जवळची माकडे... एकुणात माणसांच्या संपर्कात येऊन प्लॅस्टिकचा संसर्ग होणारे जवळपास एक कोटीच्या जवळपास जनावरे भारतात दरवर्षी मरतात. जगात दरवर्षी सुमारे दोन कोटी देवमासे, डॉल्फिन्स, सील्स, सी लायन, इतर जलचर तसेच इतर पशू-पक्षी यांचा या प्लॅस्टिकच्या पिशव्यांमुळे मृत्यू होतो आहे. हे जमिनीवरील व समुद्रातील प्राणी खाद्य म्हणून प्लॅस्टिकच्या पिशव्यांकडे आकर्षित होतात. त्यांच्या पोटात पिशवी गेल्यावर त्यांना जंतुसंसर्ग होऊन त्यांची चयापचय प्रक्रिया बिघडून त्याची परिणती अखेर मृत्यूत होते. कचऱ्याची शास्त्रोक्त विल्हेवाट आणि पुनर्वापर हे दोन उपाय आहेत. विविध देशांत विविध उपाय केले जात आहेत. आयर्लंडने प्लॅस्टिक बॅग्जवर कर लावला. त्यामुळे ते महाग झाले आणि लोकांनी पर्याय शोधले. आता तिथे प्लॅस्टिकचा वापर ९० टक्के कमी झाला. ऑस्ट्रेलियामध्ये सिडनीसह तीन शहरांत काही व्हेंडिंग मशिन्स बसवण्यात आल्या. या अजब मशिन्समध्ये प्लॅस्टिकचे कॅन व पॅक टाकल्यावर त्यातून बसचं तिकीट मिळायची सोय केली गेली आहे. या कल्पनेला प्रचंड प्रतिसाद दिला. जगात या प्लॅस्टिक पिशव्यांच्या कचऱ्यांचे डोंगर झाले आहेत. आज आपण खरेदी, वेष्टन, कचरा फेकणे अशा अनेक कारणांकरिता प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर करत असतो. याच प्लॅस्टिक पिशवीचं विघटन होण्यासाठी सुमारे एक हजार वर्षे लागतात. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जगात १ बिलियन टन इतकं प्लॅस्टिक निर्माण झालं व आज एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकातच हे उत्पादन पूर्वीपेक्षा दुप्पट झाल्याची नोंद 'सायंटिफिक अमेरिकन' या संशोधन मासिकानं केली आहे. पुनर्वापर, कर, दंड, शिक्षा, रासायनिक विघटन असे उपाय आहेत. प्लॅस्टिकच्या ऐवजी कापड, ताग, कागद यांच्या पिशव्यांचा वापर करण्याची जुनी पद्धत आणली पाहिजे. दोर, दोऱ्या या नारळापासून तयार केल्या जातात. त्यांचा वापर वाढविला पाहिजे. अगदी जुन्या साड्या फेकून दिल्या जातात. फेकलेले हे कपडे फाटले असतात, जुने झाले असतात असे नाही; पण आधुनिक बाजारीकरणाने ही मानसिकता घडविली आहे. नवी वस्तू घेण्यासाठी जुनी फेकून दिली जाते. अशा कपड्यांपासून पिशव्या तयार करता येतात. प्लॅस्टिक शिवायही आपण जगत होतोच, तसेच पुन्हा जगणे सुरू करायचे आहे. औद्योगिक वापर, वैद्यकीय क्षेत्र, आयटी, बांधकाम क्षेत्र अशा ठिकाणी ठीक आहे; पण प्लॅस्टिकच्या पिशव्या आणि वेष्टने यामुळे पर्यावरणच नाही तर मानवी जीवनच धोक्यात आले आहे. बेटी बचावसोबतच आता अनेक कारणांसाठी पृथ्वी बचाव योजनाही आणणे महत्त्वाचे आहे. त्यात प्लॅस्टिकमुक्त वसुंधराही हा संकल्प प्रत्यक्षात आणण्यासाठी कॅरीबॅग्ज वारणे आपणच बंद करायला हव्यात. त्यासाठी फार नाही १९५० च्या आधीचा काळ पुन्हा जिवंत करावा लागेल... अन् ही सुरुवात दुसरा कुणी करेल, याची वाट न बघता आपल्यापासूनच सुरुवात करायला हवी. तरचं प्लॅस्टिकमुक्ती होईल.